CMYK




सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, १७ जून २०२६ | वर्ष ४ थे अंक १०० | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक जे दुःख विसरण्याचा उपाय सांगतात किंवा करतात आणि दुसरे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करतात. इतरांचे दुःख दूर करण्यातच जीवनाचे यश दडलेले आहे.

- **भारतरत्न**
**स्व. नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## विनम्र अभिवादन



**महाराणा प्रताप यांची आज तिथीनुसार जयंती**

३ इंडोनेशिया भूकंपाने हादरला

४ 'ते' १०७ दिवस... (अग्रलेख)

# गावांना आता २४ तास शुद्ध पाणी

## 'महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६'ला मंजुरी

**मुंबई, १६ जून**

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी अत्यंत प्रभावी, आधुनिक आणि कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देणार्‍या ऐतिहासिक 'महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण - २०२६' ला आज मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अधिकृत मंजुरी देण्यात आली. राज्यात सध्या सुरू असलेल्या 'जलजीवन मिशन २.०' मधील सर्व पाणी पुरवठा योजनांच्या कायमस्वरूपी देखभाल आणि दुरुस्तीसाठी एक सर्वंकष महाआराखडा तयार केला जाणार आहे.

ग्रामीण भागात वेगवेगळ्या स्तरावर राबविण्यात येणार्‍या विविध पाणी योजनांचे एकत्रिकरण करून हे धोरण राबविले जाणार असून, या माध्यमातून प्रत्येक ग्रामीण नागरिकाला स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पाणी पुरवठा करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. हे धोरण 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार विकसित भारताच्या संकल्पनेशी सुसंगत असून, येत्या २०४७ पर्यंत राज्यातील प्रत्येक ग्रामीण कुटुंबासाठी शाश्वत आणि कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय यातून केली जाणार आहे. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणि पाणी चोरी पूर्णपणे थांबवण्यासाठी सर्व योजना ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांकडे हस्तांतरीत केल्या जातील.

पाणीपुरवठा योजनांचा देखभाल दुरुस्ती खर्च शंभर टक्के वसूल व्हावा यासाठी ग्रामपंचायत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद स्तरावर एक स्वतंत्र एकत्रित निधी निर्माण केला जाईल. या योजनांवर निश्चित करण्यात आलेल्या पाणीपट्टीच्या देयकाचे वितरण, वसुलीचे काम परिसरातील महिला बचत गट व प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना दिले जाईल.

(तभा वृत्तसेवा)




### शंभर टक्के वसुली बंधनकारक

प्रत्यक्ष खर्च यापेक्षा जास्त असल्यास त्या प्रमाणात आकारणी केली जाईल. निश्चित करण्यात आलेली ही पाणीपट्टी शंभर टक्के वसूल करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक राहील, आणि कोणत्याही कारणास्तव वसुलीत तूट आल्यास ती भरून काढण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींना १५ व्या किंवा १६ व्या वित्त आयोगाचा निधी वापरण्याची मंजुरी मंत्रिमंडळाने दिली आहे.

### महिला बचत गटांना प्राधान्य आणि नवीन पाणीपट्टी दर

पाणीपट्टी वसुली व देखभालीच्या कामात स्थानिक महिला बचत गटांना प्राधान्य दिले जाईल, तसेच ग्रामीण भागात प्रति कुटुंब किमान १५० रुपये ते कमाल ४०० रुपये दरमहा पाणीपट्टी निश्चित करण्यात आली असून, तूट भरून काढण्यासाठी १५ व्या व १६ व्या वित्त आयोगाचा निधी वापरता येईल.

# सात खासदार सोडणार उबाठाची साथ ?

## दिल्लीत हालचाली वाढल्या | पक्षातील फूट रोखण्याचे शर्थीचे प्रयत्न

**नवी दिल्ली, १६ जून**

ममता बॅनर्जी यांच्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मोठा धक्का बसू शकतो. उबाठा गटातील नऊपैकी सात खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा दिल्लीच्या राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. दरम्यान, उबाठातील फूट रोखण्यासाठी खासदार संजय राऊत आणि अनिल देसाई शर्थीचे प्रयत्न करीत आहेत.

तृणमूल काँग्रेसप्रमाणेच शिवसेना(उबाठा) गटातील सात खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्याचा आणि नंतर 'रालोआ'त सहभागी होण्याची तयारी सुरू केल्याच्या बातम्या मंगळवारी दिवसभर सुरू होत्या. असे झाल्यास पक्षाच्या स्थापना दिनापूर्वीच उद्धव ठाकरे यांना मोठा झटका बसू शकतो. यापैकी शिर्डीचे भाऊसाहेब वाकचोरे आणि यवतमाळचे खासदार संजय देशमुख दिल्लीत दाखल झाल्याचे वृत्त असून उर्वरित पाच खासदार लवकरच दिल्लीत पोहोचतील, अशी चर्चा आहे. बंडखोरी झाल्यास शिवसेनेच्या स्थापना दिवसापूर्वीच उबाठा गटाला मोठा हादरा बसू शकतो. तीन दिवसांपूर्वी मातोश्रीवरील बैठकीला नऊपैकी केवळ चारच खासदार प्रत्यक्ष हजर होते. उर्वरित पाच जण ऑनलाईन उपस्थित होते. दोन दिवस अगोदरपासून बैठकीला येण्याचे सांगूनही पाच खासदार मातोश्रीवर प्रत्यक्ष न आल्याने पक्षात काहीतरी शिजत असल्याचे दिसून आले. संजय जाधव, नागेश आष्टिकर, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचोरे, संजय देशमुख या पाच खासदारांनी प्रत्यक्ष हजेरी लावणे टाळले. याबाबत उबाठा गटाच्या कोणत्याही नेत्याने अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

(वृत्तसंस्था)

## आमदारांमध्ये खदखद ?

### २२ जूनला आमदारांची बैठक



**मुंबई १६ जून**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष पुन्हा फुटीच्या मार्गावर असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. त्यामुळे पक्षाचे अस्तित्व टिकवण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच २२ जून रोजी शिवालय येथे सर्व आमदारांची महत्त्वपूर्ण बैठक बोलाविण्यात आली आहे.

पक्षातील काही खासदार आणि आमदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे.

खासदारांच्या बैठकीतील या अनुभवातून धडा घेत उद्धव ठाकरे यांनी आता आमदारांच्या बैठकीतून आपले संख्याबळ तपासण्याचा निर्धार केला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, ही बैठक केवळ संवादाचे व्यासपीठ नसून ठाकरे यांची खरी 'शक्तिपरीक्षा' ठरण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. पक्षात दुसऱ्यांदा फूट पडण्यापूर्वीच उद्धव ठाकरे आपले घर सावरण्याच्या प्रयत्नात असल्याचे स्पष्ट दिसते.

(तभा वृत्तसेवा)

# मोदी-ट्रम्प यांची १६ महिन्यांनी भेट

## दोन्ही नेत्यांत मैत्रीपूर्ण चर्चा


**एव्हियन, १६ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जी-७ शिखर परिषदेदरम्यान भेट झाली. ही भेट १६ महिन्यांच्या कालावधीनंतर फ्रान्समधील एव्हियन शहरात झाली. जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प फ्रान्समधील एव्हियन येथे पोहोचले आहेत.

ट्रम्प जी-७ शिखर परिषदेसाठी बैठक कक्षात बसले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिथे आले आणि दोन्ही नेत्यांनी हस्तांदोलन केले. त्यांनी सुमारे ५० सेकंद संवाद साधला. ही संक्षिप्त भेट अत्यंत सौहार्दपूर्ण होती; शिखर परिषदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी दोन्ही नेत्यांनी स्मितहास्य करत एकमेकांचे अभिवादन केले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्या यजमानपदाखाली आयोजित या शिखर परिषदेसाठी जगभरातील नेते एकत्र आले असताना ही भेट झाली. जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर नेत्यांची चर्चा होण्यापूर्वी, मॅक्राँ यांनी परिषदेच्या ठिकाणी पंतप्रधान मोदींचे स्वागत केले.

जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यावर एव्हियन येथे पोहोचले आहेत. जी-७ शिखर परिषदेतील पंतप्रधान मोदींची ही सलग सातवी उपस्थिती आहे. या परिषदेदरम्यान मोदींचा कार्यक्रम उच्च-स्तरीय राजनैतिक भेटीगाठींनी भरलेला असेल. ते अनेक द्विपक्षीय बैठका घेणार आहेत; यामध्ये कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर आणि संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यासोबतच्या चर्चांचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)



**पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प जी-७ परिषदेत चर्चा करताना**




10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | Flipkart | amazon.in

*नियम आणि अटी लागू. ऑफर 30 जून 2026 पर्यंत वैध आहे. पल्सर N160 USD सिंगल सीट व्हेरिएंटवर ई-कॉम ऑफर, संबंधित ई-कॉम भागीदाराच्या अटींवर अवलंबून. ई-कॉम ऑफर भागीदारांनुसार बदलू शकतात. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road** AHERKAR BAJAJ 9689899840 • **Hotgi Road** AHERKAR BAJAJ 8956 069 355 • **Akkalkot Road** AHERKAR BAJAJ 8956 320 060 • **Pandharpur** PANDURANG BAJAJ 8600024805 • **Jeur** SHIVRATNA BAJAJ 9922044676 • **Barshi** AHERKAR BAJAJ 8308004007.

## महत्वाचे...



## गुंडादादा खटकाळे यांच्याकडून सांगोला नगरपरिषदेस वृक्ष भेट

**सांगोला, दि. १६ जून-**

सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने व मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत युवा सेना तालुकाप्रमुख दिपक उर्फ गुंडादादा खटकाळे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे सांगोला नगरपरिषदेस भेट दिली. सदर वृक्षांचे सांगोला नगरपरिषदेच्यावतीने शहरातील वासूद चौक ते कडलास नाका रस्त्यावरील दुभाजकामध्ये तसेच न्यू इंग्लिश स्कूल क्रीडा मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, सागर पाटील, जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, पं.स.उपसभापती अजय सरगर, नगरसेवक काशिलिंग गावडे, अरुण पाटील, बाळासाहेब आसबे, संजय केदार व नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.



## शेतकऱ्यांची कर्जमाफी करून पीक विमा मिळण्यासाठी शुक्रवारी आंदोलन

**जेऊर, दि. १६ जून-**

शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी आणि पिक विमा मिळण्यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते व क्रांतिकारक शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अमोल घुमरे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा नायब तहसीलदार विजयकुमार जाधव यांना निवेदन दिले. निवेदनात असे म्हटले की, महाराष्ट्रातील शेतकरी आज आर्थिक संकटाच्या विळख्यात सापडला आहे. नैसर्गिक आपत्ती तसेच कर्जाचा वाढलेला आर्थिक बोजा, खते, बी, औषधे, आणि मशागत मजूरीने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. तसेच पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना योग्य व वेळेत नुकसान भरपाई मिळावी, आशा विविध मागण्यासाठी करमाळा तहसील येथे दि. १९ शुक्रवार रोजी सर्व पक्षीय एकदिवसीय घंटानाद आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा राष्ट्रीय समाज पक्ष, क्रांतिकारक शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी अंगद देवकते, अमोल घुमरे, अजय बागल, ज्ञानेश्वर बनसोडे, सागर अंबारे, अमोल बागल, अशोक नवघरे, तानाजी शिंदे, शांतीलाल मोरे, राम धायतोंडे, भगवान डोंबाळे, शंकर सुळ, विष्णू राऊत उपस्थित होते.



## सांगोला विद्यामंदिर प्रशालेत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत

**सांगोला, दि. १६ जून-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेत पाचवीत प्रवेश करणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. सुरुवातीला कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास नवागत विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या सुंदर फुग्यांच्या कमानीतून विद्यार्थ्यांनी प्रवेश केल्यानंतर प्राचार्य चारूदत्त जगताप, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या नवागत विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी सां. ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड. विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, शीला झपके, विश्वेश झपके यांनी शुभेच्छा दिल्या.



## आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. १६ जून-**

शिवसेना नेते युवा सेना प्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली तसेच जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय मासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली व यावेळी अधिकमासानिमित्त सुवासिनींची ओटी ही भरण्यात आली. आदित्य ठाकरे यांना दीर्घायुष्य लाभावे, यासाठी महारती करण्यात आली. यावेळी वृक्ष वाटप करण्यात आले. तसेच अन्नदान व शनिभक्तांना महाप्रसादाचे देखील वाटप करण्यात आले. यावेळी विष्णू कारमपूरी, दत्ता माने, ॲड. सुरेश गायकवाड, योगीराज चिवशेट्टी, शशिकला चिवडशेट्टी, मिना सुर्वे, रहा सरवदे, अनिता पाटील, जयश्री पाटील, संतोषी भोळे, पूजा शिंदे, चंदाराणी जाधव, नांगरणी भंडारी, सुनिता अंबलगी, लक्ष्मी माशाळ, डॉ.गौरी गायकवाड उपस्थित होते.

# पतीसोबत दुचाकीवरुन जाणाऱ्या विवाहितेचा पाठलाग करुन विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जून-**

बार्शी तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या २० वर्षीय विवाहित महिलेचा पाठलाग करुन धावत्या दुचाकीवर तिचा विनयभंग केल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पतीसोबत दुचाकीवरुन उपचारासाठी जात असताना एका तरुणाने महिलेच्या साडीचा पदर ओढून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच या घटनेबद्दल कोणाला सांगितल्यास पती-पत्नीला जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिलेने १५ जून २०२६ रोजी पांगरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पीडिता आणि तिचे पती मजुरी करुन उदरनिर्वाह करतात.

रविवार, १४ जून २०२६ रोजी रात्री ९ वाजणेच्या सुमारास पीडित महिलेच्या पोटात दुखत असल्याने ती आपल्या पतीसोबत दुचाकीवरुन येरमाळा येथे औषधोपचारासाठी जात होती. त्यांची दुचाकी शिराळे ते वाघाचीवाडी रोडवरुन जात असताना, आरोपी निखील वाघ हा त्याच्या लाल रंगाच्या दुचाकीवरुन त्यांच्या पाठीमागे आला.



सुरुवातीला आरोपीने महिलेला अश्लील हातवारे व इशारे केले. महिला पतीसोबत असल्याने तिने त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र, आरोपीने दुचाकी आणखी जवळ आणून महिलेच्या पाठीवरुन हात फिरवला व तिचा हात धरुन विनयभंग करत साडीचा पदर ओढला.

या अनपेक्षित व धक्कादायक प्रकारामुळे महिला घाबरुन जोरात ओरडली. महिलेने आरडाओरडा केल्याने आरोपीने स्वतःची दुचाकी वेगात पळवून तेथून पोबारा केला. पतीने दुचाकी थांबवून विचारपूस केली असता, घाबरलेल्या महिलेने रडत घडलेला सर्व प्रकार पतीला सांगितला.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, हा प्रकार अचानक घडलेला नाही. आरोपी या घटनेपूर्वीही पीडितेच्या घरासमोरुन वारंवार दुचाकीवरुन चकरा मारुन तिला जाणीवपूर्वक त्रास देत होता. तसेच, 'जर तू याबद्दल कोणाला किंवा तुझ्या नवऱ्याला काही सांगितले, तर तुला व तुझ्या नवऱ्याला जिवंत सोडणार नाही,' अशी गंभीर धमकीही त्याने महिलेला दिली होती.

सातत्याने होणारा त्रास आणि १४ जून रोजी घडलेल्या विनयभंगाच्या गंभीर प्रसंगानंतर, पीडित महिलेने धैर्याने पांगरी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरुन आरोपी निखील रामलिंग वाघ याच्याविरुद्ध विनयभंग आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पांगरी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## सांगोला तालुक्यात ४ अनाधिकृत शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ जून-**

सांगोला तालुक्यातील हनुमान इंग्लिश मिडीयम स्कुल कटफळ, सांगोला गुरुकुल सांगोला, बाळुमामा गुरुकुल सांगोला, विश्वशोभा प्राथमिक विद्यालय मेडशिंगी या अनाधिकृत शाळा असुन सदर शाळेस शासकिय कोणत्याही प्रकारची मान्यता अथवा मंजुरी नाही, अशी माहिती शिक्षण विभाग पंचायत समिती, सांगोला यांनी दिली. सदर शाळांची माहिती वरिष्ठ कार्यालयास दिलेली असुन त्यांच्यावर कारवाई प्रस्तावीत आहे. त्यामुळे आपण आपल्या पाल्याचा प्रवेश सदर शाळेत घेवु नये. आपण सदर शाळेत प्रवेश घेतल्यास आपल्या पाल्याच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास आपण सर्वस्वी स्वतः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी असे सांगोला तालुक्यातील पालकांना प्रशासना मार्फत कळिवण्यात आले आहे.

## सराईत गुन्हेगार सोमनाथ जाधव २ वर्षाकरिता तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून -**



गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सलगर वस्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार सोमनाथ बजरंग जाधव (वय-२४ वर्षे, रा. सेटलमेंट फ्रि. कॉलनी नं. ३, डोणगाव रोड, सोलापूर ) यास सोलापूर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे .

सोमनाथ जाधव या विरुध्द सन २०२२, २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, सरकारी नोकराचे कामात अडथळा निर्माण करणे, जबरी चोरी करणे, सामान्य नागरीकांना मारहाण करुन दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द सलगर वस्ती पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलीस उपआयुक्त प्रितम यावलकर यांनी दि.१० जून २०२६ रोजी सोमनाथ जाधव यास सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

## फायनान्स कंपनीच्या नावाखाली सर्वसामान्यांची लूट

### कर्जवसुली एजंट असल्याचे सांगून पैसे व सोन्याची अंगठी हिसकावली

### बार्शी पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जून-**

फायनान्स कंपनीचे वसुली एजंट असल्याचा बनाव करून सर्वसामान्य नागरिकांना अडवून जबरदस्तीने पैसे उकळणाऱ्यांचा बार्शी तालुका पोलिसांनी पर्दाफाश केला असून, गुन्हा दाखल होताच अनिकेत सुनील रसाळ व ओंकार दीपक परदेशी या दोन आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली आहे. याबाबत बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सतीश विजयराव हावळे (रा. दहिफळ, ता. कळंब, जि. धाराशिव) हे १४ जून रोजी त्यांच्या मुलाच्या नावावरील हिरो पॅशन मोटारसायकलवरुन औषधे व इतर कामानिमित्त बार्शीकडे येत होते. दरम्यान, कुसळंब टोलनाक्याजवळील एम.पी. पेट्रोल पंप परिसरात दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी संबंधित मोटारसायकलवर फायनान्सचे कर्ज असल्याचे सांगत वाहन जप्त करण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीकडे १२ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. भीतीपोटी फिर्यादीने रोख व ऑनलाइन माध्यमातून एकूण १० हजार रुपये दिले. मात्र, त्याबाबत कोणतीही अधिकृत पावती देण्यात आली नाही. इतकेच नव्हे तर आरोपींनी फिर्यादीच्या हातातील सुमारे एक तोळे वजनाची सोन्याची अंगठीही जबरदस्तीने काढून घेतली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तात्काळ तपास सुरु केला. तपासादरम्यान आरोपींची ओळख पटवून त्यांना अवघ्या काही तासांत ताब्यात घेण्यात आले.

प्राथमिक तपासात आरोपी हे विविध फायनान्स कंपन्यांचे वसुली एजंट असल्याचे भासवून सर्वसामान्य नागरिकांना धमकावत पैसे उकळत असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अशाच प्रकारे कोणाकडूनही फायनान्स कंपनीच्या नावाखाली बेकायदेशीर वसुली करण्यात आली असेल किंवा अशा प्रकारची घटना घडली असेल, तर संबंधितांनी तात्काळ बार्शी तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांनी केले आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक भालेराव, सहाय्यक फौजदार गवळी, पोहेकॉ. अभय उंदरे, खांडेकर, बोबडे, घाडगे, देशमुख, कावळे पोकॉ. बचुटे, दासरे, लोंढे, चिट्टलवाड यांनी केली आहे.



## कामतकर क्लासेसच्या सई पिंपळनेरकर आणि अर्णव राऊत यांचा सन्मान

### दोघांनीही मिळविले १०० टक्के गुण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून -**

कामतकर क्लासेसचा २२ वी बक्षीस समारंभ लेखक व पत्रकार प्रा. सचिन वायकुळे यांच्या हस्ते हिराचंद नेमचंद वायनालय येथे पार पडला. शहरातील प्रथम आलेले व कामतकर क्लासेसमध्ये प्रथम आलेले सई पिंपळनेरकर आणि अर्णव राऊत १००% गुण मिळिवलेल्या विद्यार्थ्यांचा फेटा घालून सत्कार करण्यात आला.

निखिल विभूते दमाणी प्रशालेत दुसरा, ईशा रणसुबे मॉडेल पब्लिक प्रशालेत प्रथम, खुशाली शेळके भारती विद्यापीठ शाळेत प्रथमअसे एकूण ९०.००% पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या ५३ विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

इ. ५ वी व ८ वी स्कॉलरशीप प्राप्त ९ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर सोलापूर टॅलेंट सर्च परीक्षेतील इयत्ता ५ वी व इ. ८ वी या वर्गातील प्रथम तीन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. इयत्ता १२ वी शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना सचिन वायकुळे म्हणाले की, आई वडीलांचा आदर करावा. आई म्हणजे चालते बोलते विद्यापीठ असते. तर बाप हा कोणतेही संकट आल्यास आपल्या मागे पर्वतासारखा उभा असतो.

आई वडील लहाणपणी जे शिस्त व संस्कार आपल्याला लावतात तेच पुढील आयुष्यात उपयोगी येतात. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करावा असेही त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. या कार्यक्रमाची प्रस्तावना क्लासचे संचालक सुनील कामतकर यांनी केली. दहावी विद्यार्थांची लिस्ट सुखदा कामतकर, अनुजा जोशी, सुरज हलकुडे सर, प्राजक्ता कुलकर्णी यांनी वाचली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित कामतकर यांनी केले. सुप्रिया मंगरुळे यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी यशवंत तावशे, निलेश गायकवाड, श्रीकांत चिप्पा, अभिषेक उबाळे, मेघराज तिरपेकर, संतोष पुजारी, कृष्णा जंगम, यांनी मेहनत घेतली.

## ज्वालातून उतरली चैतन्यभूमीत फुले; मणिपुरी विद्यार्थ्यांचे आगमन



**ज्ञान प्रबोधिनी, सोलापूरतर्फे मणिपूर येथील वनवासी मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या सहनिवासातील २१ मुले उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी त्यांच्या घरी घेऊन जाण्याकरिता १९ एप्रिलला मी निघालो. पाच दिवसांचा प्रवास करून मुले घरोघरी २३ एप्रिलला पोहोचली.**

### अनब मृत्यू ओशाळला

भुवनेश्वरनंतरचा रेल्वे प्रवास म्हणजे जगण्याची शर्थच होती. खचाखच गर्दी, आरक्षण असूनसुद्धा सहा आसनांवर आम्ही १८ जण बसलो होतो. हालचाल करायला थोडीशीही जागा नव्हती. स्वच्छतागृहात जाणेसुद्धा शक्य नव्हते. डब्यामध्ये दुर्गंधी होती. रणरणत्या उन्हामुळे डबा प्रचंड तापला होता. उकाड्याने जीव कासावीस होत होता. हे सगळे सहन न होऊन आमच्या समोरच एक माणूस धाडकन खाली पडला. दोन-तीन वेळा आचके दिले. आजूबाजूच्या लोकांनी हातपाय चोळले. पण तो आमच्या समोरच गतप्राण झाला. मृत्यू ओशाळला म्हणजे काय हे प्रत्यक्षात पाहिलं. अशा भयावह स्थितीत आमचा प्रवास झाला.

### ज्वालामय मणिपूर

मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचारामुळे तेथील परिस्थिती ही ज्वालामय बनली होती. सगळीकडे भयाचे वातावरण होते. इम्फाळपासून सर्व दिशांना जाणारे रस्ते बंद होते. त्यामुळे तेथे फिरणेच अवघड झाले म्हणून मी सोलापूरला परत आलो.

### मणिपूर पोलिसांचा फोन?

सोलापूरला येऊन पोचतो न पोचतो तोच मणिपूर पोलिसांचा मला फोन आला. त्यांनी मला विचारले, "तुम्ही कोठे आहात?" मी सांगितले, "मी सोलापुरात आहे." त्यावर त्यांनी म्हटले की, "इनर लाईन परमिट तुम्ही जाताना जमा का केले नाही? तुम्हाला येथील परिस्थिती माहीत नाही का?" मी त्यांची क्षमा मागितली व पुन्हा असे होणार नाही याची ग्वाही दिली.

### अरे वेडा आहेस का ?

मुलांना आणण्यासाठी मी मणिपूरला येत आहे असे सांगण्यासाठी मी तेथील ओळखीच्या लोकांशी संपर्क साधला. 'तू येऊ नकोस.' असाच सर्वांचा सूर होता. एक मित्र तर म्हणाला, ' वेडा आहेस का तू ?' परिस्थिती माहीत असून यायचं म्हणतोय.' पण मुलांना घेऊन यायचे हे पक्के ठरवले होते. त्यामुळे कुणाचेही न ऐकता मी २५ मे रोजी इम्फाळला पोहोचलो.

### मित्रा, बंदूक घे

इम्फाळला पोहोचल्यानंतर नवीन मुले शोधण्यासाठी व मुलांना परत घेऊन जाण्यासाठी माझी धडपड सुरू झाली. तामेंगलाँग, खरासोम, चुराचांदपूर व थोबल मुख्यतः या चार जिल्ह्यांतील मुले आपल्याकडे आहेत. परंतु या तिन्ही ठिकाणी जाण्यासाठी कोणतेही वाहन सुरू नव्हते. सर्वांशी दूरध्वनीवर संपर्क साधून नवीन मुलेही मिळवली आणि जाण्याची योजनाही केली.

या दरम्यान माझ्या संपर्कातील एक मित्र मणिपूरची एकूण परिस्थिती पाहता मला भेटायला आला व येताना एक बंदूक घेऊन आला. तो मला म्हणाला, 'येथील परिस्थिती खूप बिकट आहे. संरक्षणासाठी ही बंदूक तुझ्याकडे ठेव' बंदूक हातात घेताना मजा वाटली; परंतु मी त्याला म्हटले, "याची मला गरज नाही. देव तारी त्याला कोण मारी."

### आम्ही नंतर येऊ

नवे-जुने विद्यार्थी घेऊन मी निघालो. पण ज्या ठिकाणी आपले संगणक प्रशिक्षण केंद्र चालते त्या खोपुम गावच्या समन्वयकाचा दूरध्वनी आला की आम्ही इम्फाळमध्ये पोहोचू शकणार नाही, कारण कोणतेही वाहन इम्फाळपर्यंत चालू नाही. त्यामुळे पुढील दिवसांत थोडीशी मोकळीक मिळाली की मी त्यांना नंतर घेऊन येईन. त्यामुळे दोन मुले येऊ शकली नाहीत.

### दिव्य प्रवास

सोलापूरला येण्यासाठी तामेंगलाँग येथील पाच विद्यार्थी आडवाटेतून २२१ कि.मी. प्रवास करून दिमापूर येथे पोहोचले. खरासोमचे सात विद्यार्थी जीवमुठीत धरून १९७ कि.मी. प्रवास करून दिमापूर येथे पोहोचले.चुराचांदपूरचे चार विद्यार्थी जंगलातून तीन दिवस ९१४ कि.मी. प्रवास करून प्रवास करून गुवाहाटी येथे पोहोचले. लुंगकाव (मणिपूरच्या राणी गायदिन्ल्यू यांचे गाव) येथील दोन विद्यार्थी, यांनी ४१६ कि.मी.चा दोन दिवसांचा खडतर प्रवास करून गुवाहाटी गाठले. मी चार विद्यार्थ्यांना घेऊन इम्फाळहून विमानाने गुवाहाटीला पोहोचलो. सोलापूरहून आयुष हा युवक विमानाने गुवाहाटीला पोहोचला. मी त्या १० मुलांना आयुषजवळ सोपवले आणि बाकीच्या मुलांना घेण्यासाठी गुवाहाटीहून दिमापूरला गेलो. तेथील मुलांना घेऊन गाडीत बसलो. ती गाडी गुवाहाटीला पोहोचल्यावर आयुष दहा मुलांना घेऊन गाडीत आला.

अशा प्रकारे आम्ही दोघे आणि २३ मणिपुरी मुले पुन्हा चार दिवसांचा प्रवास करून दिनांक १४ जून रोजी रात्री सोलापुरात यशस्वीरित्या पोहोचलो. अशा ज्वालामय परिस्थितीत राहणारी ही मुले या चैतन्यभूमीत आपली गुणसुमने विकसित करून सुगंधित होतील, अशी आशा आहे.

**-अनंत अल्लिशे**
**राष्ट्रीय एकात्मता विभाग प्रमुख**

# इंडोनेशिया भूकंपाने हादरला

**। शेकडो नागरिक जखमी, अनेक इमारतींचे नुकसान । रुग्णांवर खुल्या मैदानात उपचार, त्सुनामीचा इशारा**



भूकंपामुळे रुग्णालयातून बाहेर काढण्यात आलेल्या रुग्णांवर खुल्या मैदानात उपचार सुरू करण्यात आले

**जकार्ता, १६ जून**

इंडोनेशियाच्या सुलावेसी बेटावर मंगळवारी सकाळी ६.७ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला, ज्यामुळे संपूर्ण प्रदेश हादरून गेला. मध्य सुलावेसी प्रांताची राजधानी असलेल्या पालु आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर इमारतीचे नुकसान झाले असून, महामार्गाला भेगा पडल्याने वाहतूकही विस्कळीत झाली आहे. रुग्णालयात भरती असलेल्या रुग्णांवर उघड्यावर उपचार करण्याची नामुष्की प्रशासनावर आली.

भूकंपाचा केंद्रबिंदू पालु शहराच्या पूर्वे-आग्नेय दिशेला सुमारे ४३ किलोमीटर अंतरावर, सुमारे १० किलोमीटर खोलीवर होता. भूकंपाची तीव्रता ६.७ इतकी असल्याची माहिती अमेरिकन भूकपशास्त्र विभागाने दिली आहे. भूकंपानंतर त्सुनामीचा इशारा देण्यात आला असून, किनारपट्टीजवळ राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. इंडोनेशियाच्या हवामानशास्त्र, वातावरण आणि भूभौतिकीय संस्थेने म्हटले की, मंगळवारी सकाळी मध्य सुलावेसी प्रांताची राजधानी असलेल्या पालु आणि आसपासच्या परिसरात भूकंपाचे जबर धक्के जाणवले. ६.७ तीव्रतेच्या भूकंपानंतर या भागात पाच सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपाचे धक्के इतके शक्तिशाली होते की, घाबरलेल्या रहिवाशांनी आपली घरे आणि कार्यालये सोडून मोकळ्या जागांकडे धाव घेतली. भूकंप सकाळच्या सुमारास आल्याने नुकसानीची तीव्रता कमी आहे. अनेक भागातील इमारती कोसळल्या असून रुग्णालये खाली करण्यात आले आणि रुग्णांवर खुल्या मैदानात उपचार केले जात असल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. जीवितहानी संदर्भात अद्याप माहिती समोर आलेली नाही. (वृत्तसंस्था)

### आठ वर्षांपूर्वीच्या आठवणी जाग्या

सुमारे आठ वर्षांपूर्वी विनाशकारी भूकंप आणि त्सुनामीचा सामना केलेल्या पालु शहरातील रहिवाशांमध्ये मंगळवारच्या भूकंपामुळे प्रचंड दहशत आहे. बहुतांश नागरिक अजूनही खुल्या मैदानात असून, भीतीमुळे ते घरात जाणे टाळत असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. तीव्र भूकंपाच्या धक्क्याच्या पार्श्वभूमीवर, पालुमधील अनेक रुग्णालयांमधील रुग्णांना तत्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी रुग्णांना उघड्यावर उपचार करत आहे.

### युद्धपातळीवर बचावकार्य

इंडोनेशियाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेने म्हटले की, सध्या बाधित भागांमधून नुकसान, संभाव्य जीवितहानी आणि विस्थापित लोकांबद्दल माहिती गोळा केली जात आहे. ढिगारा हटवण्यासाठी आणि बाधित लोकांना मदत पुरवण्यासाठी बचाव पथके तैनात करण्यात आली. इमारतीच्या ढिगाऱ्यात अडकलेल्या बहुतांश नागरिकांना बाहेर काढण्यात यश आले. अधिकारी सध्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

### घरांचे छप्पर कोसळले, इमारतींना तडे

शहरातील एका प्रतिष्ठित तारांकित हॉटेलचे महाव्यवस्थापक एफेंडी नताली यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, भूकंपाचे धक्के जाणवताच सर्व खोल्या रिकाम्या करण्यात आल्या. अचानक आलेल्या भूकंपाच्या धक्क्यामुळे पाहुण्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दिलासादायक बाब म्हणजे सर्वजण सुरक्षित आहेत आणि हॉटेलच्या इमारतीचे किरकोळ नुकसान झाले. शहराच्या इतर भागांत अनेक घरांचे छप्पर कोसळले, इमारतींनादेखील तडे गेले आहे.

# तृणमूलच्या दोन्ही गटांची बाजू ऐकून घेणार

## ईडी कार्यालयातून अभिषेकला बॅनर्जीला बोलावले

**नवी दिल्ली, १६ जून**

बंडखोर गटाला मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यापूर्वी लोकसभा सभापती ओम बिरला दोन्ही बाजू ऐकणार आहे. ते पक्षांतर केलेल्या तृणमूल बंडखोर खासदारांचे आणिा ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्त्वाखालील गटाला आपआपली बाजू मांडण्याची संधी देतील. या अनुषंगाने सोमवारी तृणमूल कॉंग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांची ईडीकडून चौकशी सुरू असतानाच त्यांना केवळ दोन तासांच्या सूचनेवर सभापती बिरला यांनी हजर राहण्यास सांगितले होते, अशी माहिती तृणमूलच्या सुत्रांनी दिली आहे.



सूत्रांनुसार, अभिषेक बॅनर्जी यांना सोमवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास लोकसभा सभापती कार्यालयातून एक ईमेल आला.त्यात त्यांना दुपारी ४ वाजता बिरला यांना भेटण्यास सांगितले होते. त्यानंतर लगेचच, सभापती कार्यालयाने पक्षाचे खासदार कीर्ती आझाद यांना फोन करून या ईमेलबद्दल माहिती दिली. प्रत्युत्तरादाखल, आझाद यांनी सभापतींच्या कार्यालयाला कळवले की, अभिषेक सर्व तपास यंत्रणांना सहकार्य करण्यास वचनबद्ध असून ते कोलकाता येथील सीजीओ कॉम्प्लेक्समधील ईडी कार्यालयात तपासात चौकशीत व्यस्त आहेत.

तृणमूलच्या बंडखोर २० खासदारांनी नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) मध्ये विलीन होण्याची घोषणा केली. त्यानंतर आम्हाला तृणमूल म्हणून मान्यता मिळावी, असा दावा करणार असल्याचे सांगितले होते. यानंतर हे पत्र आले. यापूर्वी, बंडखोर गटाने एक स्वतंत्र म्हणून मान्यता मिळण्याची मागणी केली होती. या मागणीवर बिर्ला कायदेशीर मत घेण्याची शक्यता आहे. गटाच्या मागणीवरील निर्णय पावसाळी अधिवेशनापूर्वी घेतला जाईल. (वृत्तसंस्था)

### निर्णय केंद्रीय कायदा मंत्रालयाच्या लेखी मतावर

बंडखोर गटाला मान्यता द्यायची की नाही, याचा निर्णय केंद्रीय कायदा मंत्रालयाच्या लेखी मतावर आधारित असेल. ते एका वरिष्ठ कायदा अधिकाऱ्याशी सल्लामसलत केल्यानंतर दिले जाईल. याबाबत कायदेशीर मत मागवले जाईल जेणेकरून अध्यक्षांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिल्यास ते न्यायालयीन छाननीत टिकू शकेल.

## ‘शिगेला’चे एकूण १४६ रुग्ण

**पाच जणांचा झाला मृत्यू**

**तिरुवनंतपुरम, १६ जून**

या वर्षी जानेवारीपासून राज्यात ‘शिगेला’ संसर्गाची १४६ प्रकरणे नोंदविली गेली आहेत आणि त्यापैकी ७० प्रकरणे जून महिन्यात आढळली, असे केरळचे आरोग्यमंत्री के. मुरलीधरन यांनी मंगळवारी सांगितले. शिगेलामुळे झालेल्या पाच मृत्यूंपैकी एक मृत्यू मार्चमध्ये आणि उर्वरित चार मृत्यू जूनमध्ये झाले, असे येथे एका आढावा बैठकीचे अध्यक्षपद भूषविल्यानंतर मुरलीधरन यांनी सांगितले.

मंत्र्यांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते जून या कालावधीत या जिवाणूजन्य संसर्गाची सर्वाधिक ७४ प्रकरणे कोझिकोड जिल्ह्यात नोंदविली गेली. त्यानंतर मलप्पुरम २५ प्रकरणे, ज्यात दोन मृत्यूंचा समावेश आहे आणि तिरुवनंतपुरम येथेही २५ प्रकरणे या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. या वर्षी आतापर्यंत राज्याच्या पथानामथिट्टा, पलक्कड आणि कासारगोड जिल्ह्यांमध्ये शिगेला संसर्गाची एकही घटना नोंदविली गेलेली नाही, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘गदर’ चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण



**मुंबई :** सनी देओल आणि अमीषा पटेल अभिनीत ‘गदर’ हा चित्रपट १५ जून २००१ रोजी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटासाठी चित्रपटगृहांबाहेर सकाळपासूनच लांबच लांब रांगा लागत होत्या. ‘गदर: एक प्रेम कथा’ चित्रपटाच्या प्रदर्शनाला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्याचा रौप्यमहोत्सवी सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी सनी देओल, अमीषा पटेल, दिग्दर्शक अनिल शर्मा आणि चित्रपटातील इतर कलाकार एकत्र दिसले. कार्यक्रमात सनी देओलने केक कापला आणि अमीषा पटेलसोबत फोटो काढले. सुमारे १८ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १३३ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती. तर, याच्या दुसऱ्या भागा ‘गदर २’ ने बॉक्स ऑफिसवर एकूण ६९१ कोटी रुपयांपेक्षा जास्त शानदार वर्ल्डवाइड कलेक्शन केले होते. ज्याचे बजेट ६० कोटी रुपये होते. चित्रपटाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यादरम्यान सनी देओलने अमरीश पुरींना आठवून अमरीशजी आज आपल्यात नाहीत, पण ते नेहमी आपल्या हृदयात राहतील, असे म्हटले.

### कॉर्बेट टायगर रिझर्व्हमध्ये पोहोचला चंकी पांडे

**नैनीताल :** बॉलिवूड अभिनेते चंकी पांडे कॉर्बेट टायगर रिझर्व्हमध्ये पोहोचला. त्यांच्या आगमनाने पर्यटक आणि स्थानिक लोकांमध्ये उत्साह दिसून आला. अभिनेत्याने कॉर्बेटच्या नैसर्गिक सौंदर्याचा आणि वन्यजीवांचा जवळून अनुभव घेण्यासाठी जंगल सफारीचा आनंद घेतला. सफारीदरम्यान चंकी पांडे याने कॉर्बेटच्या समृद्ध जैवविविधता असलेल्या क्षेत्रांना भेट दिली. त्याने येथील नैसर्गिक वातावरण, घनदाट हिरवळ, वन्यजीवांची उपस्थिती आणि शांत वातावरणाचे कौतुक केले. कॉर्बेटचे नैसर्गिक सौंदर्य आणि वनसंपदा देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करते, असे अभिनेत्याने सांगितले. त्याने हत्ती सफारीशी संबंधित एका महावताची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये आपुलकीची चर्चा झाली आणि चंकी पांडे यांनी महावत आणि त्याच्या हत्तीसोबत फोटोही काढले.



### ‘प्रीतम अँड पेड्रो’चा ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई :** अरशद वारसी ‘प्रीतम अँड पेड्रो’ या मालिकेत झळकणार आहे. यावेळी प्रेक्षकांना विनोदासोबतच सायबर गुन्ह्यांवर आधारित कथानकही पाहायला मिळणार आहे. दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी ही मालिका तयार केली असून, यात अनेक दिग्गज बॉलीवूड कलाकार झळकणार आहेत. या मालिकेत विक्रांत मेस्सी खलनायकाची भूमिका साकारत आहे. या मालिकेत अर्शद वारसी व्यतिरिक्त, वीर हिरानी देखील पेड्रोच्या भूमिकेत दिसणार आहे. विक्रांत मेस्सी व्यतिरिक्त, मोना सिंग आणि बोमन इराणी देखील दिसणार आहेत. सत्यदीप मिश्रा आणि श्रुती मराठे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसतील. ही मालिका ३ जुलै रोजी जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होईल.




# तरुणांनी योग स्वीकारल्याचा आनंद : मोदी

## डॉ. रॉबर्ट गॅफ्रिक यांच्या कामाची घेतली दखल



योग करताना ब्राटिस्लाव्हाचे तरुण. योगाभ्यासाचे निरीक्षण करताना पंतप्रधान मोदी

**ब्राटिस्लाव्हा, १६ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांनी स्लोव्हाकियाची राजधानी ब्राटिस्लाव्हा येथे शाळकरी मुलांनी सादर केलेल्या विशेष योगासनांच्या प्रात्यक्षिकांचा आनंद घेतला. युरोपच्या आठवडाभराच्या दौऱ्यावर असताना ब्राटिस्लाव्हा येथे असलेल्या मोदींनी वाराणसीवर आधारित एका आकर्षक प्रदर्शनालाही भेट दिली.

स्लोव्हाकियातील शाळकरी मुलांनी सोमवारी सादर केलेल्या विशेष योगासनांच्या प्रात्यक्षिकांचा अनुभव घेताना मला आणि राष्ट्राध्यक्ष पेलेग्रिनी यांना खूप आनंद झाला, असे मोदींनी मंगळवारी ‘एक्स’वर पोस्ट केले. जग आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिशेने वाटचाल करीत असताना, तरुणांनी योगाचा स्वीकार केलेला पाहून आनंद होतो. तसेच, योग लोकांना आरोग्याच्या आणि कल्याणाच्या भावनेने एकत्र आणत असल्याचे पाहूनसमाधान वाटते, असे त्यांनी पोस्ट केले. मोदींनी ब्राटिस्लाव्हामध्ये बनारसशी जोडणारा दुवा, यावरही प्रकाश टाकला. ब्राटिस्लाव्हा येथील राष्ट्राध्यक्ष भवनात राष्ट्राध्यक्ष पेलेग्रिनी आणि मी वाराणसीवर आधारित एका आकर्षक प्रदर्शनाला भेट दिली. या प्रदर्शनात वाराणसीला अलिकडेच भेट दिलेल्या स्लोव्हाक कलाकारांच्या कलाकृतींचाही समावेश होता, असे त्यांनी ‘एक्स’वर म्हटले आहे. गॅफ्रिक यांनी मूळ संस्कृतमधून स्लोव्हाक भाषेत १० मुख्य उपनिषदांचा अनुवाद करण्यासाठी पाच वर्षे समर्पित केली आहेत. (वृत्तसंस्था)

### स्लोव्हाक भाषेतील भाषांतर उपलब्ध

स्लोव्हाक अकॅडमी ऑफ सायन्सेसच्या ‘वेदा’ या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेला हा अनुवाद, उपनिषदांचे मूळ संस्कृतमधून स्लोव्हाक भाषेतील भाषांतर उपलब्ध करून देतो. पंतप्रधान मोदींनीही २०२४ मधील ‘मन की बात’ कार्यक्रमात या उपक्रमाचे कौतुक केले होते. त्यांनी याला आपली संस्कृती जतन आणि संवर्धित करण्यावर भर देणारा प्रेरणादायी उपक्रम असे संबोधले आहे.

## रहमान परतले विमानतळावरून

**ढाका, १६ जून**

बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांचे धोरण आणि रणनीती सल्लागार झाहिद उर रहमान यांना दिल्ली विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी तब्बल दोन तास तपासणीसाठी थांबवून ठेवले. यावरून नाराजी व्यक्त करीत ते विमानतळावरूनच मायदेशी परतले. यामुळे भारत आणि बांगलादेशमधील राजनैतिक तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

तपासणीसाठी थांबवून ठेवल्याने त्यांनी संताप व्यक्त केला आहे. एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, भारतीय सुरक्षा यंत्रणेच्या वर्तणुकीने मला मनःस्ताप झाला. त्यामुळे भारतात प्रवेश न करताच मी कोलंबोमार्गे ढाका गाठले. विशेष म्हणजे, भारतावर केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे त्यांना विमानतळावर रोखण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेवर बांगलादेश सरकारने तीव्र आक्षेप घेतला असून ढाका येथे भारताच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना समन्स बजावून तीव्र नाराजी व्यक्त केली. रहमान ‘इंडियन ओशन रिम असोसिएशन’च्या बैठकीत बांगलादेशच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी दिल्लीच्या दौऱ्यावर होते. त्यांच्याकडे सामान्य बांगलादेशी पासपोर्ट आणि ‘सार्क’ व्हिसा होता. त्यांनी यापूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. (वृत्तसंस्था)

**द्विशा मृत्यू प्रकरण**

## पती-सासूच्या कोठडीत वाढ

**भोपाळ, १६ जून**

मॉडेल द्विशा शर्माच्या संशयित मृत्यू प्रकरणी भोपाळ न्यायालयाने मंगळवारी हुंडाबळी व छळाचे आरोप असलेले तिचे पती समर्थ सिंग आणि सासू व माजी न्यायाधीश गिरीबाला सिंग यांच्या न्यायालयीन कोठडीला १४ दिवसांची मुदतवाढ दिली आहे.

द्विशाच्या कुटुंबीयांची बाजू मांडणारे वकील अंकुर पांडे यांनी सांगितले की, न्यायाधीश शोभना भालावे यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत दोन्ही आरोपी व्हर्च्युअली सहभागी झाले होते. केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) ३० जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी वाढविण्याची मागणी केली होती, जी न्यायालयाने मान्य केली. दोन्ही आरोपी सध्या भोपाळच्या मध्यवर्ती कारागृहात आहेत. द्विशा १२ मे रोजी भोपाळमधील तिच्या सासरच्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली होती. तपासात त्रुटी असल्याच्या आरोपांनंतर तपास सीबीआयकडे सोपविण्यात आला. २ जूनला न्यायालयाने दोन्ही आरोपींना १६ जूनपर्यंत १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. (वृत्तसंस्था)

## सुटका झालेल्या भारतीय खलाशांसोबत संवाद

**दुबई, १६ जून**

ओमानमधील भारताचे राजदूत प्रशांत पिसे यांनी मंगळवारी ‘एमटी सेटेबेलो’ या जहाजावरील सुखरूप सुटका झालेल्या २१ भारतीय खलाशांची भेट घेतली आणि त्यांच्याशी संवाद साधला. हे खलाशी आता मायदेशी परतत आहेत.

१० जून रोजी अमेरिकेने ‘पलाऊ’चा ध्वज असलेल्या ‘एमटी सेटेबेलो’ या टँकरवर हल्ला केला, ज्यामध्ये त्यावरील २४ भारतीय खलाशांपैकी तिघांचा मृत्यू झाला. हल्ला झाला तेव्हा ‘एमटी सेटेबेलो’ हे जहाज ओमानच्या किनाऱ्यापासून सुमारे ३० नॉटिकल मैल अंतरावर होते, अशी माहिती भारतीय दूतावासाने ‘एक्स’वर दिली. भारतीय दूतावासाच्या माहितीनुसार, जहाजावरील २१ भारतीय कर्मचारी सुखरूप मायदेशी परतत आहेत. प्रवासाला निघण्यापूर्वी, राजदूतांनी या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. (वृत्तसंस्था)

# स्थायी सदस्यत्व वाढीशिवाय सुधारणा अमान्य

**। संयुक्त राष्ट्रात भारताने मांडली भूमिका । निर्णय प्रणालीमध्ये बदल गरजेचे**

**संयुक्त राष्ट्र, १६ जून**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील तात्पुरत्या जागांची संख्या वाढवणे ही पुरेशी सुधारणा नाही. खऱ्या बदलासाठी विद्यमान स्थायी सदस्यत्व आणि निर्णय प्रणालीमध्येही सुधारणा करणे आवश्यक आहे. नवीन वाटाघाटींची प्रक्रिया लेखी मसुदा, निश्चित कालमर्यादा आणि व्यापक सहमतीवर आधारित असावी, अशा शब्दांत भारताने संयुक्त राष्ट्रात सुरक्षा परिषदेतील सुधारणांवर भूमिका मांडली.

सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्यासंदर्भात झालेल्या चर्चेत बोलताना संयुक्त राष्ट्रातील भारताचे स्थायी प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश यांनी म्हटले की, दोन वर्षांच्या तात्पुरत्या सदस्यत्व श्रेणीचा विस्तार करणे हे सहमतीचे लक्षण मानणे हे केवळ चित्राचा एक भाग आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणा केवळ तात्पुरत्या सदस्यांची संख्या वाढवण्यापुरती मर्यादित राहिली, तर ती अपूर्ण आणि व्यावहारिकदृष्ट्या अयशस्वी मानली जाईल, कारण त्यामुळे सुरक्षा परिषदेच्या निर्णय घेण्याच्या खऱ्या अधिकार रचनेत (म्हणजेच, पाच स्थायी देशांचे नियंत्रण) बदल होणार नाही. देश आणि गट खूप काळापासून खऱ्या आणि अर्थपूर्ण सुधारणांची वाट पाहत आहेत.

आंतर सरकारी वाटाघाटी प्रक्रिया ही संयुक्त राष्ट्रांच्या इतर प्रक्रियांपेक्षा वेगळी असू नये. या सर्व वाटाघाटींचा आधार एक लेखी ठराव असावा, ज्यावर सर्व गट आणि सदस्य राष्ट्रे आपली मते व्यक्त करतील. (वृत्तसंस्था)

### कालमर्यादा निश्चित करावी



हरीश पुढे म्हणाले की, सुरक्षआ परिषदेतील सुधारणांसाठी लेखी ठराव तयार करण्यात यावा. या ठरावात स्पष्ट उद्दिष्ट्ये, टप्पे आणि कालमर्यादा निश्चित केल्या पाहिजेत, जेणेकरून सर्व देश आणि गट पद्धतशीर आणि फलदायी वाटाघाटींमध्ये सहभागी होऊ शकतील. त्यानंतर गरज पडल्यास मध्यम मार्ग काढता येईल. विद्यमान दस्तऐवज अधिक संतुलित व वस्तुनिष्ठ बनवण्यासाठी त्यात सुधारणा करावी अशी भारताची भूमिका आहे.

### आफ्रिकन देशांना प्रतिनिधित्व मिळावे

प्रादेशिक प्रतिनिधित्वाच्या बाबतीत आफ्रिकन देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळणे गरजेचे आहे. आफ्रिकन मॉडेलवर झालेल्या चर्चेत बहुतांश देशांनी पाठिंबा दिला आहे. परंतु अद्यापही स्थायी सदस्य असलेल्या देशांनी त्याला मान्यता दिली नाही. बहुतांश सदस्य देशांनी कायमस्वरूपी जागांच्या विस्ताराला पाठिंबा दिला असला तरी, प्रत्यक्षात त्याच्या अंमलबजावणीवर एकमत झालेले नाही. स्थायी जागांच्या विस्ताराच्या बाजूने अनेक देश सहमत असले तरी, दस्तऐवजात तसा उल्लेख करण्यात आला नसल्याचे हरीश यांनी लक्षात आणून दिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# ‘ते’ १०७ दिवस...

जवळपास पावणेचार महिने जगभर अस्वस्थतेचे सावट पसरले होते. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात पेटलेल्या संघर्षाने संपूर्ण जगाला चिंतेच्या गर्तेत ढकलले होते. अखेर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या युद्धबंदीच्या घोषणेनंतर हा संघर्ष थांबण्याची चिन्हे दिसू लागली आणि तब्बल १०७ दिवसांनंतर युद्धाच्या ज्वाला शांत झाल्या आहेत. ज्या संघर्षाने जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आणून उभे केले होते, तो सध्या तरी थांबला आहे. मात्र, या संघर्षाने दिलेल्या जखमा सहज भरून निघणाऱ्या नाहीत. या १०७ दिवसांच्या भीषण संघर्षाने केवळ अमेरिका, इस्रायल आणि इराण यांनाच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीलाच हादरवून सोडले. जागतिक अर्थव्यवस्था डळमळली, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये अविश्वासाची दरी रुंदावली आणि सामान्य माणसाच्या मनात भविष्याविषयीची असुरक्षितता वाढली. इतिहास असे सांगतो की, युद्धाच्या रणांगणावर विजयाचा झेंडा कोणाच्याही हाती लागला तरी खरी किंमत संपूर्ण मानवजातीला मोजावी लागते. युद्धात प्रत्यक्षात कोणीही कधीच जिंकत नसतो; जिंकतो तो फक्त विध्वंस. युद्ध कधीतरी संपते, तह होतात; पण युद्धाने निर्माण केलेल्या जखमा आणि मानसिक आघात पिढ्यानपिढ्या जिवंत राहतात. युद्धसमाप्तीची घोषणा निश्चितच दिलासादायक आहे, पण काळाने दिलेली अस्वस्थता इतिहासात कायमची नोंदविली जाईल.

एकेकाळी युद्धे फक्त सीमांवर लढली जात होती; आता ती बाजारपेठांमध्ये, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात, सायबर जगतात आणि माहितीच्या प्रवाहातही लढली जात आहेत. त्यामुळे युद्धाचा फटका जगाच्या कानाकोपऱ्यातील सामान्य नागरिकांनाही बसतो. आजचे जग परस्परांशी घट्ट जोडले गेले आहे. एका देशातील अस्थिरता दुसऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेला हादरा देते. एका भागातील युद्ध संपूर्ण जगातील बाजारपेठांवर परिणाम करते.

आतापर्यंत झालेले कोणतेही युद्ध मानवी समुदायाच्या कल्याणासाठी कामी आले नाही. पहिल्या महायुद्धाची आठवण आजही जग विसरलेले नाही. १९१४ ते १९१८ या काळात चाललेल्या त्या युद्धात लाखो सैनिक मृत्युमुखी पडले. युरोपमधील संपूर्ण पिढी उद्ध्वस्त झाली. युद्ध संपले, पण त्यातून निर्माण झालेली अस्थिरता पुढे दुसऱ्या महायुद्धाचे कारण ठरली. म्हणजे युद्धाने प्रश्न सुटले नाहीत; उलट त्यात दुसऱ्या युद्धाची बीजे रोवली गेली. दुसरे महायुद्ध हे मानवी इतिहासातील सर्वात मोठी शोकांतिका ठरले. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्ब हल्ल्यांनी विज्ञानाच्या प्रगतीचा काळा चेहरा जगाला दाखवला. काही सेकंदात लाखो स्वप्ने राख झाली. युद्ध जिंकणारे आणि हरणारे वेगळे असतील; पण मृत्यू, वेदना आणि विनाश मात्र दोन्ही बाजूंना सारखेच मिळाले. व्हिएतनाम युद्ध हे आणखी एक उदाहरण. महासत्तेच्या लष्करी शक्तीसमोर एक छोटा देश उभा राहिला. दशकानुदशके संघर्ष सुरू राहिला. लाखो लोक मारले गेले. शेवटी युद्ध थांबले. पण, जखमा आजही ताज्या आहेत. या पृष्ठभूमीवर इराण आणि अमेरिका यांच्यात शांतता करारावर मतैक्य झाल्याने जगाला मोठा दिलासा मिळणार आहे. युद्धसमाप्तीचा पहिला आणि सर्वात मोठा फायदा म्हणजे तेल बाजाराला मिळणारे स्थैर्य. जगातील मोठ्या प्रमाणातील तेल वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. या मार्गावर संकट निर्माण झाल्याने तेलाचे दर गगनाला भिडले. तेल महागल्याने वाहतूक महागते, उद्योगांचा खर्च वाढतो आणि महागाईचा भडका उडतो. त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होतो. पेट्रोल-डिझेलपासून ते दैनंदिन जीवनातील वस्तूंच्या किमती वाढतात. युद्धबंदीमुळे यापुढच्या काळात तेलाचे दर नियंत्रणात राहण्याची शक्यता आहे. युद्धबंदीचा दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे व्यापाराला मिळणारी गती. युद्धाच्या काळात समुद्री मार्गांवर धोका असल्यामुळे जहाज वाहतूक मंदावते, महाग होते. विमा खर्च वाढतो. अनेक उद्योगांवर त्याचा परिणाम होतो. संघर्ष थांबल्यानंतर व्यापारी मार्ग पुन्हा सुरळीत होतात. जागतिक पुरवठा साखळी सुरळीत राहते. उद्योग, व्यापार आणि रोजगाराला चालना मिळते.

मात्र, युद्धसमाप्तीची घोषणा म्हणजे सर्व प्रश्नांचे अंतिम उत्तर नव्हे. युद्धाची राख थंड होण्यासाठी वेळ लागतो आणि विश्वासाचे पूल पुन्हा उभारण्यासाठी त्याहून अधिक वेळ लागतो. राष्ट्रांमधील मतभेद, हितसंबंध आणि वर्चस्वाच्या आकांक्षा एका कराराने संपत नाहीत. त्यामुळे शांततेचा हा क्षण टिकवून ठेवण्यासाठी सर्व संबंधित राष्ट्रांनी अधिक संयम, जबाबदारी आणि दूरदृष्टी दाखवावी लागणार आहे. या संघर्षाने जगाला एक महत्त्वाचा धडा दिला आहे. तो असा की, आधुनिक युगात कोणतेही राष्ट्र स्वतंत्र बेटासारखे राहू शकत नाही. अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, ऊर्जा, व्यापार आणि सुरक्षा या सर्व गोष्टी एकमेकांशी इतक्या घट्ट जोडल्या गेल्या आहेत, की एका भागातील अस्थिरता संपूर्ण जगाला अस्वस्थ करून सोडते. आज मानवजातीसमोर हवामान बदल, गरिबी, उपासमार, आरोग्य आणि वाढती विषमता यांसारखी गंभीर आव्हाने उभी आहेत. आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये उपासमारीचा उग्र प्रश्न आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी जगाने आपली बुद्धिमत्ता, संसाधने आणि ऊर्जा खर्च करणे आवश्यक आहे. हीच ऊर्जा युद्धाच्या विनाशाच्या दिशेने वापरली जाते. युद्धाच्या नकोशा आठवणींमधून बाहेर पडताना जगाने आता संघर्षापेक्षा सहकार्याचा, संशयापेक्षा विश्वासाचा आणि स्पर्धेपेक्षा सहअस्तित्वाचा मार्ग निवडणे गरजेचे आहे. युद्धे अनेकदा सीमा बदलतात, सत्ता बदलतात; पण शांतता माणसांचे भविष्य बदलते आणि कोणत्याही सभ्य समाजाची खरी ओळख त्याच्या युद्धक्षमतेने नव्हे, तर शांतता, विकास आणि मानवतेप्रति असलेल्या बांधिलकीने ठरत असते. इराण-अमेरिका संघर्षामुळे आपण केवळ काही दिवसांची स्थिरता गमावली असे नव्हे. जगाचे बरेच नुकसान झाले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जागतिक शांततेला धक्का बसला. अनेक वर्षांच्या राजकीय प्रयत्नांनंतरही मतभेद पुन्हा युद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधांतील विश्वास कमी झाला. जगातील महासत्ता आणि प्रादेशिक शक्ती यांच्यातील तणाव किती वेगाने वाढू शकतो, याची पुन्हा प्रचीती आली. दुसरे म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्थेने मोठी किंमत मोजली. तेलाच्या किमतींमध्ये झालेली चढ-उतार, शेअर बाजारातील अस्थिरता, व्यापारातील अनिश्चितता आणि वाढलेला वाहतूक खर्च याचा परिणाम जगभरातील सामान्य नागरिकांवर झाला. संघर्ष हजारो किलोमीटर दूर असला, तरी त्याची झळ प्रत्येक देशातील ग्राहकांना बसली. तिसरे म्हणजे, मानवी विकासासाठी जे वापरता आले असते, ते संसाधन युद्धात खर्ची पडले. आजच्या घडीला जगातील सर्वच राष्ट्रांनी भूतकाळाच्या अनुभवांतून योग्य धडा घेऊन पुढे जाण्याची गरज आहे. त्यासाठी युनोसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठाने गांभीर्याने प्रयत्न केले पाहिजेत. सारे जग महाशक्तींच्या दावणीला बांधले जात असेल आणि युद्धखोरी अनियंत्रित पद्धतीने वाढत राहणार असेल तर युनोच्या अस्तित्वाला कोणताही अर्थ उरत नाही. संघर्ष आणि युद्ध यांच्या मागे धावत बसण्यापेक्षा विकास, शिक्षण, संशोधन आणि परस्पर सहकार्य यांना केंद्रस्थानी ठेवले तरच खरी आणि टिकाऊ प्रगती साधता येते. तशी दिशा युनोने द्यावी. महाशक्ती आणि अन्य राष्ट्रांनी युनोला प्रतिसाद द्यावा. युद्धाने कधीही कायमस्वरूपी समाधान दिलेले नाही; उलट ते अनेक समस्यांची बीजे पेरून जाते. त्यामुळे आता युद्धाच्या सावल्या मागे सोडून शांततेच्या प्रकाशाकडे निरंतर वाटचाल करणे हेच जगाचे खरे ध्येय असायला हवे. युद्धातून शिकायचे तर नवे युद्ध नको. इतिहासात भरपूर युद्धे आहेत आणि त्यांचे धडेही आहेत. १०७ दिवसांचा धडा तर अगदी ताजा आहे. ■

## धर्म-संस्कृती

# सप्तकुल पर्वत

प्रा. दिलीप जोशी

भारतीय संस्कृतीत प्रातःस्मरणीय बाबींमध्ये सप्त पर्वतांचा समावेश आहे. ‘सप्तार्णवः सप्त कुलाचलाश्च सप्तर्षयो द्वीप वनानि सप्त।’ या श्लोकात ‘सप्त कुलाचल’ असा उल्लेख आहे. पुराणात पर्वत श्रेण्यांना ‘कुलाचल’ किंवा ‘कुलपर्वत’ म्हणतात. पृथ्वीचे सर्वत्र संतुलन राखणाऱ्या पर्वतांचा विष्णू पुराण, मार्कण्डेय पुराण, भविष्य पुराण, रामायण आणि महाभारतात उल्लेख आहे. यासाठी दोन श्लोक प्रसिद्ध आहेत.

‘महेंद्रो मलयः सह्यो शुक्तिमान् ऋक्षवानपि।
विन्ध्यश्च परियात्रश्च सप्तैते कुलपर्वताः ॥’

या श्लोकात सप्त कुल पर्वतांचा उल्लेख आहे. दुसरा श्लोकही अधिक प्रचलित आहे.

‘महेंद्रो मलयः सह्यो देवतात्मा हिमालयः।
ध्येयो रैवतको विंध्यो गिरिश्चारावलिस्तथा ॥’

पहिल्या श्लोकानुसार- १) महेंद्र पर्वत २) मलय पर्वत ३) सह्याद्री पर्वत ४) शुक्तिमान पर्वत ५) ऋक्ष पर्वत ६) विंध्य पर्वत ७) परियात्र पर्वत. यांचे उल्लेख विष्णुपुराणातही विशेषत्वाने आढळतात. दुसरा श्लोक हा भविष्य पुराणाशी सदृश असून त्यानुसार- १) महेंद्रगिरी २) मलयगिरी ३) सह्यगिरी ४) हिमगिरी ५) रैवतकगिरी ६) विंध्यगिरी ७)अरावली गिरी. याशिवाय अनेक पर्वतांची नावे निरनिराळ्या ग्रंथातून आपणास माहीत आहेत. त्यातील काही पर्वतांचे भागही आहेत. जसे- गंधमादन पर्वत, द्रोणागिरी पर्वत, कैलास पर्वत, ऋषमुख पर्वत इत्यादी. आज आपण सर्वपरिचित वरील दुसऱ्या श्लोकानुसार सप्तकुलाचलाचा विचार करू.

**१) महेंद्र पर्वत** : सप्त पर्वतश्रेणीतील हा प्रथम असलेला महेंद्रगिरी. ओडिशा राज्यातील प्रामुख्याने गजपती जिल्ह्यातील या पर्वतावर भगवान परशुरामांचे आजही वास्तव्य असल्याबाबत आपली दृढ श्रद्धा आहे. भगवान परशुरामांनी इथेच तपश्चर्या केली होती. पांडव वनवासात असताना काही काळ इथे व्यतीत केल्याच्या खुणा या पर्वतावर आहेत. पांडवांनी स्थापन केलेले प्रसिद्ध गोकर्णेश्वर मंदिर इथे आहे.महेंद्रतनया, मुळी, शराव, विमला अशा नद्यांचा उगम याच पर्वतावरून होतो.

**२) मलयगिरी** : सप्तकुल पर्वतातील अत्यंत प्रसिद्ध असा मलय पर्वत आहे. मत्स्यपुराण आणि विष्णुपुराणात उल्लेख असलेला हा पर्वत दक्षिण भारतात कर्नाटक, तामिळनाडू ते पार केरळला भिडला आहे. चंदनासाठी प्रसिद्ध असलेला हा पर्वत अनेक कवी आणि साहित्याचा भाग आहे. ‘मलयगिरीचा चंदन गंधित वारा’ म्हणजे मलय पवन किंवा मलय समीर म्हणतात. ‘मलये भिल्ल पुरंध्री चंदनतरुं अग्निकाष्ठं कुरुते’ या श्लोकातून मलयपर्वतावरील चंदनवृक्षांची विपुलता सिद्ध होते. मत्स्यपुराणानुसार प्रलयाच्या वेळी मनू ऋषींची नौका याच पर्वतावर स्थिरावली होती. हनुमंतांनी आणलेल्या द्रोणागिरीचा एक भाग याच पर्वतावर पडल्यामुळे या गिरीला संजीवन गिरी म्हणतात. रामायणात सुग्रीवाने या पर्वताचे वर्णन केले आहे. अगस्ती ऋषींनी काही काळ इथे वास्तव्य केले आहे.

**३) सह्यगिरी** : सह्याद्री नावाने प्रसिद्ध असलेला हा पर्वत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडूमध्ये पसरलेला आहे. गोदावरी, कृष्णा, कावेरी इत्यादी नद्यांनी अभिसिंचित केलेला सह्याद्री पर्वत भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, घृष्णेश्वर या ज्योतिर्लिंगांनी मंतरलेला आहे. दंडकारण्याचा भाग असलेला सह्यपर्वत भगवान परशुरामांच्या वास्तव्याने पवित्र झाला आहे.

**४) देवतात्मा हिमालय** : सप्तकुल पर्वतांचा राजा म्हणजे हिमालय. हिमगिरी म्हणजे आध्यात्मिक चेतनेचे केंद्र. या पर्वतावर कायम बर्फ असल्याने हिमालय. देवतात्मा म्हणजे देवतांचा आत्मीय अर्थात देवतांना प्रिय असलेला, देवांचे वास्तव्य असणारा म्हणून देवतात्मा हिमाद्री पर्वत. भगवान शिव आणि पार्वतीचे कायम निवासस्थान असलेला कैलास पर्वत आणि सुप्रसिद्ध मानस सरोवर हिमालयाचाच भाग. येथूनच स्वर्गीय नद्या गंगा, यमुना आणि ब्रह्मपुत्रा यांचा उगम आहे. पवित्र असे बद्रीनाथधाम, केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्री याच पर्वतावर आहेत. स्वर्गाचे द्वार येथूनच आहे.

**५) रैवतक पर्वत** : प्रातःस्मरणीय पर्वतातील अत्यंत श्रद्ध पर्वत असलेल्या रैवतक पर्वताला गिरनार पर्वत असेही म्हणतात. सौराष्ट्र गुजराथ प्रदेशात पसरलेल्या या पर्वत प्रदेशात महाराज रैवताचे राज्य होते म्हणून हा रैवतक गिरी. याच रैवत राजाची पुत्री रेवती ही बलरामदादांची पत्नी होती. येथून जवळच भगवान श्रीकृष्णाने देवशिल्पी विश्वकर्म्याच्या हाताने द्वारका नगरी वसवली होती. अर्जुनाने सुभद्राहरण केले ते याच रैवतक पर्वतावरून. नाथ संप्रदायासाठी हा पर्वत अत्यंत पवित्र आहे. येथील सर्वात उंच शिखरावर भगवान दत्तात्रेयाचे स्थान आहे. रैवतक गिरी अर्थात गिरनार पर्वतावर दत्तसंप्रदायातील भाविक मोठ्या आर्त भावाने दहा हजार पायऱ्या चढून कृतकृत्य होतात.

**६) विंध्यपर्वत** : विंध्याचल नावाने प्रसिद्ध असा हा पर्वत मध्यभारतात मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश, बिहार असा विस्तीर्ण पसरला आहे. वेद, पुराण, रामायण आणि महाभारतात उल्लेख असलेला हा सप्तकुल पर्वत महामुनी अगस्ती ऋषींचा शिष्य आहे. एकदा हिमालय आणि विंध्य पर्वतात उंचीवरून स्पर्धा लागली. विंध्य पर्वत पार आकाशाला भिडला. त्यामुळे दक्षिण भारतात सूर्यकिरणे पोहोचू शकत नव्हती. त्यामुळे सर्वांनी अगस्ती ऋषींना प्रार्थना केली. विंध्य पर्वताला चंबळनदी, सोन नदी, तमसा आणि नर्मदा अभिसिंचित करतात. याच पर्वतावर विंध्यवासिनी आदिशक्ती महाशक्ती जगदंबा निवास करते. या विंध्यांचलाचे नित्य स्मरण जीवनात प्रकाश निर्माण करून सकारात्मकता प्रदान करते.

**७) अरावली पर्वत** : प्रातःस्मरणीय पर्वतातील एक कुलगिरी म्हणजे अरावली पर्वत. गुजरात, राजस्थान, हरयाणा प्रदेशात विस्तारित पर्वत भगवान वराह नारायणाचे निवासस्थान म्हणून ओळखतात. अरावली म्हणजे पर्वताची रांग. पुराण काळातील वेदवती, चर्मन्वती, वेत्रवती, क्षिप्रा, साबरमती अशा नद्यांचा परीसस्पर्श झालेला अरावली पर्वत आहे. राक्षसांचे गुरू शुक्राचार्य याच पर्वतावर निवासी होते. प्रसिद्ध माऊंट अबू अरावलीचा हिस्सा आहे. थोडक्यात सप्तकुलाचल म्हणजे सात प्रातःस्मरणीय पर्वत आपल्या भारतीय संस्कृतीत पवित्र मानले आहेत. पर्यावरण, सृष्टी हे केवळ चर्चेचे, गप्पांचे विषय नसून भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्यक्ष आचरणाचे साधन आणि साधना मानतो. म्हणूनच सृष्टीतील सर्व घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सप्तकुल पर्वत त्यातील महत्त्वाचा घटक आहे. त्यांची प्राथमिक माहिती नव्या पिढीला व्हावी म्हणून शब्दप्रपंच! ■

९८२२२६२७३५

## वेध

गिरीश शेरेकर

# अल-निनोचा प्रभाव; पाणी जपून वापरा

गेल्या अनेक महिन्यांपासून विविध संस्था यंदा अल-निनोचा प्रभाव राहील, असे सांगत आहेत. ‘युरोपियन सेंटर फॉर मीडियम- रेंज वेदर फोरकास्ट्स’ने याच महिन्यात ‘सुपर अल-निनो’चा अंदाज वर्तविला आहे. हा सक्रिय झाल्यास भारतात अतिशय भीषण दुष्काळ, तीव्र उष्णता परिणामस्वरूप पिकांची हानीही होईल, अशी भीती तज्ज्ञांना आहे. सुपर सक्रिय होणार की नाही, हे पुढे कळेलच! पण, तो होऊ नये यासाठी आपण सगळे प्रार्थना करू या! दर काही वर्षांनी येणाऱ्या अल-निनोचा प्रभाव मात्र मान्सून वाऱ्यांवर जाणवायला लागला आहे. जून महिन्याचे १७ दिवस होऊनही पावसाचा पत्ता नाही. सध्या काही भागात धावता वादळी पाऊस येतो आहे. त्या पावसाला मान्सूनपूर्व म्हणता येईल. कोकण किनारपट्टीवर धडकताच मान्सूनचे वारे निष्क्रिय झाले. हे वारे तेथेच रेंगाळल्याने संपूर्ण राज्यालाच पावसाची प्रतीक्षा लागली आहे. समाधानकारक पावसावरच संपूर्ण वर्षभराचे जीवनचक्र अवलंबून असते. पाण्याची कमतरता या चक्राला बाधित करते. मग, त्याचे वेगवेगळे परिणाम पाहायला मिळतात. निर्माण होत असलेल्या स्थितीला नियंत्रणात ठेवणे आपल्या हातात आहे. सध्या विविध प्रकल्पांमधले, विहिरीतले आणि कूपनलिकेच्या माध्यमातून मिळणारे पाणी काळजीपूर्वक वापरणेच सर्वांच्या हिताचे आहे. कारण, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उन्हाळ्याची तीव्रता जास्त असल्याने पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत आहे. पाऊस लांबला तर ती धोक्याच्या पातळीपर्यंत येईल.राज्यात मोठे, मध्यम, लघु असे तीन प्रकारचे पाणी प्रकल्प आहेत. त्याची एकूण संख्या ३०२८ आहे. त्यात मोठे १३८, मध्यम २६४, लघु २६२६ आहेत. या प्रकल्पांमध्ये सरासरी २४.४१ टक्के जलसाठा असून त्यातील उपयुक्त जलसाठा हा ९९७०.७ दलघमीच आहे. गेल्या वर्षी आजच्याच तारखेला हा जलसाठा ३१.१० टक्के होता. म्हणजेच यंदा तो ६.६९ टक्क्याने कमी आहे. विभागनिहाय स्थिती तपासली तर नागपूर विभागात या तीनही प्रकारातल्या एकूण प्रकल्पाची संख्या ३८७ आहे. येथे आज सरासरी ३६.५७ टक्के जलसाठा आहे. अमरावती विभागात २७६ प्रकल्प असून ३७.७७ टक्के पाणीसाठा आहे. छत्रपती संभाजी नगर विभागात ९२९ प्रकल्प आहेत, तेथील जलसाठा २६.७२ टक्के आहे. नाशिक विभागात ५३९ प्रकल्प असून २५.०७ टक्के पाणी आहे. पुणे विभागात ७२४ पाणी प्रकल्प आहेत. येथे फक्त १४.५४ टक्के जलसाठा आहे. कोकण विभागात १७३ पाणी प्रकल्प आहे. त्यात २९.७७ टक्के पाणी आहे. आकडेवारीनुसार सर्वात कमी पाणीसाठा पुणे तर जास्त अमरावती विभागात आहे. एकंदरीतच दिवसागणीक पाणी पातळी कमी होत आहे. पाऊस लांबला तर ती आणखी कमी होणार आहे. अशावेळी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या योजनांवर प्रभाव जाणवेल.


अल-निनोच्या परिणामाची जाणीव राज्य सरकारला झाली आहे. शासनाने तातडीने आदेश काढून पाणी प्रकल्पांमधील जलसाठा अन्य कोणत्याही वापरासाठी बंदी टाकली आहे. जोपर्यंत समाधानकारक पाऊस होणार नाही, तोपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठीच हा साठा आता वापरण्यात येणार आहे. येत्या आठ ते दहा दिवसात पाऊस आला नाही तर विविध शहरातल्या पाणी पुरवठ्याची कपात करण्याचा निर्णय सुद्धा होऊ शकतो. सर्व सजीवांना पाण्याची गरज असते. कमी पाण्यात जर ती भागवायची असेल तर नियोजन आवश्यक आहे. शासन त्या कामी लागले असले, तरी सर्वसामान्य नागरिकांचा त्यात सहभाग अत्यंत आवश्यक आहे. शासनाने कितीही सांगितले आणि इकडे पाण्याचा बेसुमार वापर झाला तर तो अडचणीचा ठरू शकतो. ‘माझी कूपनलिका, विहीर व नळ आहे. मी कसाही वापरील’ या मानसिकतेत असणाऱ्यांना जागे करावे लागेल आणि संभाव्य धोक्यांची कल्पना देऊन जागृत करावे लागेल. विविध शासकीय, निमशासकीय यंत्रणा, सर्व प्रकारच्या खाजगी संस्थेकडून जनजागृती सुरू केली पाहिजे. संभावित धोक्यांची तीव्रता कमी करण्यासाठी अशी जनजागृती उपयोगी ठरते. सर्व नागरिकांनी प्राधान्यक्रम ठरवून पाण्याचा वापर करावा. महाराष्ट्राने दुष्काळाच्या झळा यापूर्वी अनुभवल्या आहेत. राज्य शासनाप्रमाणेच ठिकठिकाणचे जिल्हा प्रशासन कामाला लागले आहे. जिल्हाधिकारी आढावा घेत आहेत. अरबी समुद्रात अँटी सायक्लॉनी परिस्थिती निर्माण झाल्याने मान्सून वारे मागे ढकलले जात आहेत. त्यामुळे चालू किंवा पुढच्या आठवड्यात मान्सून सक्रिय होईल की नाही, याची कोणतीच शाश्वती नाही. ठोस अंदाज घेऊनच सर्वांना वाटचाल करावी लागणार आहे. ■

९४२०७२१२२५

## प्रासंगिक

# सामाजिक समरसतेचे प्रतीक महाराणा प्रताप

प्रा. डॉ. सुधाकर इंगळे



**स्वाभिमानपूर्वक संघर्षाचे प्रतीक असलेले वीर स्वाभिमानी महाराणा प्रताप यांची १७ जून रोजी ४८६ वी जयंती. त्यानिमित्ताने...**

महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० (विक्रम संवत १५९७ ज्येष्ठ शुक्ल तृतीया) रोजी राजस्थानातील कुंभलगड या दुर्गम किल्ल्यावर झाला. मेवाडच्या राजघराण्यातील महाराणा उदयसिंह व माता जयवंता बाई यांच्या उदरी जन्मलेल्या प्रतापांनी बालपणापासूनच शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे संस्कार आत्मसात केले होते. पुढे ते मेवाडचे राज्यकर्ते झाल्यानंतर त्यांनी आपल्या राज्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकामी दिल्लीच्या तख्तावरील सामर्थ्यशाली बादशाहशी आयुष्यभर संघर्ष केला होता. मेवाडच्या राजगादीवर आरूढ होताच राणा प्रतापना सातत्याने शत्रूशी लढावे लागले. त्यांनी आपल्या उत्तरार्धच्या कालखंडात चावंडच्या क्षेत्रात मेवाडची राजधानी स्थापित केल्यावर मोठ्या प्रमाणावर कृषी विकास घडवून आणला होता.

इ. स. १५७६ च्या हल्दीघाटीच्या युद्धाने राणा प्रतापांच्या इतिहासाला व शौर्याला नवे आयाम प्रदान केले होते. या अनिर्णायक युद्धानंतरही राणा प्रताप जवळपास २० वर्षांपर्यंत मोगलांच्या साम्राज्यशाहीच्या झुंडीविरोधात सतत संघर्ष करीत राहिले. यासाठी त्यांना पराकोटीचा त्याग, ऐश्वर्य, निरंतर संघर्ष व रानावनातील वनवास पत्करावा लागला. मात्र ते अखेरच्या श्वासापर्यंत मोगलांना शरण गेले नाहीत, यातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख समोर येते. महाराणा प्रताप यांचे सामाजिक विचारही तितकेच प्रेरणादायी होते. त्यांच्या सैन्यात विविध जाती, धर्म आणि समाज घटकांतील लोकांना समान सन्मानाचे स्थान देण्यात आले होते. हकीम खान सूरसारख्या मुस्लिम सेनानीवर त्यांनी विश्वास दर्शवित त्यास हल्दीघाटीच्या युद्धात एका तुकडीचे नेतृत्व बहाल केले होते. यावरून त्यांच्या दृष्टीने राष्ट्रहित आणि कतृत्व हेच सर्वोच्च मूल्य असल्याची जाणीव होते. हिंदुस्तान पादाक्रांत करण्याची इच्छा बाळगणार्या अकबर बादशहाला शेवटपर्यंत मेवाडची भूमी आपल्या अधिपत्याखाली आणता आली नव्हती. याच गोष्टीचे शल्य सातत्याने अकबराला मनात बोचत राहिले होते. बादशाह अकबर हा राणा प्रताप यांना अन्य राजपूत नरेशांप्रमाणे मोगल दरबारात त्यांच्या सेवकाच्या रूपात उपस्थित करू इच्छित होता. त्यामुळेच त्याने ‘काहीही करून राणा प्रतापांना शाही दरबारात आणा’ असे त्याने त्यांच्या प्रत्येक शांतिदूतास वेळोवेळी आदेश दिलेले होते. किंबहुना या कामी अकबराने कूटनीतीचाही वापर केलेला होता. मात्र महाराणा प्रतापांनी अकबराची ही नीती वेळीच ओळखत आपल्या स्वाभिमानी बाण्यानेच त्यास उत्तर दिले होते. वेळप्रसंगी राणा प्रताप यांनीही कूटनीतीचा अवलंब केला. मात्र, १८ जून १५७६ च्या हल्दीघाटीच्या युद्धानंतर केवळ चार महिन्यातच अकबर बादशाह राणा प्रतापांना कैद करण्यासाठी स्वतः मेवाडवर चालून आला होता. त्यानंतर इ.स. १५७७ ते १५७९ पर्यंत त्याने तीन वेळा त्यांचा प्रमुख सेनापती शहाबाजखानला शाही सेनेसह मेवाडवर पाठविले असले, तरी त्यास यश मिळू शकले नव्हते. ही बाब अकबराच्या दृष्टीने मोठी नाचक्की ठरली होती.

तत्कालीन काळात मेवाडमध्ये केसरिया बाणा या पद्धतीचे मोठ्या प्रमाणावर प्रचलन होते. यात जेव्हा किल्ल्याच्या आतून लढाई करणे शक्य नाही, ही बाब लक्षात येताच राजपूत सेनानी किल्ल्याचे दरवाजे सताड उघडे करून शत्रूवर तुटून पडत व शत्रूला यमसदनी पाठवीत स्वतःलाही त्या यज्ञकुंडात संपवून घेत. मात्र राणा प्रतापांनी ही परंपरा विचारपूर्वक दूर सारली होती. राणा प्रतापांनी ‘मारू वा मरू’ या कृतीवर भर देण्याऐवजी स्वतःला वाचविता वाचविता मेवाडलाही वाचवले. राणा प्रतापांनी हल्दीघाटीच्या रणसंग्रामातून बाहेर पडण्याचा जर निर्णय घेतला नसता, तर आज राणा प्रताप हे स्वातंत्र्यवीर लोकांसाठी जेवढे वंदनीय प्रेरणादायक आहेत, तेवढे ते कदापि बनले नसते.

राणा प्रतापांनी संपूर्ण मेवाडवर अधिपत्य मिळविले असले, तरी त्यांना मेवाडचा मानबिंदू चित्तोडगढ प्राप्त करता न आल्याचे शल्य त्यांना सातत्याने बोचत होते. हेच शल्य उरात घेऊन १९ जानेवारी १५९७ रोजी वयाच्या ५७ नव्या वर्षी राणा प्रतापांचे चावंडच्या महालात अकाली देहावसान झाले. महाराणा प्रतापांच्या मृत्यूची बातमी अकबर बादशहाच्या लाहोर येथील दरबारात पोहोचली. तेव्हा अकबर स्तब्ध झाला. राणा प्रताप यांच्या निधनाची वार्ता ऐकून त्यास आनंद होण्याऐवजी दुःख झाल्याचे पाहून दरबारी लोकांना आश्चर्य वाटले. त्या दरबारात उपस्थित असलेला चारण दूरसा आढा याने बादशहाची मनस्थिती लक्षात घेऊन मारवाडी भाषेत षष्टक (छप्पय) सादर केले. त्याचा अर्थ असा- ज्याने आपल्या घोड्यांना डाग लागू दिले नाहीत, ज्याने स्वतःची पगडी कोणापुढे झुकविली नाही, आज तो गात गात निघून गेला, जो हिंदुस्थानच्या ओझ्याची गाडी डाव्या बाजूने ओढत होता, जो कधीही नौरोजच्या जलाशयात गेला नाही, जो कधी शाही डेऱ्यात गेला नाही, ज्याच्या झरोक्याचा धाक सर्व जगाला आहे, अशा झरोक्याच्या खाली तो कधी उभा राहिला नाही, असा राणा प्रताप विजयी होऊन निघून गेला. त्याच्या जाण्याने बादशहाने आपले तोंड घट्ट मिटले व ते स्तब्ध झाले. एक उसासा सोडून त्यांचे डोळे पाण्याने भरले. हे प्रताप तुझ्या मरणाने असे झाले. यावरून राणा प्रतापांच्या जाण्यामुळे मेवाडच्या जनतेला जेवढे दुःख झाले होते, तेवढेच दुःख बादशहा अकबराला झाल्याचे यातून स्पष्ट होते. किंबहुना आपल्या शत्रूला सुद्धा आपल्या जाण्याची हुरहुर लागावी, अशा प्रकारचे राणा प्रतापांचे व्यक्तिमत्त्व असल्याचे यातून सिद्ध होते.

राणा प्रतापांचे जीवन आपल्याला स्वाभिमानाचे महत्त्व शिकवते. परिस्थिती कितीही कठीण असली तरी तत्त्वांशी तडजोड करू नये, हा संदेश त्यांनी आपल्या आचरणातून दिला. आज भारताला शौर्याबरोबरच चारित्र्य, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्यपरायणतेची गरज आहे. महाराणा प्रताप यांचे जीवन या सर्व मूल्यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. युवकांनी त्यांच्या संघर्षातून जिद्द, त्यांच्या राष्ट्रभक्तीतून देशप्रेम आणि त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनातून समरसतेचे धडे घेण्याची आवश्यकता आहे. महाराणा प्रताप हे केवळ राजस्थानचे किंवा राजपूत समाजाचेच नरेश नव्हते तर ते संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे जीवन आपल्याला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देत राहील. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त आपण राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक एकात्मता जपण्याचा आणि आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचा संकल्प करूया. स्वाभिमानासाठी जगणे आणि राष्ट्रासाठी संघर्ष करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ■

नागपूर

## वाचक पत्रे

### किशोरांचा उन्हाळी उपक्रम

नागपुरातील उन्हाळा विशेषच असतो. घरात बसा, दूरदर्शन बघा, नाहीतर मोबाईल आहेच. या सर्वांत रुद्र गौरव वसाहत, हरिहर नगर, बेसा नागपुरातील, किशोरवयीन मुला-मुलींनी एक सुरेख उपक्रम केला. यात लहानगे म्हणजे प्राथमिक वर्गातील तसेच प्राथमिक उंबरठा ओलांडून माध्यमिक वर्गांमधील मुला-मुलींनी, एकूण ११ जणांनी, क्रिकेट टीम बनवून, आयपीएलच्या धर्तीवर आर. पी. एल. म्हणजे रुद्र गौरव प्रीमियम लीग क्रिकेटची टीम बनवून, ५ मे ते १६ मे ५-५ ची प्रत्येकी एक टीम बनवून सकाळी एक-दीड तास सामने खेळले. त्यात त्यांनी रुद्र गौरव, वसाहतीतील वरिष्ठ नागरिकांची मदत घेतली. दोन पिढ्या अशा एका सूत्रांत बांधल्या गेल्यात. वरिष्ठ नागरिकांनाही बालपण अनुभवता आले. ५ मे रोजी बालकांनी उद्घाटन केले. तसेच १६ मे रोजी, वरिष्ठ नागरिकांकडून बक्षीस वितरण करून समारोप केला. यातील सर्वांत लक्षणीय बाब म्हणजे , मुलांनी आपापसातच ठरवून आपल्या खाऊच्या पैशातून नेहमी उपयोगात येतील, अशा भेटवस्तू बक्षीस म्हणून दिल्याबद्दल ती सर्व कौतुकास पात्र आहेत. ही सर्व मुले बेसा येथे झालेल्या संघाच्या संस्कार वर्गातही जात असत. वरिष्ठ नागरिकांनी सर्वांचे कौतुक केले. पुढील अनेक कार्यक्रमांकरिता सर्वतोपरी मदत आणि मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले. रुद्र गौरव वसाहतीतील, नेहमीच ओरडा खाणाऱ्या मुलांनी, हा उपक्रम स्वयंस्फूर्तीने, स्वतःच आखून पूर्णत्वास नेल्याबद्दल त्यांच्या गुणांचे कौतुक व अभिनंदन करणे आवश्यक आहे.

**रेखा भिवगडे**/८७८८७२६५६२

■■■

### शाळा बंद होण्याचे वाढते प्रमाण

अलिकडेच आपल्या देशातील गेल्या दहा वर्षांत एक लाखाहून अधिक शाळा बंद झाल्याची बाब नीती आयोगाच्या अहवालातून स्पष्ट झाली आहे. जी अत्यंत गंभीर बाब आहे. शाळांची संख्या घटणे हा केवळ प्रशासकीय किंवा लोकसंख्याशास्त्रीय बदलाचा विषय नसून, तो देशाच्या शिक्षणव्यवस्थेवरही महत्त्वाचे प्रश्न निर्माण करतो. जर नीती आयोगाच्या आकडेवारीवरून ही वस्तुस्थिती समोर येत असेल, तर तिचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. सरकारचे म्हणणे असते की अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प होती, त्यामुळे त्यांचे विलीनीकरण करण्यात आले. काही ठिकाणी एक किंवा दोन शिक्षकांवर संपूर्ण शाळा चालत होती. अशा परिस्थितीत संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर करण्यासाठी शाळांचे एकत्रीकरण करण्यात आले. प्रशासनाच्या दृष्टीने हा निर्णय तर्कसंगत वाटू शकतो. परंतु, प्रश्न एवढाच नाही, तर ग्रामीण आणि दुर्गम भागातील लहान शाळा बंद झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक अंतर प्रवास करावा लागतो. विशेषतः मुली, आदिवासी समाजातील विद्यार्थी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांवर याचा नकारात्मक परिणाम होतो. एखादी शाळा गावातून गेली की अनेक वेळा विद्यार्थ्यांचे शिक्षणही थांबते. शाळा बंद होण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारी शिक्षणावरील लोकांचा कमी होत चाललेला विश्वास. गेल्या काही वर्षात खाजगी शाळांचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले गेले आहे. अनेक शाळा कमी विद्यार्थी म्हणून घोषित करण्यात आल्या. एक लाखाहून अधिक शाळा बंद होणे हा केवळ आकड्यांचा विषय नाही, तो शिक्षण धोरणाचा, सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाचा आणि सामाजिक समतेचा वचनबद्धतेचा प्रश्न आहे. कोणत्याही विकसित राष्ट्राची पायाभरणी मजबूत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेवर उभी असते.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

■■■

### धडक कारवाया आवश्यक

अन्न हे जीवनाचे आधारस्थान आहे आणि औषध हे आरोग्याचे संरक्षण करणारे साधन. मात्र, नफेखोरीच्या हव्यासापोटी काही व्यावसायिक आणि उद्योगांकडून अन्नपदार्थांमध्ये भेसळ तसेच निकृष्ट दर्जाच्या औषधांची विक्री होत असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. या पृष्ठभूमीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने जिल्हाभर सुरू केलेल्या धडक तपासणी मोहिमा ही केवळ प्रशासकीय कारवाई नसून जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. मिठाई दुकाने, दुग्धजन्य पदार्थ विक्रेते, खाद्यतेल उत्पादक, किराणा दुकाने, हॉटेल्स तसेच औषध विक्री केंद्रांची अचानक तपासणी करून संशयित नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याची मोहीम सुरू आहे. यामुळे भेसळखोरांमध्ये खळबळ उडाली असून अनेकांनी आपल्या उत्पादनांची गुणवत्ता तपासण्यास सुरुवात केली आहे. हीच या कारवाईची पहिली मोठी यशस्वी बाजू म्हणावी लागेल. केवळ किरकोळ दुकानदारांपुरतीच नव्हे तर उत्पादन करणारे उद्योग, प्रक्रिया केंद्रे व घाऊक पुरवठादार यांचीही नियमित व कठोर तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. ■




**मुनिश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## महत्वाचे...



### दीपक खटकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त ३४१ जणांचे रक्तदान

**सांगोला, दि.१६ जून-**

युवा सेनेचे सांगोला तालुका प्रमुख दिपक उर्फ गुंडादादा खटकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ३४१ जणांनी रक्तदान केले. यावेळी ११ महिलांनीही रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. तसेच शहरातील एस.टी.स्टँड परिसरातील डिव्हायडर व न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. रक्तदानातून जीवनदान आणि वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी राहत आहे. अशा कार्यकर्त्यांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो असे मनोगत माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केले. रक्तदान शिबिरास रेवनील ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, पं.स.उपसभापती अजय सरगर, युवा सेनेचे सागर पाटील, डॉ.सोमेश यावलकर उपस्थित होते. रक्तदान, वृक्षदान आणि समाजसेवेचा संदेश देणारा हा अभिष्टचिंतन सोहळा सांगोला तालुक्यातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरला.

# यमाई तलावालगतची जमीन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडे हस्तांतरणास शासनाची मंजुरी

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व पालकमंत्र्यांचे मंदिर समितीकडून आभार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जून-**

पंढरपूर शहरातील गट क्रमांक १६१ मधील यमाई तलावालगत असलेली सुमारे ३ हेक्टर १२ आर क्षेत्रफळाची शासन मालकीची जमीन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्याकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावास शासनाने विविध अटी व शर्तीसह दि. १६ जून रोजी मंजुरी दिल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

याबाबत दि. २८ एप्रिल रोजी मंत्रालय, मुंबई येथे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सदर जमीन मंदिर समितीकडे हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तात्काळ शासनास प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश मंत्री महोदयांनी दिले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मार्फत दि. ७ मे रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर जागा मंदिर समितीस प्राप्त झाल्यानंतर त्या



ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी अत्याधुनिक पर्यटन (सहल) केंद्र तसेच गोमाता जतन व संवर्धन केंद्र उभारण्याचा मानस आहे. या प्रकल्पासाठी मंदिर समितीने प्रारूप आराखडा तयार केला असून, सदर काम मंदिर समितीच्या निधीतून करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत या जागेवर मंदिर समितीची गोशाळा कार्यरत असून, येथे सुमारे २५० लहान-मोठ्या देशी गाई व वासरांचे संगोपन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले जात आहे. गोवंशासाठी स्वच्छ व प्रशस्त निवारा, नियमित पशुवैद्यकीय तपासणी, पौष्टिक चारा तसेच पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. गोशाळेतून प्राप्त होणाऱ्या दुधाचा उपयोग श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्योपचार व धार्मिक विधींसाठी केला जातो. याशिवाय गोसेवेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जपण्याचे आणि भाविकांमध्ये गोसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचे कार्यही मंदिर समितीमार्फत केले जाणार आहे. यमाई तलावालगतची ही जागा मंदिर समितीकडे हस्तांतरित झाल्यानंतर येथे पर्यावरणपूरक व अत्याधुनिक सुविधांनी युक्त आदर्श 'गोमाता जतन व संवर्धन केंद्र' विकसित करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये देशी गोवंश संवर्धन, पशुवैद्यकीय सेवा, चारा विकास, गोआधारित उपक्रम तसेच भाविकांना गोसेवेचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल अशा विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे पंढरपूरमध्ये धार्मिक पर्यटनासोबतच गोसंवर्धन आणि पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळणार आहे.

दि. २८ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीस ऑनलाइन पद्धतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, मंदिर समिती सदस्य ह.भ.प. भास्करगिरी महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच प्रत्यक्ष उपस्थितीत मंदिर समिती सदस्या ॲड. माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

सदर महत्त्वपूर्ण प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राजी (वहिनी) पवार, महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने शतशः आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयानिमित्त आज सायंकाळी गोशाळा परिसरात गोमातेचे पूजन करण्यात आले. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, विभाग प्रमुख अतुल बक्षी, राजेंद्र सुभेदार, सावता हजारे, योगराज बाणेकर, शंकर मदने, यशवंत गुरव, समीर ढोबळे तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# गुन्ह्यात मदत करण्यासाठी घेतली सव्वा लाखाची लाच

## अक्कलकोट उत्तर ठाण्याच्या दोन पोलिसांसह तिघे एसीबीच्या जाळ्यात

### आरोपीला दोन दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जून-**

एका गुन्ह्यामध्ये जप्त केलेली स्कॉर्पिओ वाहन व मोबाईल परत देऊन गुन्ह्यातील आरोपींना मदत करण्यासाठी एका तक्रारदाराकडून १ लाख ४० हजार रुपयाची लाच मागून तडजोडीनंतर १ लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पोलिसांसाठी काम करणाऱ्या एका खाजगी व्यक्तीला सोलापूरच्या लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने सोमवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यासमोर रंगेहात पकडले .मात्र या कारवाई दरम्यान दोन पोलीस हवालदार फरार झाले.



दरम्यान याप्रकरणी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात अटक करण्यात आलेल्या एका खाजगी व्यक्तीसह फरार झालेल्या उत्तर पोलीस ठाण्यातील दोन पोलीस हवालदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस हवालदार राजशेखर रामचंद्र कोळी (राहणार अशोक चौक सोलापूर), पोलीस शिपाई लक्ष्मीकांत दत्तात्रय देडे (रा. पोलीस वसाहत, अक्कलकोट आणि खासगी व्यक्ती आकाश शरणप्पा काडरामे (रा. आझाद गल्ली अक्कलकोट) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून अटक करण्यात आलेल्या आकाश काडरामे या आरोपीस आज मंगळवारी दुपारी सोलापूरच्या न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.




यातील तक्रारदाराच्या नातेवाईकांविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यात दोघांना अटक ही झाली होती. सदर गुन्ह्याच्या तपासात वरील दोघा पोलिसांनी स्कॉर्पिओ गाडी व तक्रारदाराच्या लहान भावाचा मोबाईल ताब्यात घेतले होते .आणि सदर गुन्ह्या मध्ये तक्रारदाराच्या वडिलांचे आणि काकांचे नाव घालून त्यांना अटक करण्याची भीती दाखवण्यात आली. दरम्यान वरील दोघा पोलिसांनी वाहन आणि मोबाईल परत मिळवून देण्यासाठी व नातेवाईकांना मदत करण्याच्या बदल्यात सुरुवातीला १ लाख ४० हजार रुपयांची मागणी केली. नंतर तडजोडीनंतर ही रक्कम १ लाख २० हजार रुपये देण्याचे ठरले .यादरम्यान तक्रारदाराने सोलापूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून याबाबत तक्रार दाखल केली.

त्यानंतर एसीबी पथकाने या तक्रारीची पडताळणी व पुष्टी करून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे परिसरात सापळा लावला असता यातील आरोपी खाजगी इसम आकाश काडरामे हा ठरल्याप्रमाणे यातील तक्रारदाराकडून १ लाख २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना रंगेहात सापडून आला. कारवाई होताच लाचेची मागणी करणारे दोघे पोलीस मात्र परिसरातून फरार झाले. या दोघांचा रात्री उशिरापर्यंत एसीबीच्या पथकाने शोधाशोध केला.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शैलेश पवार हे करीत आहेत.सदरची कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक सोलापूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते , पोलीस अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, अक्षय श्रीराम यांनी पार पाडली आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव **वेदांत** असे होते. नवीन नाव **वेदांत मधुकर जाधव** असे आहे. सदर दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे. **पत्ता:** मार्फत : मधुकर जाधव, सी २०२ ड्रीम्स अवनी, स.नं. ७०बी/२/१, मांजरी बुद्रुक, मांजरी बुद्रुक, पोस्ट ऑफिस: मांजरी फार्म, जिल्हा: पुणे, महाराष्ट्र - ४१२३०७

## नावात बदल

माझे जुने नाव **शांताबाई** असे होते. नवीन नाव **शांताबाई दगडू जाधव** असे आहे. सदर दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे. **पत्ता :** वसंत नगर, नळदुर्ग, उस्मानाबाद, महाराष्ट्र - ४१३००२

## मध्य रेल्वे

**सोलापुर मंडळ**

**सिग्नलिंग कार्य**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर हे सक्षम, नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युर्मेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-17. कामाचे नाव आणि ठिकाण: सोलापूर विभागातील तिलाटी स्टेशनवर शंटिंग नेकचा विस्तार करणे आणि त्याचे डाऊन गुड्स लूप लाईनमध्ये रूपांतर करण्याच्या संदर्भातील सिग्नलिंगचे काम. कामाची अंदाजित किंमत: रु. 84,55,318.83, निविदा फॉर्मची किंमत: शून्य, अनामत रक्कम भरणा: रु. 1,69,100/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने, निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 10.07.2026 रोजी दुपारी 15:30 वाजल्यानंतर. याचा तपशील आयरेप्स (ireps) वेबसाइटवर उपलब्ध आहे. सुधारणापत्र/दुरुस्ती जर काही असेल, तर ती केवळ वरील ई-प्रोक्युर्मेंट वेबसाइटवरच अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स किंवा हस्तचलित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बिडर्सना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास III डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट मिळवावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. अनामत रकमेचा (EMD) भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल आणि मूळ बँक गॅरंटी, बिड्स सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बिड्स सादर करण्याची शेवटची तारीख वगळून), निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नामनिर्देशित अधिकार्‍याकडे वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

मं. रे. प्र. (सं.व.द्वू)

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 28

### महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात

**संकलन - जन्म-मृत्यू**

दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/१०७२/२०२६ दि. १६/०६/२०२६

## जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. दत्तात्रय आंदोबा जोगदे** - **अर्जदार**
रा. चुंगी, ता. अक्कलकोट
विरुद्ध
**जन्म-मृत्यू नोंदणी, कार्यालय ग्रामपंचायत, चुंगी, ता. अक्कलकोट** - **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील श्री. दत्तात्रय आंदोबा जोगदे यानी त्यांची आई सुलाबाई आंदोबा जोगदे यांचा मृत्यू दि. १०/०४/१९९० रोजी मौजे चुंगी ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या मृत्युची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे. दत्तात्रय आंदोबा जोगदे यांनी त्याच्या आईच्या मृत्यूची नोंद घेऊन मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २४/०२/२०२६ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या नावे सुलाबाई आंदोबा जोगदे यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीरा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणनें न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. १६/६/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे..

(शिक्का)

सही/-
**विनायक सुधीर मगर**
**तहसीलदार,**
**अक्कलकोट**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे हत्तुर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। व सब डी।। सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे हत्तुर ग्रामपंचायत हद्दीतील बागायत शेतजमीन गट नं. ३२३/२ यांसी क्षेत्र ० हे. ७७ आर यांसी आकार २ रु. ३३ पै. यांसी सदर शेतजमीनीस असलेली १/४ अविभक्त हिश्याची सिना जमिनीपासून शेतजमीनीस असलेली ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन व त्यांस असलेली ७.५ एच.पी.ची विद्युत मोटार कनेक्शनसह चतुःसिमा :- पुर्वेस : राजकुमार पाटील यांची जमीन, पश्चिमेस : धनराज उपासे व स्वामी यांची जमीन, दक्षिणेस : स्वामी यांची जमीन, उत्तरेस : शोभा बळ्ळारी यांची जमीन. वर नमूद केलेली शेतजमीन त्यातील स्वतंत्र व सामाईक वहिवाटीच्या हक्कासह व इतर तदंगभूत वस्तुंसह.

वर नमुद शेतजमीन ही श्री. सोमनाथ ऊर्फ सोमनिंग धोंडप्पा उपासे यांचे मालकीची आहे. त्यांनी वर नमुद शेतजमीन आमचे अशिल सौ. महादेवी नागेश कलसुरे यांना विक्री करण्याचे ठरवून इसारपावती लिहून देऊन इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदरील शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी वर नमुद शेतजमिनीवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसन्स, बक्षीस, इसारापावती, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती (right of intrest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबध असल्यास अथवा सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (०७) दिवसांचे आत खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची शेतजमीन ही संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर शेतजमिनीवर बंधनकारक राहणार नाही.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली दि. १६/०६/२०२६

सही/-
**केदार एम. डोळ्ळे**
**बी.ए. (ऑ.) जी.डी.सी. ॲन्ड एल.एल.बी.,**
**नोटरी (भारत सरकार)**
**ॲडव्होकेट मो.नं. ७९७२५८०१४९**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**अशिल - सौ. महादेवी नागेश कलसुरे**



**मी राजेंद्र विठ्ठल राऊत, उमेदवार, भारतीय जनता पक्ष विधानपरिषद निवडणूक, सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ जाहीर प्रकटन करतो की,**

## FORMAT C – 1

### DECARATION ABOUT CRIMINAL CASES

(AS PER THE JUDGEMENT DATED 25TH SEPTEMBER 2018 OF HON'BLE SUPREME COURT IN WRIT PETITION (CIVIL) NO. 536 OF 2011 (PUBLIC INTEREST FOUNDATION AND OTHERS VS. UNION OF INDIA AND ANOTHER)

NAME AND ADDRESS OF THE CANDIDATE :
**MR. RAJENDRA VITTHAL RAUT**
**R/O: 3809, RAUT CHAL, BARSHI,**
**TAL. – BARSHI, DISTRICT – SOLAPUR.**

NAME OF POLITICAL PARTY:
**BHARATIYA JANATA PARTY**

NAME OF ELECTION : **MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL ELECTION 2026**

NAME OF THE CONSTITUANCY :
**SOLAPUR LOCAL AUTHORITIES**

I, Mr. Rajendra Vitthal Raut, a candidate for the above-mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents

**A) Pending Criminal Cases**

| Sr. No. | Name of Court | Case No. and Date | Status of Case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1 | JMFC Court, Solapur | STC No. 6277/2023 | Pending | IPC 336, 269, 188, 143 r/w. section 135 of Maharashtra Police Act and Section 51 (b) of Disaster Management Act 2005 Offence registered for making crowd at Zilha Parishad, causing danger to public health during the pandemic of Corona |
| 2 | JMFC Court, Barshi | Criminal Misc. Application No. 450/2024 | Pending | BNS 2023 section 210, 223 r/w. Section 125 (a) of The Representation of People Act 1951<br>A private complaint is lodged for providing false information in the affidavit to be submitted to the State Election Commission |

**B) Details about cases of convictions for criminal offences**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

## जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री. राजकुमार मारुती कोळी यांनी आई श्रीमती. सुनंदा मारुती कोळी याचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर करून ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जना स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर, यांचेकडे दिला असून, आमचे अशिल बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे. सदर मिळकत निबंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेला आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका - अक्कलकोट, पैकी मौजे धारसंग, येथील ग्रामपंचायत मिळकत क.१०९, यासी क्षेत्र १९०२३ चौ.फू., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. १६/०६/२०२६

सही/-
**ॲड. गणेश वसंत कटारे** बी.कॉम. एल.एल.बी.(स्पे.)
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)** बी.ए., एल.एल.बी.
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**

## जाहीर समन्स

### मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)

**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**

११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**मनोरमा को-ऑप बँक लि., सोलापूर (सात रस्ता)** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १२८२/२०२५-२६ | ४७,१३३/- | १ | **जाधव तुकम्मा लालू** सेटलमेंट फ्री कॉलनी ५, लक्ष्मीमाता मंदिरजवळ, सलगर वस्ती, सोलापूर |
| | | | २ | **रेखा सुरेश गायकवाड** सेटलमेंट फ्री कॉलनी ५, लक्ष्मीमाता मंदिरजवळ, सलगर वस्ती, सोलापूर |
| | | | ३ | **गायकवाड धुराप्पा परशुराम** सेटलमेंट फ्री कॉलनी ५, विजापूर रोड, सोलापूर |
| २ | १२८०/२०२५-२६ | ७५,१७८/- | २ | **जाधव अन्नपूर्णा विठ्ठल** सेटलमेंट फ्री कॉलनी नं ३, डोणगाव, सोलापूर |
| | | | ३ | **गायकवाड रेखा मरगु** सेटलमेंट फ्री कॉलनी ५ सलगर वस्ती, विजापूर रोड, सोलापूर |
| ३ | १२७९/२०२५-२६ | ७१,४८२/- | १ | **गायकवाड पुष्पा अशोक** सेटलमेंट फ्री कॉलनी नं २, डोणगाव, सोलापूर |
| | | | २ | **चव्हाण लक्ष्मी बन्सीलाल** सेटलमेंट फ्री कॉलनी नं १, डोणगाव, सोलापूर |
| | | | ३ | **गायकवाड सखुबाई मौला** सेटलमेंट फ्री कॉलनी ६, विजापूर रोड, सोलापूर |
| ४ | १२७८/२०२५-२६ | ६९,३८१/- | १ | **जाधव पूनम परशुराम** सेटलमेंट फ्री कॉलनी ६, मरीआई मंदिरसमोर, डोणगाव, सोलापूर |
| | | | २ | **गायकवाड ललिता प्रभू** सेटलमेंट फ्री कॉलनी नं १, पोलीस स्टेशनमागे, विजापूर रोड, सोलापूर |
| | | | ३ | **गायकवाड विजयालक्ष्मी सुनील** ४५२ सेटलमेंट फ्री कॉलनी ६, विजापूर रोड, सोलापूर |
| ५ | १२८१/२०२५-२६ | ५९,१४३/- | १ | **जाधव गीता विश्वनाथ** सेटलमेंट फ्री कॉलनी ३, डोणगाव, सोलापूर |
| | | | २ | **गायकवाड सरस्वती संजय** १ लिमयेवाडी, वांगी रोड, वांगी, सोलापूर |
| | | | ३ | **जाधव तुकम्मा लालू** सेटलमेंट फ्री कॉलनी ५, लक्ष्मीमाता मंदिरजवळ, सलगर वस्ती, सोलापूर |
| ६ | १२८४/२०२५-२६ | २,५८,२०५/- | १ | **पार्श्व सेल्स सर्विसेस ॲन्ड प्रो. प्रा. कोमल महवीर शहा** १०१ तात्या पार्क, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर |
| | | | २ | **शहा महावीर रवींद्र** १०१ तात्या पार्क, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर |
| ७ | १२८३/२०२५-२६ | ४,५२,१६०/- | १ | **महवीर रवींद्र शहा** १०१ तात्या पार्क, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर |
| | | | २ | **शहा कोमल महावीर** १०१ तात्या पार्क, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार, दि. ३०/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रांसह आप या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक : १६/०६/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

(शिक्का)

**सही/- उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



## महत्त्वाचे

### सरप्रीत सिंग भारतीय वंशाचा पहिला खेळाडू

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडचा मिडफिल्डर सरप्रीत सिंग हा विश्वचषक सामन्यात अंतिम अकरा खेळाडूंमध्ये स्थान मिळवणारा भारतीय वंशाचा पहिला फुटबॉलपटू ठरला आहे. इराणविरुद्धच्या २-२ अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यात न्यूझीलंडच्या अंतिम अकरा खेळाडूंमध्ये सरप्रीतचा समावेश होता. ऑकलंडमध्ये जन्मलेल्या २७ वर्षीय सरप्रीतने या सामन्यात विश्वचषकात पदार्पण केले आणि आपल्या कामगिरीने सर्वांना प्रभावित केले. न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक डॅरेन बीझली यांनी त्याला अंतिम अकरा खेळाडूंमध्ये स्थान दिले आणि तो जवळपास संपूर्ण सामना खेळला. ९० व्या मिनिटाला त्याच्या जागी एका बदली खेळाडूला संधी देण्यात आली. १० क्रमांकाची जर्सी घालून सरप्रीतने इराणच्या गोलवर तीन शॉट्स मारले, परंतु तो इराणी गोलरक्षकाला हरवू शकला नाही. न्यूझीलंडचा गट 'जी' मधील दुसरा सामना २१ जून रोजी व्हँकुव्हर येथे इजिप्तविरुद्ध होईल. दोन दिवसांपूर्वी, ऑस्ट्रेलियाकडून खेळणार्या आणखी एका भारतीय वंशाच्या खेळाडू, निशान वेलुपिल्लईने, कॅनडाच्या व्हँकुव्हर येथे तुर्कस्तानविरुद्धच्या २-० अशा विजयात आपल्या विश्वचषक स्पर्धेत पदार्पण केले. या २५ वर्षीय विंगरला सुरुवातीच्या अकरा खेळाडूंमध्ये स्थान देण्यात आले नव्हते आणि तो ६० व्या मिनिटाला बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरला होता.

# स्पेन-केप वर्दे सामना गोलशून्यने बरोबरीत



**अटलांटा, १६ जून**

विश्वचषकासाठी पात्र ठरलेला, लोकसंख्येच्या दृष्टीने तिसरा सर्वांत लहान देश असलेला केप वर्दे फिफाच्या ताज्या क्रमवारीत ६७ व्या स्थानावर होता आणि गट 'एच' मधील त्यांच्या पहिल्याच सामन्यात दुसर्या क्रमांकावर असलेल्या स्पेनकडून त्यांचा सहज पराभव होईल अशी अनेकांना अपेक्षा होती. तथापि, विद्यमान युरोपियन चॅम्पियन संघाचा हल्ला बराच काळ मंदावला होता आणि जेव्हा जेव्हा स्पेनने केप वर्देच्या गोलवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ४० वर्षीय गोलरक्षक वोझिन्हाने अनेक उत्कृष्ट बचाव करून त्यांना रोखून धरले. हा सामना गोलशून्यने बरोबरीत राहिला.

दुसर्या हाफमध्ये बदली खेळाडू म्हणून आलेल्या लामिन यामालने त्याच्या संघात आणि स्टेडियममधील स्पेनच्या चाहत्यांमध्ये उत्साह संचारला, परंतु हॅम्स्ट्रिंगच्या दुखापतीतून सावरल्यानंतर जवळपास आठ आठवड्यांनी प्रथमच मैदानात उतरलेला बार्सिलोनाचा हा किशोरवयीन खेळाडू आपल्या विश्वचषक पदार्पणात निर्णायक क्षण निर्माण करू शकला नाही. पहिल्या हाफमध्ये फेरान टोरेसने स्पेनची सर्वोत्तम संधी वाया घालवली. मार्क कुकुरेलाने सहा-यार्ड बॉक्सच्या पलीकडे मारलेल्या हेडरला त्याने कनेक्ट केले, पण वोझिन्हाच्या दबावामुळे त्याचा फटका क्रॉसबारला लागला. इंग्लंडविरुद्ध युरो २०२४ चा विजयी गोल करणार्या मिकेल ओयार्झाबालचा प्रयत्न अखेरच्या क्षणी शॅमरॉक रोव्हर्सच्या रॉबर्टो लोपेसने केलेल्या उत्कृष्ट ब्लॉकमुळे अयशस्वी ठरला. आणि जेव्हा स्पेनने अखेरच्या क्षणी जोर लावला, तेव्हा ते दुसर्या बाजूला जवळपास गाफील राहिले होते - पण बचावपटू डिने बोर्जेसने कॉर्नरवर मारलेला हेडर थेट गोलकीपर युनाई सायमनच्या हातात गेल्याने त्यांनी पराभवाची नामुष्की टाळली.

केप वर्देने कॅमेरूनचाही समावेश असलेल्या गटात अव्वल स्थान मिळवून पहिल्यांदाच विश्वचषकात प्रवेश केला, पण दुसर्यांदा विश्वचषक जिंकण्याची दाट शक्यता असलेल्या स्पेन संघासाठी ते फारशी अडचण निर्माण करतील अशी अपेक्षा नव्हती. केप वर्देच्या जर्सीमध्ये अनेक हिरो असले तरी, अनुभवी गोलकीपर वोझिन्हा त्या सर्वांमध्ये प्रमुख होता आणि अंतिम शिट्टी वाजल्यानंतर लगेचच जेव्हा त्याच्या सहकार्यांनी त्याला गराडा घातला, तेव्हा त्याच्या डोळ्यात अश्रू होते. पोर्तुगालच्या दुसर्या श्रेणीतील चावेस संघाकडून खेळणार्या वोझिन्हाने मध्यंतराच्या अगदी आधी टॉरेस आणि आयमेरिक लॅपोर्ट यांचे प्रयत्न हाणून पाडले आणि क्रॉस पकडण्यासाठी तो नेहमीच आपल्या गोल रेषेवरून पुढे येण्यास उत्सुक होता.

सर्वोत्तम तिसर्या क्रमांकावरील संघ अंतिम ३२ मध्ये जात असल्याने, प्रबळ दावेदार असलेल्या स्पेनविरुद्ध मिळवलेला एक गुण 'ब्लू शार्क्स'ला नक्कीच मोठा आत्मविश्वास देईल की ते २००६ मध्ये घानानंतर विश्वचषकाच्या नॉकआऊट टप्प्यात पोहोचणारे पहिले आफ्रिकन पदार्पण करणारे संघ बनू शकतात. (वृत्तसंस्था)

# बेल्जियम-इजिप्त थरारक सामना १-१ ने बरोबरीत



**सिएटल, १६ जून**

सोमवारी रात्री बेल्जियम आणि इजिप्त यांच्यात झालेला विश्वचषक गट 'जी' मधील सामना फुटबॉल चाहत्यांसाठी एक पर्वणीच होता. वॉशिंग्टनमधील सिएटल स्टेडियमवर झालेला हा सामना अत्यंत चुरशीचा होता आणि तो १-१ अशा बरोबरीत संपला. ज्यात दोन्ही संघांनी गुण विभागून घेतले. हा एक शानदार फुटबॉल सामना होता, परंतु कोणताही संघ विजय मिळवू शकला नाही. या सामन्यात दोन्ही संघांना गोलच्या अनेक संधी मिळाल्या, पण त्यांना गोल करता आले नाही.

७ व्या मिनिटाला, केविन डी ब्रुयनचा जमिनीलगतचा शॉट पोस्टच्या अगदी जवळून बाहेर गेला. पण मोहम्मद सलाहचा इजिप्त संघ लढण्यासाठी सज्ज दिसत होता. २० व्या मिनिटाला, इमाम अशूरने उजव्या पायाने जोरदार किक मारून एक शानदार गोल केला आणि आघाडी घेतली, ज्यामुळे इजिप्तने सर्वांना आश्चर्यचकित केले. सामना अचानक इजिप्तच्या नियंत्रणात आला होता. तथापि, बेल्जियमचा लेफ्ट-विंगर जेरेमी डोकूने डाव्या बाजूने वारंवार हल्ले चढवले.

३३ व्या मिनिटाला इजिप्तने पुन्हा गोल करण्याची संधी साधली. झिझोचा शॉट झेप घेतलेल्या बेल्जियन गोलकीपर, कोर्टुआने वाचवला. दरम्यान, बेल्जियन मिडफिल्डर ट्रोसार्ड चांगला खेळत होता आणि मिडफिल्डमधून संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. त्याच वेळी, इब्राहिम, हानी आणि फाथी यांच्यासह इजिप्तचा बचाव खूप मजबूत होता. पहिला हाफ इजिप्तच्या बाजूने १-० अशा स्कोअरलाइनवर संपला.

दुसर्या हाफमध्ये बेल्जियमने अधिक जोरदार पुनरागमन केले. ६१ व्या मिनिटाला, टायलेमन्सचा शॉट लक्ष्यापासून दूर गेला. एका मिनिटानंतर, केविन डी ब्रुयनचा शॉट इजिप्तचा गोलकीपर एम. शोबेरने वाचवला. पण ६६ व्या मिनिटाला परिस्थिती बदलली. ६५ व्या मिनिटाला, बेल्जियन प्रशिक्षकाने लुकाकूच्या जागी डी केटेलेअरला बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरवले आणि त्याचा लगेचच फायदा झाला.

६६ व्या मिनिटाला, मोहम्मद हानीच्या आत्मघाती गोलमुळे बेल्जियमने बरोबरी साधली. रोमेलू लुकाकू तिथेच असल्याने त्याच्यावर प्रचंड दबाव आला. गोल संख्या १-१ अशी झाली. दुसरीकडे, इजिप्तच्या प्रशिक्षकाने ७५ व्या मिनिटाला बदल करत मोहम्मद सलाहच्या जागी हमजा अब्देलकरीमला मैदानात आणले.

यानंतर, ८१ व्या मिनिटाला, बेल्जियमची फ्री-किक झेप घेतलेल्या शोबेरने वाचवली. काही क्षणांनंतर, त्याने लुकाकूच्या हेडरवर आणखी एक उत्कृष्ट बचाव केला. दोन्ही संघांना गोल करण्याच्या अधिक संधी मिळाल्या, परंतु कोणालाही आपल्या संधींचे गोलांमध्ये रूपांतर करता आले नाही. अखेरीस, सामना १-१ असा बरोबरीत संपला. (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

### फिफा फुटबॉल विश्वचषक

**पोर्तुगाल वि. काँगो**
**वेळ :** बुधवारी रात्री १०:३० वाजतापासून
**स्थळ :** एनआरजी स्टेडियम, ह्युस्टन

**इंग्लंड वि. क्रोएशिया**
**वेळ :** बुधवारी रात्री १:३० वाजतापासून
**स्थळ :** एटी अँड टी स्टेडियम, डल्लास

**घाना वि. पनामा**
**वेळ :** बुधवारी पहाटे ४:३० वाजतापासून
**स्थळ :** बीएमओ फील्ड, टोरंटो

**उझबेकिस्तान विरुद्ध कोलंबिया**
**वेळ :** बुधवारी सकाळी ७:३० वाजतापासून
**स्थळ :** एस्तादियो अझ्टेका, मेक्सिको सिटी
**थेट प्रसारण :** युनाईट ८ स्पोर्ट्सवर

# इराण-न्यूझीलंड सामना २-२ ने बरोबरीत

**लॉस एंजेलिस, १६ जून**

लॉस एंजेलिस स्टेडियमवर झालेल्या एका रोमांचक सामन्यात इराणने दोनदा पिछाडीवरून मुसंडी मारत न्यूझीलंडसोबत २-२ अशी बरोबरी साधली. सोमवारी झालेल्या या सामन्यासंदर्भात मैदानाबाहेरील चिंतांमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था आणि स्टेडियमबाहेरील निदर्शने यांचा समावेश होता.

ख्रिस वूडने दिलेल्या पासवर एलिजा जस्टने बॉक्सच्या आतून व्हॉली शॉट मारून न्यूझीलंडला सामन्यात लवकर आघाडी मिळवून दिली, तेव्हा इराण सरकारवर टीका करणार्या काही चाहत्यांनी न्यूझीलंडच्या समर्थकांसोबत जल्लोष केला. ७०,००० हून अधिक प्रेक्षकांपैकी बहुतांश जण 'टीम मेल्ली'च्या पाठीशी खंबीरपणे उभे होते आणि इर-रान! इर-रान! अशा घोषणा देत होते. आणि अर्ध्या तासानंतर लगेचच रामिन रझाईयानने बरोबरी साधल्यावर जल्लोष झाला. अमेरिका आणि इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यांमुळे देशांतर्गत लीग स्थगित झाल्याने फेब्रुवारीपासून क्लब फुटबॉल न खेळलेल्या इराणच्या अनेक खेळाडूंपैकी एक असलेल्या रझाईयानने, अडवलेल्या शॉटवर सर्वांत जलद प्रतिक्रिया दिली आणि पुढे सरकणार्या गोलकीपरला चकवून चेंडू गोलमध्ये ढकलला. दुसर्या हाफच्या सुरुवातीला वूड आणि जस्ट यांनी पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली. न्यूझीलंडच्या कर्णधाराने २६ वर्षीय फॉरवर्डच्या दिशेने एक अचूक पास दिला, ज्यानंतर जस्टने जोरदार फटका मारून गोल केला आणि 'ऑल व्हाईट्स'ची आघाडी पुन्हा मिळवून दिली.

१० मिनिटांनंतर इराणने मोहम्मद मोहेब्बीच्या शानदार गोलने प्रत्युत्तर दिले. त्याने रझाईयानच्या अचूक क्रॉसवर हेडर मारून चेंडू दूरच्या पोस्टला लागून गोलमध्ये टाकला आणि सामना २-२ असा बरोबरीत आणला. या स्पर्धेत तिसर्यांदा सहभागी होणारा न्यूझीलंड संघ सात सामन्यांनंतरही विश्वचषकात विजयाविना आहे. इराण प्रथमच नॉकआऊट फेरी गाठण्याच्या प्रयत्नात आहे.

या सामन्यामुळे इराणी-अमेरिकन चाहत्यांमधील मतभेद उघड झाले. त्यापैकी अनेकांनी सांगितले की, खेळाच्या सर्वात मोठ्या मंचावर इराणला पाहण्याचा अभिमान, तेहरानने आंदोलकांवर केलेल्या कारवाईबद्दलचा संताप आणि वॉशिंग्टनच्या बॉम्बहल्ला मोहिमेबद्दलची चिंता यांत ते अडकले होते. (वृत्तसंस्था)

# 'निलेश गायकवाड अकॅडमी रेड' अजिंक्य

### आपटे ग्रुप क्रिकेट स्पर्धा: ब्लू संघावर ९१ धावांनी मात; सार्थक कन्ना सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १६ जून -**

साउथ सोलापूर आपटे ग्रुप आयोजित लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी रेड संघाने ब्ल्यू संघाचा ९१ धावांनी पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली.

दयानंद क्रिकेट ग्राउंडवर झालेल्या या स्पर्धेतील विजेता व उपविजेत्या संघांना रणजी क्रिकेट खेळाडू प्रवीण देशट्टी यांच्या हस्ते चषक देण्यात आले. अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी रेड संघाने निर्धारित ५० षटकांत ८ गडी बाद २१२ धावांचा डोंगरा उभा केला.

यामध्ये सार्थक कन्ना याने ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली, तर अनुज मुंदडा याने ३० आणि रणबीर बुमरा याने २५ धावांचे योगदान दिले. अकॅडमी ब्लू संघाकडून गोलंदाजी करताना संस्कार गवळी आणि अनिश विरळी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले, तर आदित्य चटके, गणेश पवार, आर्यन हांगे आणि ईश्वर सहारन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. २१३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी ब्लू संघाचा डाव ३५.५ षटकांत १२१ धावांवर आटोपला. ब्लू संघाकडून यशराज टेकाळे याने सर्वाधिक ४० धावा केल्या, तर यश पवार याने १५ आणि श्रवण मैत्री याने १४ धावा केल्या. अकॅडमी रेड संघाच्या ऋग्वेद पाटील याने अचूक गोलंदाजी करत ३ बळी घेतले, तर आर्यन भुमकर आणि सार्थक कन्ना यांनी प्रत्येकी २ बळी घेत त्याला उत्तम साथ दिली.उत्कृष्ट फलंदाजी (५७ धावा) आणि गोलंदाजी (२ बळी) करणाऱ्या सार्थक कन्ना याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.



### युधवीर सिंगच्या जागी अशोक शर्माचा इंडिया 'अ' संघात समावेश

**डाम्बुला, १६ जून**

वेगवान गोलंदाज अशोक शर्माचा श्रीलंकेत सुरू असलेल्या तिरंगी मालिकेसाठी दुखापतग्रस्त युधवीर सिंगच्या जागी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. आयपीएलमध्ये गुजरात खेळताना टायटन्सकडून अशोकने आपल्या वेगाने सर्वांना प्रभावित केले होते. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) एका निवेदनात म्हटले आहे, १३ जून रोजी गोलंदाजी करताना युधवीर सिंगने त्याच्या उजव्या खांद्यात

अस्वस्थता जाणवल्याची तक्रार केली आणि ११ जून रोजी सराव सत्रादरम्यान त्याला तशाच वेदना जाणवल्या. निवेदनात पुढे म्हटले आहे, तज्ज्ञाचा सल्ला घेतल्यानंतर, बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने शिफारस केली आहे की युधवीरने दुखापतीतून पूर्णपणे बरे होण्यासाठी बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये (सीओई) पुनर्वसन करावे. तिरंगी मालिकेत इंडिया 'अ' संघाने आतापर्यंत आपले दोन्ही सामने गमावले आहेत.

# खुल्या गटात श्रेयस कुदळे, सान्वी गोरे विजेते

### विविध वयोगटात आदिराज, नियान, आयुष, पृथा, संस्कृती व ईशा अव्वल

### 'स्वाद चषक' खुली व महिला जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. १६ जून-**

'स्वाद चषक' खुली व महिला गटाच्या जिल्हास्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धेत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अकरा वर्षीय प्रतिभावान खेळाडू श्रेयस कुदळे याने उत्कृष्ट खेळाच्या जोरावर मातब्बर खेळाडूंचा पराभव करत सात पैकी साडेसहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

बार्शीची राष्ट्रीय खेळाडू सान्वी गोरे हिने महिलांच्या गटात पूर्णपणे वर्चस्व ठेवत सहा पैकी सहा गुणांसह जेतेपद पटकाविले. तसेच आदिराज म्हेत्रे, नियान कांदिकटला, आयुष बदवणे, पृथा ठोंबरे, संस्कृती जाधव, ईशा पटवर्धन यांनीदेखील आकर्षक खेळ करत अनुक्रमे १५, ११ व ८ वर्षांखालील गटात अव्वल स्थान मिळविले.

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने चॅम्प चेस स्कूल व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात बार्शीचा मानांकित शंकर साळुंके, विहान कोंगारी व प्रज्वल कोरे यांनी उत्कृष्ट खेळत व मुलींच्या गटात आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे हिने ५ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर सृष्टी तोंडले व बार्शीची आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अनन्या उलभगत यांनी प्रत्येकी चार गुणांसह तिसरा व चौथा क्रमांक पटकावित सोलापूर जिल्हा संघातील स्थान निश्चित केले. प्रथम आलेल्या चारही खेळाडूंची निवड आगामी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

जुळे सोलापुर येथील टाकळीकर मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास बँक ऑफ महाराष्ट्राचे विभागीय व्यवस्थापक मिथिलेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ख्यातनाम बालरोगतज्ञ डॉ. वेंकटेश यजुर्वेदी, स्पर्धेचे प्रायोजक व नामवंत उद्योजक गणेश सावंत, सादिक नदाफ, संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी स्पर्धेचे प्रमुख पंच उदय वगरे, उद्योजक प्राणेश वैद्य, टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले. विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक चषक व पदके देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहाय्यक पंच म्हणून राष्ट्रीय वरिष्ठ पंच रोहिणी तुम्माराठी, पद्मजा घोडके आदींनी यशस्वीरित्या काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल (अनुक्रमे क्रमांक, गुण व बोकोल्स गुणांसह):**

**खुला गट:** श्रेयश कुदळे - ६.५, शंकर साळुंखे- ६,विहान कोंगारी- ५.५ (२९), प्रज्वल कोरे-५.५ (२६.५), मनस गायकवाड-५ (३१.५), दत्तात्रेय गोरे-५(२४.५),युवराज गायकवाड-४.५ (२९.५), चंद्रशेखर बसर्गीकर-४.५ (२९), देवदत्त पटवर्धन-४ (२८.५), सुप्रीत घनाते-४ (२७.५). **महिला:** सानवी गोरे-६, स्वराली हातवळणे-५, सृष्टी तोंडले-४.४ (१९.५), अनन्या उलभगत-४.५ (१८.५), नवीना वडीशेरला-४ (१७), साक्षी पाटील-४ (१५.५), आरोही दलाल-३ (१९), सानवी होर्टीकर-३ (१८.५), काव्या पाटील-३ (१७), दिशा भांडेकर-२

**१५ वर्षे मुले:** अदिराज म्हेत्रे -५.५, नैतिक होटकर-५ (२४.५), नागेश राजमने-५, श्रेयश कंदीकटला-४.५ (२६), हिमांशू व्हनगावडे-४.५ (२४). **मुली:** पृथा ठोंबरे-४ (२१), तेजल चीलगुंडे-४ (२०.५), खुशी तोंडले-४ (१६.५), स्वरा कस्तुरे-३ (१६), फिजा शेख-३ (१४)

**११ वर्षे मुले:** नियान कंदीकटला-५, वेदांत पांडेकर-४.५ (२७.५), श्लोक चौधरी-४.५ (२४.५), श्रेयश इंगळे-४.५ (२४), नचिकेत तोंडले-४. **मुली:** संस्कृती जाधव-४,मनस्वी क्षीरसागर-३(२०.५),श्रुती बनसोडे-३(१९.५), आर्वी सदाफुले-३(१५), हिंदवी मोरे-२.

**८ वर्षे मुले:** आयुष बदवने- ४,नक्ष श्रीराम-३ (२३),मिथिलेश होर्टीकर-३ (२०.५), ओम सारवडकर-३(२०), विराज शेंडगे-३ (१८). **मुली:** ईशा पटवर्धन-४,श्रुती भारती-२(१७),त्रिशा पाडूळे-२(१५),शार्वी गांधी-१(१२),श्रीजा जांभळे-१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शिक्षण, आरोग्य विभागातील प्रलंबित प्रश्नांवर भर

## सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

जिल्हा परिषद कार्यालयात आयोजित शिक्षण व आरोग्य समितीच्या बैठकीत संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी नागरिकांनी आपल्या अडचणी, तक्रारी आणि मागण्या मांडत निवेदने सादर केली. यावर नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यावर त्वरित उपाययोजना व्हाव्यात, यासाठी बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्याची माहिती शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतन सिंह केदार सावंत यांनी दिली.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्यासह आरोग्य व शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान शिक्षण व आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा घेत नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. विशेषतः शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील प्रलंबित विषयांबाबत अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा देण्याच्या सूचना देण्यात आल्या.




यावेळी उपस्थित नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेण्यात आल्या. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, तसेच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक सक्षम व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशील व उत्तरदायी पद्धतीने काम करावे, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. नागरिकांचा विश्वास आणि सहभाग यांच्या बळावर विकासकामांना अधिक गती देत तळागाळातील प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**'जनतेचा विश्वास, विकासाचा ध्यास'**

नागरिकांच्या समस्या सोडवणे, शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आणि जिल्ह्याच्या विकासाला गती देणे हेच आपल्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले.

**केंद्रप्रमुख नियुक्ती निरसन**

नूतन ९९ केंद्रप्रमुखांचे समुपदेशन करून नियुक्ती प्रदान केली जाणार आहे. या नियुक्ती संबंधी कोणाची काही तक्रार असल्यास त्याचे निरसन करण्यात येणार आहे.

**जागेसह इमारतीची पाहणी**

शहर जिल्ह्यातील आरोग्य केंद्र तसेच जिल्हा परिषद शाळेच्या मालकीच्या इमारतीची आणि जागेची पाहणी करून धोकादायक अवस्थेत आलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या जागेवर अतिक्रमण वाढलेले आहेत. त्याची माहिती देखील घेतली जाणार आहे.

**गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार**

जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयांमध्ये प्रवेश मिळवले आहे. अशा गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांसह कौशल्यपूर्ण शिक्षकांचा देखील पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे त्याचे नियोजन केले जाणार आहे.

## महत्वाचे...

### दिव्यांग प्रवाशांच्या हक्कासाठी वैजीनाथ धेडे यांचा लढा यशस्वी

**सोलापूर, दि. १६ जून-**

एसटी महामंडळाच्या बसमध्ये दिव्यांग प्रवाशांना त्यांच्या हक्काच्या राखीव जागा मिळण्यात येणाऱ्या अडचणींविरोधात सामाजिक कार्यकर्ते वैजीनाथ औदुंबर धेडे (रा. कातेवाडी, ता. मोहोळ) यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या निवेदनाची दखल घेत सोलापूर विभागीय नियंत्रकांनी विभागातील सर्व आगारांना दिव्यांग प्रवाशांच्या सुविधांबाबत कडक आदेश जारी केले आहेत.या आदेशानुसार बसमधील दिव्यांगांसाठी राखीव आसने ठळकपणे दर्शविणे, त्यावर फलक लावणे, प्रवासादरम्यान आरक्षित आसन उपलब्ध करून देणे, बसमध्ये चढताना-उतरताना मदत करणे तसेच दिव्यांगांशी गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय दिव्यांग प्रतिनिधींचा समावेश असलेली तक्रार निवारण समिती स्थापन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ७ जून २०२६ रोजी वैजीनाथ धेडे यांनी पुराव्यांसह निवेदन सादर केले होते. त्यानंतर १५ जून रोजी हे आदेश जारी करण्यात आले. दिव्यांगांना सुरक्षित व सन्मानजनक प्रवास मिळणे हा त्यांचा कायदेशीर अधिकार आहे. हा लढा संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांसाठी आहे, अशी प्रतिक्रिया धेडे यांनी दिली.

### वाळू तस्कर जालिंदर कंडरे दोन वर्षांकरिता जिल्ह्यातून हद्दपार

**पंढरपूर, दि.१६ जून-**

येथील शहर पोलीस ठाणे हददीतील सराईत वाळु तस्कर गुन्हेगार जानुकाका उर्फ जालिंदर मोहन कंडरे (रा. कंडरे चौक, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर) यांच्याविरूध्द वरिष्ठ पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे पंढरपूर शहर पोलिस ठाणे यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(१)(ब) प्रमाणे तडीपारीचा प्रस्ताव तयार करून हददपारीचे कारवाईबाबत उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांना अहवाल सादर केला होता. त्याबाबत सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत यांनी सदर हददपार करणेच्या संदर्भातील काम चालवुन सदरबाबतचा अहवाल उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांच्याकडे सादर केला होता. त्या अनुषंगाने वाळू तस्कर जानुकाका उर्फ जालिंदर मोहन कंडरे (रा. कंडरे चौक, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर) यास २ वर्षे कालावधीकरीता संपूर्ण सोलापूर जिल्हयातुन हददपार करण्यात आले असून सदरची नोटीस ही हददपार इसम यांना ताब्यात घेवून बजावण्यात आली आहे. सदरची कामगीरी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, सहाय्यक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोसई नितीन जगताप, सपोफौ कल्याण ढवणे, पोलिस नाईक सचिन इंगळे, तसेच स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणचे अनिस शेख व सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे.

### मध्य रेल्वेच्या पेन्शन अदालतमध्ये ८६ तक्रारींचे निवारण

**सोलापूर, दि. १६ जून-**

भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाची 'सुशासन' आणि 'नागरिक-केंद्रित प्रशासन' ही वचनबद्धता जोपासत, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १५ जून रोजी विभागीय रेल्वे कार्यालय येथे २०२६ मधील पहिली 'पेन्शन अदालत' आयोजित केली. निवृत्त रेल्वे कर्मचारी आणि कौटुंबिक निवृत्तीवेतनधारकांच्या (फर्फमिली पेन्शनर्स) तक्रारींचे त्वरित आणि प्रभावी निवारण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. पेन्शन अदालतमध्ये निवृत्त कर्मचारी आणि कौटुंबिक निवृत्तीवेतनधारकांनी सादर केलेल्या एकूण ८६ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली. विशेष म्हणजे, या सर्व ८६ तक्रारींचे जागेवरच निवारण करण्यात आले, जे विभागाची कार्यक्षम सेवा आणि तत्पर प्रशासनाप्रती असलेली कटिबद्धता दर्शवते. तक्रार निवारण प्रक्रियेचा एक भाग म्हणून, पात्र निवृत्त कर्मचारी आणि कौटुंबिक निवृत्तीवेतनधारकांना थेट बँक हस्तांतरणाद्वारे एकूण ६,८८५ रुपयांची रक्कम वितरित करण्यात आली, ज्यामुळे देय रकमेची वेळेवर पूर्तता झाली. पेन्शनशी संबंधित समस्यांचे त्वरित निवारण करण्यासाठी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे लाभ व सेवा कोणत्याही अडचणीविना मिळवून देण्यासाठी विभाग कटिबद्ध आहे.

### अंशुमन वाघमारेला एम.एच.सीईटी परीक्षेत ९९.२७ टक्के गुण



**सोलापूर, दि. १६ जून-**

येथील अंशुमन वाघमारे हा एम.एच.सीईटी परीक्षेत पीसीएम ग्रुपमध्ये ९९.२७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला. सोलापूर महापालिकेतील उपअभियंता अविनाश वाघमारे यांचा तो मुलगा आहे.

## निधन वृत्त...

### भागिरथी पाटील



**अक्कलकोट, दि.१५ जून -**

ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्वर्गीय सिद्रामप्पा पाटील (वय ८२) यांच्या पत्नी भागिरथी सिद्रामप्पा पाटील यांचे सोमवारी दि.१५ जून रोजी सकाळी ९ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. भागिरथी पाटील यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

### रविकांत गायकवाड



**सोलापूर, दि. १६ जून-**

बुधवार पेठ मिलिंद नगर येथील रविकांत तिपण्णा गायकवाड (वय ३७) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पूना नका स्मशानभूमी येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा चार भाऊ एक बहीण असा परिवार आहे. त्यांचा यांचा जलदान विधीचा कार्यक्रम बुधवार (दि.१७)रोजी सायंकाळी ७ वाजता त्यांच्या निवासस्थानी होईल.

# विविध शाळांमध्ये नवगतांचे स्वागत, मोफत पाठ्यपुस्तके अन् गणवेश वाटप



## निर्मलाताई ठोकळ प्रशाला

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी स्वागतोत्सव सोहळा आयोजित केला होता.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाब पाकळ्या उधळून, साखर भरवून स्वागत करण्यात आले.कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष श्री सचिन शं.ठोकळ, प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा पत्रकार संघांचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, प्रसिद्ध साहित्यिक महेंद्र कदम तर सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. लालसिंग रजपूत, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, महादेव सुरवसे, हरी कदम, प्राचार्य डी. डी. गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे व साहित्यिक महेंद्र कदम यांनी शाळेची घंटा वाजवून शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली. कार्यक्रमासाठी प्राचार्य डी डी. गाजरे यांचे मार्गदर्शन मिळाले. सूत्रसंचालन चव्हाण पी. एच. यांनी केले तर आभार प्रदर्शन ए. यु जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले.

## उमाबाई श्राविका विद्यालय

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव तसेच गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजन कंपनीचे पी.आर.ओ.माधव देशपांडे तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या विश्वस्त देवई शहा, प्रशालेच्या मुख्याध्यापिका अश्विनी पंडित, उपमुख्याध्यापिका माधवी खोत, मार्गदर्शिका दीप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची उपस्थिती लाभली. संगीत शिक्षिका पल्लवी खांडवे व सोनाली उंडे यांनी स्वागतगीताद्वारे मान्यवरांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका अश्विनी पंडित यांनी प्रास्ताविक केले. यावेळी भारत टॅलेंट सर्चस्पर्धा परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या व इस्रो सहलीस निवड झाल्याबद्दल प्रतीक काकडे, ऑल इंडियन टॅलेंट ओलंपियाड स्पर्धेत राज्यात तृतीय व डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणाऱ्या आयान हरून तांबोळी, एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत क्रमांक घटकावून १२ हजार रुपये शिष्यवृत्ती संपादन केल्याबद्दल अंशुक कांबळे, ऑलिंपियाड स्पर्धेत राज्यात सातवा क्रमांक संपादन केल्याबद्दल श्रावणी कोंडुभैरी या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते पालकांसमवेत सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचे यादीचे वाचन सहशिक्षक अनुप कस्तुरे व अभिजीत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अनुप कस्तुरे व राजश्री आगरखेड यांनी केले, तर आभार सुहास छंचुरे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करून करण्यात आली. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी फलक लेखन सुंदर रित्या रेखाटले होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अभिनंदन उपाध्ये, वैभव बारडकर यांनी परिश्रम घेतले.





## महाराष्ट्र विद्यालय, बार्शी

महाराष्ट्र विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्र विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आनंद, उत्साह आणि नवचैतन्य निर्माण करणाऱ्या या स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे हे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका कांचन मोहिते उपस्थित होत्या. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, प्रा. संजय बागल, पालक प्रतिनिधी गणेश गोडसे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका के. डी. धावणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते काही विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार पर्यवेक्षक के. जी. मदने यांनी मानले.

## आदर्श पब्लिक स्कूल, कुर्डूवाडी



नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त आदर्श पब्लिक स्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून, कपाळावर तिलक लावून व पुष्पवर्षाव करत स्वागत करण्यात आले. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला पेन्सिल व चॉकलेट भेट देण्यात आली. कार्यक्रमास संस्थापक अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे उपस्थित होते.

## जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर, कुर्डूवाडी

जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिरात शाळेत पाठ्यपुस्तके वाटप करत गुलाब पुष्प देऊन शाळेच्या पहिल्याच दिवशी आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापिका सारिका गोटे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका सारिका गोटे उपस्थित होते



## श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट

मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल शतकोत्तर ऐतिहासिक वारसा लाभलेली शाळा असून मी या शाळेत शिकलो याचा मला सार्थ अभिमान आहे. या शाळेला उज्जल परंपरा असून आता या प्रशालेत शिक्षण घेणारे विद्यार्थी सुदैवी आहेत असे प्रतिपादन नगरसेवक व प्रशालेचे माजी विद्यार्थी महेश हिंडोळे यांनी केले. शाळेच्या पहिल्या दिवशी येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल, अक्कलकोट येथे शाळेचा पहिला दिवस पुष्प देऊन स्वागत करून प्रवेशोस्तव साजरा करण्यात आला. शासकीय मोफत पाठ्य पुस्तके वाटप करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर.एस. पडवलकर हे होते. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक वाय. पी.कबाडे, पालक गणपतराव देवकर, महादेव जगताप, पवार, माळवदकर, गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापक पडवलकर यांनी स्वागत करून नवीन वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन एस. एस. महाडकर यांनी केले तर आभार एम. एम.जाधव यांनी मानले.



## पुरंदावडे जि. प. शाळा, माळशिरस

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुरंदावडे येथे शाळेच्या पहिल्या दिवशी अनोख्या अशा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला पहिलीतील सर्व नवागतांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. चिमुकल्यांच्या पावलांचे ठसे घेऊन ते पालकांना देण्यात आले.नंतर सर्वांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर सरपंच राणी मोहिते, उपसरपंच देविदास ढोपे, पोपटराव गरगडे, विकास सोसायटीचे चेअरमन जनार्दन शिंदे, मोहनानंद महाराज, उपसरपंच नामदेव बोडरे, ग्रामपंचायत सदस्या सुनीता ओवाळ, पोलिस पाटील, शेखर ओवाळ, माजी मुख्याध्यापक फाळके, ज्ञानदेव राऊत, विजय रुपनवर येळीव येथील देशमुख उपस्थित होते. प्रस्ताविक मुख्याध्यापक डॉ. प्रेमनाथ रामदासी यांनी केले. यावेळी पोपटराव गरगडे व उपसरपंच देविदास ढोपे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका सुनीता आंदळकर, स्वाती गायकवाड, श्रद्धा कुलकर्णी, शुभम म्हसवडे यांनी परिश्रम घेतले. पुरंदावडे गावातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचेही सहकार्य लाभले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व विधान परिषदेचे माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवरत्न वेल्फेअर ट्रस्ट यशवंतनगर अकलूज तालुका माळिशरस जिल्हा सोलापूर यांच्या वतीने शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले

# संघशताब्दीनिमित्त डॉ.हेडगेवार पटांगण सुशोभीकरणासाठी एक कोटींचा निधी

## आमदार देवेंद्र कोठे : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या तपपूर्तीनिमित्त 'भाजपा'तर्फे महाआरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जून-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचा चौफेर विकास होत आहे. या विकासप्रवाहात सोलापूरलाही आणण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त पूर्वभागातील दाजी पेठ येथील डॉ.हेडगेवार पटांगणाच्या सुशोभीकरणासाठी १ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा आमदार देवेंद्र कोठे यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या तपपूर्तीनिमित्त पूर्व भागातील श्री यल्लमा मंदिरात भाजपा शहर मध्य विधानसभेतर्फे सोमवारी महाआरती करण्यात आली. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, मोनिका कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्री यल्लमा मंदिरात महाआरती करण्यात आली.



सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात देवस्थानांना सभामंडप आणि अन्य कारणांसाठी लागणाऱ्या भरघोस निधी देण्यात येत आहे. एकाही देवस्थानाला निधी कमी पडणार नाही. मागील १५ वर्षांमध्ये शहर मध्य विधानसभा मतदारसंघात डॉ. हेडगेवार पटांगण दुर्लक्षित झाले होते. परंतु आगामी काळात या पटांगणाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. पूर्व भागातील मिरवणूक मार्गांवरील विद्युततारा अंडरग्राउंड करण्यासाठीची तयारी सुरु असल्याचेही आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, श्री यल्लम्मा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकांत बोगा, उपाध्यक्ष रामलू जोरीगल, सचिव कमलेश बल्ला, सहसचिव भास्कर गोसकी, खजिनदार श्रीनिवास मिठ्ठा, मॅनेजर चंद्रकांत लगशेट्टी, नगरसेवक मेघनाथ येमुल, अजय पोन्नम, ज्ञानेश्वर म्याकल, श्रीनिवास दायमा, सत्यनारायण गुर्रम, अक्षय अंजिखाने, बिज्जू प्रधाने, शेखर इगे, विजय चिप्पा, विनोद भोसले, शिवाजी वाघमोडे, ऋषिकेश मेट्रे, मनीष केत, युवराज सरवदे, सिध्देश्वर कमटम, प्रशांत पल्ली, भारतसिंग बडुरवाले, नगरसेविका सुनीता कामाठी, मंदाकिनी तोडकरी, जुगनबाई आंबेवाले, श्वेता खरात, श्रीकांचना यन्नम, राजश्री दोडमणी, सारिका खजूरगी यांच्यासह नागनाथ कृ. सोमा, रवींद्र नक्का, गुरुशांत धुत्तरगांवकर, अंबादास बिंगी, नागेश सरगम, प्रकाश गाजूल, अनिल वंगारी, रवी कैय्यावाले, शंकर चौगुले, अक्षय वाकसे, लक्ष्मण गायकवाड, प्रा.नारायण बनसोडे, सुधा अळ्ळीमोरे, नागेश खरात, अप्पू कडगंची, बजरंग कुलकर्णी, रवी भवानी, राम गड्डम, यशवंत पाथरुट, दत्ता पाटील, जय साळुंखे, विजयकुमार रामपुरे, श्रीकांत वाडेकर, दास भंडारी, समशेर आंबेवाले, विजय धोत्रे, किरण भंडारी, हरीश जंगम, अशोक बिटला आदी उपस्थित होते.

# लोकनृत्याच्या जल्लोषाने महिला महोत्सव रंगला





## आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरविद्यापीठ महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा 'महिला महोत्सव-२०२६' मध्ये मंगळवारी लोकनृत्य, रोड रेस, खो-खो आणि रस्सीखेच स्पर्धांनी विशेष रंगत आणली. राज्यातील विविध विद्यापीठांतील महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कलागुणांसह क्रीडा कौशल्याचे दर्शन घडवत महोत्सवाचे वातावरण उत्साह, ऊर्जा आणि आनंदाने भारुन टाकले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या महोत्सवात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ या पाच विद्यापीठांतील महिला कर्मचारी सहभागी झाल्या आहेत.

महोत्सवातील लोकनृत्य स्पर्धा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्या. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीची झलक दाखविणाऱ्या विविध पारंपरिक नृत्यप्रकारांचे सादरीकरण सहभागी संघांनी केले. रंगीबेरंगी वेशभूषा, तालबद्ध हालचाली, लोककलेचे प्रभावी दर्शन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणाऱ्या सादरीकरणांमुळे उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक विद्यापीठाच्या संघाने आपल्या परिसरातील सांस्कृतिक वैशिष्ट्ये लोकनृत्यातून प्रभावीपणे साकारत प्रेक्षकांची दाद मिळविली.

रोड रेस स्पर्धेत तब्बल ५५ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धकांचा उत्साह, जिद्द आणि फिटनेस यांचे दर्शन या स्पर्धेत घडले. महिला कर्मचाऱ्यांनी क्रीडा क्षेत्रातील आपली क्षमता सिद्ध करत स्पर्धात्मक वातावरण निर्माण केले. खो-खो स्पर्धांमध्ये संघभावना, वेग, चपळाई आणि रणनीती यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला. प्रत्येक सामन्यात विजयासाठी खेळाडूंनी केलेल्या प्रयत्नांमुळे सामने अतिशय चुरशीचे झाले.

रस्सीखेच स्पर्धेतही सहभागी संघांनी ताकद, समन्वय आणि जिद्दीचे दर्शन घडविले. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांच्या माध्यमातून राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना एकत्र येण्याची आणि आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळत असून, सोलापूर विद्यापीठाचा परिसर सध्या क्रीडा, कला आणि संस्कृतीच्या उत्साहाने बहरून गेला आहे.

# मंत्रालयावर २५ हजार कामगारांसह 'घरकुल दिंडी' धडकणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

विडी कामगारांना महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेले प्रतिदिन ४०२ रुपये किमान वेतन तात्काळ लागू करावे, कामगारांवर दबाव टाकून संमतीपत्रे घेण्याचे प्रकार थांबवावेत तसेच कॉ. गोदुताई परुळेकर नगर व रे नगर येथील नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवावेत, या मागण्यांसाठी दि.२ ऑक्टोबर २०२६ रोजी सोलापूर ते मुंबई मंत्रालयावर २५ हजार कामगारांसह 'घरकुल दिंडी' काढण्यात येईल, अशी घोषणा माजी आमदार नरसय्या आडम यांनी केली.



मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित सिटू संलग्नित लालबावटा विडी कामगार युनियनच्या वतीने सहायक कामगार आयुक्त कार्यालयसमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, अनेक विडी कारखानदार कामगारांवर शासनाचे किमान वेतन नाकारण्यासाठी दबाव टाकत असून जबरदस्तीने संमतीपत्रे घेण्याचे प्रकार सुरु आहेत. ही कृती कामगारांच्या वैधानिक हक्कांवर गदा आहे. यावेळी सहायक कामगार आयुक्त मंगेश झोले यांना निवेदन देण्यात आले.

सर्व विडी उद्योगांची तात्काळ तपासणी करुन कामगारांवरील दबाव थांबविण्यात यावे, जबरदस्तीने घेतलेली संमतीपत्रे कायदेशीरदृष्ट्या अमान्य घोषित करण्यात यावे, प्रतिदिन ४०२ रुपये किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, दोषी कारखानदारांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात यावी, दबाव किंवा भेदभाव करणाऱ्यांविरुध्द कठोर निर्देश जारी करण्यात यावी यांसह अन्य मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

राज्य व केंद्र शासनाच्या कामगारविरोधी धोरणांविरुध्द सिटूचे राज्य महासचिव एम.एच. शेख यांनी आपल्या भाषणातून सडकून टीका केली. या आंदोलनात युसुफ शेख, नसीमा शेख, ॲड.अनिल वासम, दत्ता चव्हाण, दीपक निकंबे, विल्यम ससाणे, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, वसीम मुल्ला, रफिक काझी, आप्पाशा चांगले, बालाजी तुम्मा, वसीम देशमुख, हसन शेख, वीरेंद्र पद्मा, नरेश दुगाने, नरसिंग बुगले, मल्लेशम कारमपुरी, नरेश गुल्लापल्ली, चंटी बिटला, योगेश आकिम, दिनेश बडगु, बालाजी गुंडे, शिवा श्रीराम, बालकृष्ण मल्याळ, विजय हसुरे, राधागोपाल बंडी, प्रकाश कुऱ्हाडकर, श्रीनिवास तंगडगी, प्रशांत विटे आदी सामील झाले होते.

# पाणी तुंबण्याची समस्या सोडविण्यासाठी महापालिका कटिबध्द : डॉ.ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची साफसफाई, अतिक्रमण निर्मूलन आणि आवश्यक रुंदीकरणाची कामे वेळेत पूर्ण करून नागरिकांना पाणी तुंबण्याच्या समस्येपासून दिलासा देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. कोणत्याही प्रकारचा अडथळा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे. नीलमनगर परिसरातील १२ नंबर नाल्याची पाहणीप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी नगर अभियंता सारिका आकुलवार, सहाय्यक नगर अभियंता प्रकाश दिवाणजी, कनिष्ठ अभियंता मनोज जाधव, नगरसेविका कलावती गदगे, नगरसेविका कविता गज्जम, नगरसेवक बसवराज केंगनाळकर, विभागीय कार्यालय क्र. ४ चे अधीक्षक नंदकुमार गजधनी, कनिष्ठ अभियंता सूफियान पठाण, प्राजक्ता वडतिले, महेंद्र बोटे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

या प्रभागाच्या नगरसेविका कलावती गदगे आणि कविता गज्जम यांनी नाल्याच्या आराखड्यातील त्रुटी निदर्शनास आणून देताना सांगितले की, नाल्याचे नैसर्गिक वळण सध्या वाकडे-तिकडे झाल्यामुळे परिसरात पावसाचे पाणी साचत असून नाल्याचे अलाइनमेंट तांत्रिकदृष्ट्या योग्य पध्दतीने सरळ करण्याची गरज आहे. पावसाचे पाणी रस्त्यावर साचण्याऐवजी नाल्यामार्फत सुरळीतपणे वाहून जाईल यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

जाधव यांच्या जमिनीशेजारी जाणारा नाला काही ठिकाणी बंद करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले असता आयुक्त ओम्बासे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अधिकृत नकाशानुसार नाल्याची साफसफाई आणि रुंदीकरण करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, कामात अडथळा आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे तसेच आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांना पोलिस संरक्षण उपलब्ध करून देण्याचे आदेशही महापालिका आयुक्तांनी दिले.



### सुमय्या नगर येथील नाल्याजवळ जैतुनबी शाळेचे अतिक्रमण

सुमय्या नगर येथील जैतुनबी शाळेजवळील पावसाळी नाला येथील शाळेच्या डाव्या बाजूने जाणाऱ्या बंदिस्त नाल्याच्या इनलेट पॉईटवर, नाल्याच्या मार्गावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले. यावेळी शाळेचे प्रतिनिधी एम.डी. शेख यांनी नाल्याचा मार्ग बदलून तो उजव्या बाजूच्या लोकवस्तीतील रस्त्यातून नेण्याची मागणी केली. मात्र सन २०११ च्या अधिकृत नकाशानुसार संबंधित नाला शाळेच्या डाव्या बाजूने आणि मागील भागातून जात असल्याचे स्पष्ट करताना नाल्याची दिशा बदलणे शक्य नाही. केंद्र शासनानेही याच मूळ आराखड्यानुसार नाला रुंदीकरणाला मंजुरी दिली असून मूळ नियोजनानुसारच काम करण्यात येणार आहे, असे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

# भारतीय मुस्लीम समाजाला सांस्कृतिक मुळांचा स्वीकार करावाच लागेल : गायकर

## संस्कृतीचा स्वीकार व सन्मान हीच खरी राष्ट्रभक्ती

## 'बकर ईद'ला बसला कायदयाचा दट्टा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जून-**

आपण आपल्या संस्कृतीवर ठाम आहोत. त्यामुळे जगभरातील ५७ मुस्लीम देशांमध्ये भारताच्या नेतृत्वाचा आदर होतो. त्यामुळे भारतीय मुस्लीम समाजालाही राष्ट्रीयीकरणाच्या प्रवाहात येण्यासाठी आपल्या सांस्कृतिक मुळांचा अभिमानाने स्वीकार करावाच लागेल, असे रोखठोक प्रतिपादन केंद्रीय सहमंत्री तथा राष्ट्रीय प्रवक्ते शंकर गायकर यांनी केले.

सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, जे त्याज्य आहे ते सोडणे आणि जे श्रेष्ठ आहे ते स्वीकारणे, हाच भारताच्या प्रगतीचा मार्ग आहे. संस्कृतीचा स्वीकार व सन्मान हीच खरी राष्ट्रभक्ती आहे. यंदाच्या बकर ईद काळात कायद्याचा दट्टा बसल्यामुळे 'बकर ईद'च्या दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहिली.

या सणाच्या काळात पशुधनाची बेकायदा अवैध वाहतूक, तस्करी, बेसुमार हत्या यांचा अवडंबर होतो. हिंदू समाजाला हेतुतः त्रास देऊन भावना दुखावण्याचा प्रकार होत होता. राज्य सरकारने कायद्यात असलेल्या तरतुदींची कार्यवाही केली, पोलीस प्रशासन देखील कठोर होते. त्यांनी कठोर भूमिका घेतली होती, असेही त्यांनी सांगितले. अक्कलकोट येथे बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना जिहादी घटकांकडून झालेली मारहाण ही निंदनीय घटना आहे. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणासाठी स्लॉटर हाऊसची व्यवस्था असताना, घराघरांत सुरु असलेल्या या बेकायदेशीर कृत्यांमुळे अनेक हिंदू बांधवांना आपली घरे सोडून स्थलांतर करावे लागले, असेही त्यांनी सांगितले. लॅन्ड जिहाद, लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू तरुण-तरुणींना मुळांपासून तोडण्याचे कारस्थान रचले जात आहे. धर्मांतराचा हा कॅन्सर समाजमनाला पोखरत आहे. संस्कार विसरुन बाह्य प्रभावाखाली जाणारी युवा पिढी ही चिंतेची बाब असून, हे नॅरेटिव्ह मोडीत काढणे काळाची गरज बनली आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

यावेळी प्रांत अध्यक्ष प्रा.गजानन धरणे, प्रांत गोरक्षा संवर्धनचे प्रमुख संतोष खामकर, प्रांत धर्माचार्य सहसंपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, विभाग मंत्री विजयकुमार पिसे, सहमंत्री संजयकुमार जमादार, जिल्हामंत्री जयदेव सुरवसे, सहमंत्री विष्णू जगताप, बजरंग दलाचे संयोजक अभय कुलथे, सहसंयोजक ऋषीकेश गंगदे आदी उपस्थित होते.



### राष्ट्रभक्त पिढी घडवत आहोत

राष्ट्रीय स्वयंसेवक संघासह बजरंग दलाचेही कार्यकर्ते राष्ट्र प्रथम हे व्रत घेऊन ठिकठिकाणी कार्यरत आहेत. नक्षलवादासारख्या हिंसक प्रवृत्तींना रोखण्यासाठी आमचे कार्यकर्ते त्यांच्याशी समरस होऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करत आहेत. देशातील ७० हजार शाखांमधून आम्ही केवळ शाखा चालवत नसून एक राष्ट्रभक्त पिढी घडवत आहोत, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### इंडोनेशियातील मुस्लीम आणि जय श्रीरामचा जयघोष

भारताला विश्वगुरु बनवायचे असेल तर इंडोनेशियातील मुस्लीम समाज ज्याप्रमाणे आपल्या मुळांचा आणि सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगत जय श्रीरामचा जयघोष करतो, तशीच व्यापकता भारतीय मुस्लीम समाजाकडूनही अपेक्षित आहे. संस्कृतीचा सन्मान ही केवळ धार्मिक बाब नसून ती खरी राष्ट्रभक्ती आहे, असेही ते म्हणाले.



वीरशिरोमणी, गंगा आरती, पाळणा कार्यक्रम

**सोलापूर : वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या जन्मोत्सवनिमित्त राजपुत प्रतिष्ठानच्या वतीने सात रस्ता परिसरातील महाराणा प्रतापसिंह पुतळा येथे मंगळवारी सायंकाळी गंगा आरती व पाळण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कानेगाव जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव; ४३ विद्यार्थ्यांचा प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ जून -**

लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षानिमित्त प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिलीमध्ये ४३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांना फेटे बांधून ट्रॅक्टरमधून गावात प्रवेश दिंडी काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी लेझीमचे सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली.



पंचायत समितीचे उपसभापती अमोल पाटील यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात अमोल पाटील यांनी शाळेच्या विविध अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास सरपंच नामदेव लोभे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब कदम, उपाध्यक्ष वाल्मीक पतंगे, ग्रामविकास अधिकारी अश्विन गोरे, मुख्याध्यापक बालाजी साळुंखे, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मच्छिंद्र बोकडे यांनी केले.

## अल निनोचे सावट; बोरी धरणात पाणीसाठा अवघा १२.९८ टक्के, पाणीटंचाईची भीती वाढली

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ जून -**

नळदुर्ग येथील बोरी धरणात दि. १५ जून २०२६ रोजी अवघा १२.९८ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक राहिल्याने धरणावर अवलंबून असलेल्या गावांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याच दिवशी गेल्या वर्षी म्हणजे दि.१५ जून २०२५ रोजी धरणात ५०.८९ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध होता. त्यामुळे यंदा पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याचे चित्र समोर आले आहे.




यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला जात असल्याने भविष्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अल निनोची तीव्रता वाढल्यास पावसाचे प्रमाण आणखी घटण्याची शक्यता असल्याचे यापूर्वीच्या अनुभवातून दिसून आले आहे.

सध्या मृग नक्षत्र संपत आले तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. बोरी धरणातून नळदुर्ग, तुळजापूर, अणदूर या मोठ्या गावांसह जवळपास ८ ते ९ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. तसेच या धरणाच्या कालव्यांद्वारे हजारो हेक्टर शेतीलाही पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे धरण वेळेत भरणे अत्यंत आवश्यक मानले जात आहे.

दरम्यान, गेल्या वर्षी अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे जून महिन्याच्या सुरुवातीलाच बोरी धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली होती. मात्र यावर्षी ना अवकाळी पाऊस झाला, ना मृग नक्षत्रातील अपेक्षित पाऊस पडला.

दररोजचा दिवस कोरडाच जात असल्याचे चित्र आहे. कडक उन्हाळा आणि वेगाने वाहणारे वारे यामुळे पावसाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचेही दिसून येत आहे.

याशिवाय वाढत्या तापमानामुळे धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत असून, त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्यात आणखी घट होत आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास येणाऱ्या काळात गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे प्रशासनाने सध्याच्या पाणीसाठ्याची स्थिती लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे आणि नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करणे काळाची गरज बनली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### आकाश कांबळे यांचा राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरव

**नळदुर्ग, १६ जून -**

नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्ते आकाश संभाजी कांबळे यांना ए. डी. फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजरत्न पुरस्कार २०२६' तसेच राज्यस्तरीय 'आदर्श समाजसेवक' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेमार्फत दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व युवकांचा गौरव करण्यात येतो. यावर्षी आकाश कांबळे यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



### गोशाळेत गाईंच्या पाण्यासाठी सिंगल फेज पंप बसवून सेवाभावी उपक्रम

**कळंब, १६ जून -**

श्री स्वामी समर्थ गोशाळेमध्ये गाईंच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बंद पडल्याने बालाजी मशिनरीचे मालक व त्यांच्या राजस्थानी सहकाऱ्यांनी पुढाकार घेत सिंगल फेज पंप बसवून सेवाभावी उपक्रम राबविला. यावेळी देवाराम जांगिड, अरविंद पटेल, दिलीप सिंह, राकेश चौधरी, मनोहर सिंह, मुकेश कुमार, नारायण गुर्जर, महेंद्र चौधरी आदी उपस्थित होते. गोशाळेचे मुख्य व्यवस्थापक गणेश सदाफुले यांनी सर्वांचे आभार मानून गोमातेच्या सेवेसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.



### लोहारा खुर्द जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**लोहारा, १६ जून -**

लोहारा तालुक्यातील लोहारा खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नवीन विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन अंगद रसाळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच सचिन व्यंकट रसाळ, उपसरपंच सचिन बाळू रसाळ, माजी सरपंच शेखर रावसाहेब पाटील, पोलीस पाटील बिरूदेव सूर्यवंशी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एन.एस. कदम यांनी केले. सूत्रसंचालन औटे यांनी तर आभार प्रदर्शन नितीन कदम यांनी केले.



### अधिक मासानिमित्त ३३ ब्राह्मण जोडप्यांना धोंडे जेवण

**नळदुर्ग, १६ जून -**

नळदुर्ग येथील सेवानिवृत्त परिवहन अधिकारी नंदकुमार डुकरे, महेश डुकरे व सौ. रुपाली डुकरे यांच्या वतीने अधिक मासानिमित्त ३३ ब्राह्मण जोडप्यांना धोंडे जेवण देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. बाळकृष्ण मंदिरात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या डुकरे कुटुंबाने अधिक मासाच्या निमित्ताने हा आगळावेगळा उपक्रम राबविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त भोई समाजाने परिश्रम घेतले. या उपक्रमाबद्दल डुकरे कुटुंबाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### रांजणी जिल्हा परिषद शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**नायगाव, १६ जून -**

कळंब तालुक्यातील शिराढोण केंद्र अंतर्गत रांजणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ निमित्त प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम पंचायत समिती सदस्या योगेश्वरीताई गणेश पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी इयत्ता पहिलीतील नव्याने प्रवेश घेतलेल्या २५ विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गणवेश, पाठ्यपुस्तके व गोड खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

## आरोपींना अटक न झाल्याने उमरग्यात बेमुदत उपोषण सुरू



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जून -**

तुगाव येथील दलित नागरिक भालचंद्र चोकोबा कांबळे यांच्यावर झालेल्या कथित हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याच्या निषेधार्थ ग्रामस्थांनी सोमवारी उमरगा येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले.

१८ मे रोजी भालचंद्र कांबळे यांना जेवणाच्या बहाण्याने बोलावून शेतातील एकांत ठिकाणी नेऊन जातीवाचक शिवीगाळ, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मुरूम पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अटक न झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला असून आरोपींना तात्काळ अटक करून निष्पक्ष तपास करावा, अशी मागणी केली आहे.

या आंदोलनात अनेक ग्रामस्थांसह विविध सामाजिक संघटनांनीही पाठिंबा दर्शविला आहे.

## कडकनाथवाडी शिवारातून मोठ्या प्रमाणात मुरूम वाहतूक; चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१६ जून -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी शिवारातून मोठ्या प्रमाणात मुरम उत्खनन करून तो कळंब तालुक्यासह खामकरवाडी आणि सटवाईवाडी परिसरात वाहतूक केला जात असल्याची माहिती समोर येत आहे. पवनचक्की प्रकल्पांच्या कामांसाठी ही वाहतूक सुरू असल्याचे स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून सांगितले जात आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, उत्खननासाठी आवश्यक परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, तसेच शासनाकडे गौण खनिजाची रॉयल्टी भरली आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात करण्यात येणारी वाहतूक नियमांनुसार होत आहे का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मोठी स्वप्ने पाहून ध्येयपूर्तीसाठी प्रयत्न करा : जिल्हाधिकारी डॉ. पुजार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जून -**

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा, कला आणि स्पर्धा परीक्षांची तयारीही करावी. आयुष्यात मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. प्रत्येक विद्यार्थ्याने मोठे ध्येय ठेवून त्याच्या दिशेने वाटचाल करावी. असे मत जिल्हाधिकारी डॉ. कीर्तीकुमार पुजार यांनी यावेळी मांडले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेश दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आळणी येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. गावातून बँड, लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात बैलगाडी व ट्रॅक्टरमधून विद्यार्थ्यांची आकर्षक मिरवणूक काढण्यात आली. या अनोख्या स्वागत सोहळ्यामुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिरवणूक शाळेत पोहोचल्यानंतर नवागत विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे घेऊन त्यांचे औक्षण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, फुगे व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. कीर्तीकुमार पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्रियंवदा महाडदळकर आणि शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे यांनी विद्यार्थ्यांचा हात धरून त्यांना शाळेत प्रवेश दिला.

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, तलाठी विनोद शिंदे, येडशी केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख बशीर तांबोळी तसेच शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

## ज्ञानज्योती फाऊंडेशनचा पुरस्कार वितरण सोहळा २८ जूनला

### गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जून -**

ज्ञानज्योती फाऊंडेशन, उमरगा यांच्या वतीने मागील १६ वर्षांपासून इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, करिअर मार्गदर्शन मेळावा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना ज्ञानज्योती पुरस्कार प्रदान करण्याची परंपरा जपली जात आहे. यंदाचा १७ वा पुरस्कार वितरण व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा दि.२८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शांताई मंगल कार्यालय, उमरगा येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड हे राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त आयएएस अधिकारी व प्रसिद्ध व्याख्याते डॉ. विजयकुमार फड उपस्थित राहणार आहेत. राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असून शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन होणार आहे.

> **ज्ञानज्योती पुरस्कार २०२६ चे मानकरी ...**
> **सुनील माने** (बेडगा) उद्योग व सहकार क्षेत्र, **प्रवीणचंद्र तोतला** (उमरगा) ज्येष्ठ विधिज्ञ व सामाजिक कार्यकर्ते, **शेखर घंटे** (नारंगवाडी) आदर्श सरपंच, **रसिका कटकधोंड** (केसरजवळगा) महिला गृह उद्योजिका, **गिरीष भगत** (लोहारा) उत्कृष्ट पत्रकार, **संतोष शिंदे** (मुळज) कृषीरत्न. तसेच त्यांच्या कार्याचा विशेष गौरव या सोहळ्यात करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यावेळी ज्येष्ठ शिवसेना नेते जितेंद्र दादा शिंदे, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अश्लेष मोरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष अभय चालुक्य, नगराध्यक्ष किरण गायकवाड, लोहारा पंचायत समितीच्या सभापती पल्लवी जानकर, उपसभापती अमोल पाटील, लोहारा नगराध्यक्षा वैशाली खराडे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास उमरगा व लोहारा तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ज्ञानज्योती फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा उमरगा पंचायत समितीच्या सभापती ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले, उपाध्यक्ष विजयकुमार वडदरे, सचिव प्रदीप मदने आणि कोषाध्यक्ष अमर देशटवार यांनी केले आहे.

## आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जून -**

लोकसेवा समिती धाराशिव संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीराम पाटील होते.

यावेळी आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे, योगेश कुलकर्णी व प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुलभा देशमाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व भारतमाता प्रतिमापूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना इयत्तानिहाय पाठ्यपुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमाकांत कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन सुलभा देशमाने यांनी केले. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगर परिषद शाळा क्रमांक २३ मध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ जून -**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नगर परिषद शाळा क्रमांक २३ येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपाचे नितीन काळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नितीन काळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास बिभीषण लोंढे, किशोर पवार, शिवा तुपे, शाहबाझ शेख, जावेद पठाण, शाहरुख शेख, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, पालक उपस्थित होते.

## दगा-फटका टाळण्यासाठी भाजपचा 'मेगा प्लॅन'? नळदुर्ग-तुळजापूरमधील नगरसेवक सहलीवर रवाना

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ जून -**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव-लातूर-बीड विधानपरिषद मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला असून दगा-फटका टाळण्यासाठी भाजपकडून विशेष रणनीती आखण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या पार्श्वभूमीवर नळदुर्ग, तुळजापूरसह जिल्ह्यातील भाजपचे अनेक नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्य अज्ञातस्थळी सहलीसाठी रवाना झाल्याचे सांगितले जात आहे.

दि.१८ जून रोजी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक होत असून या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांच्यात थेट लढत होत आहे. धाराशिव-लातूर-बीड मतदारसंघात महायुतीकडे भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या माध्यमातून तुलनेने मजबूत संख्याबळ असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. मात्र, या निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब होत असल्याने अनपेक्षित निकालांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणताही धोका पत्करू नये, यासाठी भाजपने खबरदारी घेतल्याची चर्चा आहे.

या निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी भुम-वाशी-परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजी सावंत आणि उमरग्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांची भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. कागदोपत्री महायुती मजबूत स्थितीत दिसत असली तरी पक्ष कोणतीही जोखीम घेण्याच्या मनःस्थितीत नसल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, महाविकास आघाडीच्या हालचाली तुलनेने मंद असल्याचेही बोलले जात आहे. निवडणुकीस अवघे दोन दिवस शिल्लक असतानाही महाविकास आघाडीचे उमेदवार अद्याप नळदुर्ग परिसरात सक्रिय दिसले नसल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. तसेच महाविकास आघाडीच्या काही सदस्यांनाही उमेदवारांची प्रत्यक्ष भेट झालेली नसल्याची चर्चा आहे.



महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील हे विक्रमी मताधिक्याने विजयी व्हावेत, यासाठी महायुतीकडून जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे. तसेच सहलीवर गेलेल्या नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांना मतदानाच्या दिवशी थेट मतदान केंद्रावर आणण्यात येणार असल्याचीही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बसची भाडे वाढ रद्द करण्याची प्रवाशांची मागणी

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. १६ जून : एस . टी . महामंडळाने उन्हाळी गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी प्रवासी वाहतुकीचे नियोजन आणि महसूल वाढविण्यासाठी१५ एप्रिल२०२६ पासून१० टक्के भाडेवाढ लागू केली होती . ही भाडेवाढ१५ जून रोजी संपणार होती . परंतु ही भाडेवाढ१५ जुलै पर्यंत कायम ठेवले जाणार असल्याचे महामंडळाचे म्हणणे असून डिझेल च्या किमतीत सातत्याने होणारी वाढ, महामंडळावर पडणारा प्रचंड आर्थिक ताण, कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात झालेली वाढ यामळे तिजोरीवर होणरा परिणाम या कारणामुळे नाईलाजासव हा निर्णय घेतल्याचे महामंडळाचे म्हणणे असल्याने प्रवाशी नाराज झाल्याचे दिसून येत आहे . कारण आता तिकीट कमी होईल अशी आशा होती पण ती फेल ठरली .

आजच्या घडीला महागाई इतकी वाढली आहे की, सर्वसामान्यांच्या खिशाला कात्रीच लागली आहे . भाजीपाला, किराणा, बसप्रवास, रिक्षाप्रवास किंवा इतर खाजगी वाहनांतून होणारा प्रवास, दूध बिस्कीट, गॅस, कपडे, वह्या - पुस्तके - दप्तर, इतर स्टेशनरी सामान, शाळेचा गणवेश, बुट, चप्पल, शॉन्डेल इत्यादी . यांच्या किमती यंदा भरमसाठ वाढलेल्या आहेत . बसच्या वाढलेल्या किमती होऊन तेवढाच प्रवाशांना दिलासा मिळाला असता पण दरवाढ एक महिन्यांसाठी कायम ठेवल्यामुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे



सर्वसामान्य प्रवाशांना या निर्णयाने दिलासा मिळाला नाही सर्व सामान्य प्रवाशी म्हणतात एस . टी . महामंडळ प्रवाशांवरच अवलंबून असते . आम्ही प्रवासच केला नाही तर महामंडळ जागेवर राहिल का? आमच्या जिवावर असून आम्हालाच कोलता का? एक महिना भाडे वाढ प्रवासी समजून घेतील पण केलेली भाडेवाढ रहित न करता पुढे महिन्याभरासाठी कायम ठेवले त्या नियमाने किंवा हे करताना प्रवाशांचे मतं घेतली का? तुमच्याकडे अधिकार आहे म्हणून काहीही मनमानी करता ?

महामंडळाचे असे ही म्हणणे आहे की, वर्षाला महामंडळाला३००/ कोटींच फटका बसतो . हे खरे असू शकते . पण तुमच्या वाहक - चालकांकडे तुमची नजर असते का ? ते बसमध्ये किती प्रवाशी घेतात . बसस्थानात किती वेळ थांबतात ? लातूरच्या बसस्थानकात कोणत्याही अधिकाऱ्यांनी साध्या वेशात किमान एक ते दोन तास स्थानकात थांबून बघावे म्हणजे खरे काय ते लक्षात येईल . एसीमध्ये बसून, फक्त गप्पा मारून खरी परिस्थिती लक्षात येत नाही . कधी कधी बसमध्ये पाठीमागे बसून बसमधील प्रताप बघावेत म्हणजे खरे काय ते समजेल .

एखादा अधिकारी गणवेशात असेल अशावेळी वाहक - चालक सौजन्यने वागताना दिसतात इतर वेळी आपली मनमानी करताना दिसतात . हे कटू सत्य नाकारून चालेल का ?

महामंडळाचे हात दाखवा गाडी थांबवा हे ब्रीद होते . आज हे लोप पावले असल्यामुळेच प्रवाशांना हकनाक त्रास सहन करावा लागत आहे . आज पुन्हा हे ब्रीद वाक्य महामंडळाने सुरु करावे म्हणजे प्रवाशांची सोय होईल आणि महामंडळ आर्थिक संकटांपासून दूर होईल .

## संक्षिप्त...

### लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात नवागतांचे उत्साहात स्वागत




तभा वृत्तसेवा

उदगीर : येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे,शालेय समिती सदस्य डॉ.प्रकाश येरमे,पालक प्रतिनिधी श्री खंदाडे,मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे,विभाग प्रमुख सुधाकर पोलावार व श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी उपस्थित होते.

मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले.सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले.सर्व शालेय परिसर रांगोळी व फुल्यांनी सजवण्यात आला होता. नवीन प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट उभारण्यात आले होते.

यावेळी शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ,ढोल ताश्याच्या,टाळ्यांच्या गजरात व आनंददायी वातावरणात स्वागत करण्यात आले.विद्यार्थ्यांना शासनाच्या मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत पाठ्यपुस्तकांचे मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते वाटप करुन शिक्षणाचे महत्त्व सांगण्यात आले.शालेय समिती सदस्य डॉ.प्रकाश येरमे यांनी विद्यार्थ्यांना शाळेची माहिती देत नियमित उपस्थिती,स्वच्छता व गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास पालकांचीही उत्स्फूर्त उपस्थिती होती. नवागत विद्यार्थ्यांनी आनंदाने शाळेत प्रवेश घेतल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी मुख्याध्यापक,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी शालेय समिती अध्यक्ष व्यंकटराव गुरमे यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.प्रत्येक बालक शाळेत, प्रत्येक बालक शिक्षणात हा संदेश देत प्रवेशोत्सवाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी तर,स्वागत व परिचय श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी यांनी केले.सुत्रसंचलन सौ.अर्चना सुवर्णकार यांनी तर, आभार सौ. भाग्यश्री स्वामी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने झाली.

### अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाय योजना करा बाबासाहेब पाटील यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

त.भा.वृत्तसेवा

चाकूर दि.१६ जून : चाकूर येथे दोन दिवसापूर्वी भीषण अपघात झाला. यात तीन जण जागीच ठार झाले. त्याचबरोबर सातत्याने चाकूर, शिरूर ,अहमदपूर या मार्गावर अपघात होऊन यामध्ये अनेक निष्पाप लोकांचे जीव जात आहेत.

या घटनेची दखल राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी तात्काळ घेतली असून त्यांनी प्रकल्प व्यवस्थापक राष्ट्रीय महामार्ग यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून या ठिकाणी लागणाऱ्या तातडीने उपाययोजना करून अपघात रोखावे.त्याचबरोबर या ठिकाणी एक स्वतंत्र पूल तयार करता येतो का यासाठी संदर्भात त्यांनी प्रस्ताव तयार करावा.

मी स्वतः दिल्लीमध्ये जाऊन नितीन गडकरी यांच्याकडून त्यांची मंजुरी आणतो असे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. आपण अपघात रोखण्यासाठी अजूनही काय उपाययोजना करता येतील का, त्या उपाययोजना कराव्यात असे स्पष्ट निर्देश सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या प्रकल्प व्यवस्थापकांना दिले आहेत.

# मारुती साखर कारखान्याने दिला शेतकऱ्यांना पेरणीत आधार

## ३०११ रुपये दर,खरीप हंगामपूर्व रक्कम शेतकऱ्याच्या हातात



तभा वृत्तसेवा

औसा दि.१६ जुन : या वर्षीच्या २०२५ - २६ या गळीत हंगामात औसा तालुक्यातील श्री संत मारुती महाराज साखर कारखान्याने दोन लाख १७हजार ४४७ मॅट्रिक टनाचे गाळप करून शेतकऱ्यांना पहिली उचल २७५० तर दुसरी उचल शंभर रुपये व या वर्षीच्या खरीप हंगामाच्या



पेरणीसाठी अंतिम १६१ रुपये मॅट्रिक टन याप्रमाणे ३ हजार ११ रुपये ऊसाला भाव दिला आहे. खरीप हंगामाच्या पेरणीपूर्व उसाची अंतिम रक्कम देऊन शेतकऱ्यांना खरीप पेरणीसाठी मारुती साखर कारखान्याने मोठा आधार दिला आहे. अशी चर्चा शेतकऱ्यातून सुरू आहे.

औसा तालुक्यातील श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना बेलकुंड कारखान्याच्या संचालक मंडळाने सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल केली. या वर्षीच्या गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल मेट्रिक टन २७५० रुपये व दुसरी उचल प्रती मे. टन १०० रुपये मांजरा परिवारातील धोरणाप्रमाणे एकूण २८५० रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले. यानंतर तिसरा व अंतिम १६१ रुपयांचा हप्ता देण्यात आला आहे.

**आगामी हंगामात अधिकचा दर देणार - चेअरमन शाम भोसले**

येणाऱ्या गळीत हंगामापासून श्री संत मारुती महाराज सहकारी साखर कारखान्यात इथेनॉलचा प्रकल्प सुरू करण्यात येणार असून२०२६ -२७ या गळीत हंगामात मांजरा परिवारातील कारखान्या प्रमाणे संत मारुती महाराज साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या उसाला दर देण्याचा आम्ही प्रयत्न करणार असल्याचा विश्र्वास मारुती साखर कारखान्याची चेअरमन श्याम भोसले यांनी यावेळी दिला आहे.

**सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची वचनपूर्ती**

पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर मांजरा परिवार शेतकऱ्यांच्या उसाला भाव देणार असे वचन गेल्या वर्षीच्या गळीत शुभारंभ प्रसंगी सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी शेतकरी व सभासदांना दिले होते. पश्चिम महाराष्ट्रात जवळपास १८ ते १९ महिन्याच्या पोसलेल्या उसाचे गाळप होते. यामुळे साखर उतारा दीड पटीने वाढतो व सर्वाधिक दर देता येतो. याप्रमाणे पश्र्चिम महाराष्ट्रात मराठवाड्याच्या तुलनेत शेतकऱ्यांच्या उसाला अधिकचा भाव मिळतो. परंतु मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील मांजरा परिवारातील कारखान्यांकडून बारा ते तेरा महिन्यात उसाचे गाळप होते. यामुळे साखर उतारा कमी येतो. तरी पण पश्र्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत यंदा मांजरा परिवाराच्या वतीने सर्वाधिक भाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या परिवारातील औसा तालुक्यातील बेलकुंड येथील श्री संत मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याने यंदा तीन हजार अकरा रुपये प्रति मे. टन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भाव देऊन सहकारमहर्षी व मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे अंतिम ऊस दर दिला आहे.

**अंतिम हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांनी बँकेतून घ्यावी**

यंदाच्या खरीप हंगामातील पेरणीसाठी शेतकरी हातबल झाला असून या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी खरीप हंगाम पेरणीपूर्व मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याच्या वतीने अंतिम व तिसऱ्या हप्त्याची प्रति मे. टन १६१ रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात पूर्ण रक्कम वर्ग करण्यात आली आहे. खरीप हंगामातील पेरणीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे म्हणून ऐन पेरणीच्या काळातच मारुती महाराज साखर कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांना अंतिम बिल देण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी संबंधित बँकेच्या खात्यातून रक्कम घ्यावी. असे आवाहन कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, व्हाईस चेअरमन सचिन पाटील, कार्यकारी संचालक सदाशिव बहीर व सर्व संचालक मंडळाने केले आहे.

### तुकाराम मुंढे यांची बदली करू नये, त्यांना संरक्षण देण्याची मागणी ग्राहक पंचायत निवेदनाद्वारे मागणी



तभा वृत्तसेवा

चाकूर दि.१६ जून : महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त मा. तुकाराम हरिभाऊ मुंढे (भा.प्र.से.) यांना मुदतपूर्व बदली न करता त्यांना नियमानुसार संपूर्ण कार्यकाळ देण्यात यावा, तसेच प्रामाणिक, पारदर्शक आणि जनहिताभिमुख प्रशासनाला आवश्यक संरक्षण व पाठबळ देण्यात यावे, अशी मागणी ग्राहक पंचायतचे लातूर जिल्हाध्यक्ष प्रल्हाद तिवारी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार चाकूर यांच्यामार्फत केली आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी मागील सात दिवसांत जनसामान्यांच्या जीवाची पर्वा न करणाऱ्या भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर ३३ धाडी घालून ३४ आस्थापने सील केल्या आणि ३५ एफआयआर दाखल केले आहेत.अशाच अधिकाऱ्यांची महाराष्ट्राला अत्यंत गरज असल्यामुळे त्यांची मुदतपूर्व बदली न करता त्यांना संरक्षण देण्याची मागणी लातूर जिल्ह्यातील ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रल्हाद तिवारी, लातूर जिल्हा सचिव विकास स्वामी, चाकूर तालुकाध्यक्ष अ.ना शिंदे यांची उपस्थिती होती.

त्यांच्या या धाडसी आणि परिणामकारक कारवायांमुळे ग्राहक संरक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि कायद्याचे राज्य अधिक बळकट होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. ग्राहक पंचायत महाराष्ट्रने अशा कर्तव्यदक्ष व प्रामाणिक अधिकाऱ्याला महत्त्वाच्या पदावर नियुक्त करून ग्राहक संरक्षणाला प्राधान्य दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही मानले आहेत.

### उदगीर मध्ये जागतिक रक्तदाता दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

उदगीर : नागप्पा अंबरखाने रक्तपेढी व जिव्हाळा ग्रुप उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रक्तदाता दिनानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबीर व रक्तदाता गौरव सोहळा नागप्पा अंबरखाने रक्तपेढी येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागप्पा अंबरखाने रक्तपेढीचे अध्यक्ष तथा उद्योजक मा. रमेशअण्णा अंबरखाने हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर जगताप, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे माजी विस्तार शिक्षण संचालक प्रा. डॉ. अनिल भिकाने तसेच जिव्हाळा ग्रुपचे मार्गदर्शक रमाकांत बनशेळकीकर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात रक्तगटांचा शोध लावून वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडविणारे नोबेल पारितोषिक विजेते डॉ. कार्ल लँडस्टायनर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात डॉ. बसवराज शेटकार यांनी जागतिक रक्तदाता दिनाचे महत्त्व विशद केले. रमाकांत बनशेळकीकर यांनी आज विज्ञानाने अनेक क्षेत्रांत प्रगती केली असली तरी रक्ताला अद्याप कृत्रिम पर्याय उपलब्ध नसल्याचे सांगितले. प्रा. डॉ. अनिल भिकाने यांनी रक्तदाता हा खऱ्या अर्थाने जीवनदाता असल्याचे सांगत, एका युनिट रक्तापासून लाल रक्तपेशी, प्लाझ्मा आणि प्लेटलेट्स वेगळे करून तीन किंवा अधिक रुग्णांना मदत करता येते, असे नमूद केले.

### श्यामार्य कन्या विद्यालयात नूतन शैक्षणिक प्रवेश उत्सव उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर : श्यामार्य कन्या विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त नूतन शैक्षणिक प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन विद्यार्थिनींचे स्वागत पुष्पगुच्छ व चॉकलेट देऊन आनंदी वातावरणात करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ड. सुपोषपाणी आर्य हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून श्यामार्य कन्या विद्यालयाच्या नूतन मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री सगर, पर्यवेक्षक राहुल लिमये, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे तसेच पर्यवेक्षक प्रवीण भोळे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थिनींना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत नियमित अभ्यास, शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी शासनाच्या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थिनींना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. नवीन पुस्तकांमुळे शैक्षणिक वर्षाची सुरुवात अधिक उत्साहवर्धक झाली.

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड सुपोषपाणि आर्य यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात काही विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. पाठ्यपुस्तक वाटपाचे सूत्रसंचालन श्रीहरी निडवंचे तर आभार प्रमोद कावरे यांनी व्यक्त केले.

# ३१ वर्षानंतर भरला वर्ग मित्रांचा मेळा.....

## गुरुजनाच्या उपस्थितीत दिला जुन्या आठवणीना उजाळा

तभा वृत्तसेवा

उदगीर : तब्बल ३१ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर उदगीर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा मेळा नुकताच पार पडला. दहावीला विद्यादान केलेल्या गुरुजनाच्या उपस्थितीत एकत्र जमलेल्या वर्गमित्रानी आपल्या अनेक आठवणींना उजाळा दिला.



उदगीर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयातून १९९५ साली दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन आपला स्नेहमेळावा भरविण्याचे नियोजन केले. कौळखेड रोडवरील शिवम रिसॉर्ट येथे हा स्नेहमेळावा पार पडला.

१९९५ साली दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक जणांनी अनेक क्षेत्र पादाक्रांत केली आहेत. आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या या सर्व वर्ग मित्रांना एकत्रित करून आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी उदगीर शहरात वास्तव्यास असलेल्या व बाहेरगावी असलेल्या काही वर्गमित्रांनी हा स्नेहमेळावा आयोजित करण्यासाठीसंतोष राम, पवन मुत्तेपवार, विक्रम संकाये, प्रशांत मांगुळकर, वीरभद्र स्वामी, पुरुषोत्तम वट्टमवार, रामेश्र्वर बिरादार, कपिल कल्पे, उदय श्रीनेवार, सिमा सब्बानवाड, दीपाली टेकाळे, अजय पंडित नलिन बांगे आणि शिरीष मुंडकर आदींच्या पुढाकारातून पार पडलेल्या या वर्गमित्रांच्या स्नेहमेळाव्यासाठी तत्कालीन गुरुजणांना देखील निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी श्र लक्ष्मीकांत नेलवाडकर, लालासाहेब गुलभेळे, चंद्रकांत शिंदे, रमाकांत क्षीरसागर, सरोजिनी जनवाडकर, रंजना जोशी, गोपाळ जोशी, रमाकांत बनशेळकीकर, व्यंकट गुरमे, रामदास नारंगवाडे, बलभीम नळगीरकर, उमाकांत कोणाळे, मल्लिकार्जुन उप्परबावडे, शिवशंकर राऊत, विजय दीक्षित, अंबुबाई दीक्षित, अंजली बनशेळकीकर या शिक्षकांची उपस्थिती होती. अनेक वर्षानंतर राज्याच्या व देशाच्या विविध भागात आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना एकत्रित आल्यानंतर उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी केलेल्या आपल्यावरील संस्कारामुळे आपण आपल्या क्षेत्रात मोठे यश मिळवू शकलो अशा भावना व्यक्त करीत आपल्या अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## इटकळ जि.प.शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१६ जून -**
इटकळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण माशाळकर, पंचायत समिती सदस्या प्रियंका मिटकरी, पोलिस पाटील विनोद सलगरे, माजी सरपंच राहुल बागडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्रीकृष्ण मुळे यांच्या हस्ते सुमारे ३०० विद्यार्थ्यांना मोतीचूर लाडूंचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक सतिश ढोणे यांनी केले. सूत्रसंचालन सतिश साखरे यांनी तर आभार प्रदर्शन एकनाथ नैताम यांनी केले. नवागत विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत करून शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त...



### तेरखेडा येथे शेतकरी मार्गदर्शन बैठक संपन्न

**वाशी, दि.१६ जून -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे खरीप हंगाम २०२६ अनुषंगाने शेतकरी मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान, बीजप्रक्रिया, आंतरपीक पद्धती तसेच विविध कृषी योजनांबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी डी.बी. यादव यांनी बीजप्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी आणि संभाव्य एल-निनो प्रभाव लक्षात घेऊन शेती व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. तर उपकृषी अधिकारी एन.जी. विश्वेकर यांनी आंतरपीक पद्धती, रुंद वाफा-सरी (बीबीएफ) व टोकण पद्धतीने पेरणीचे फायदे समजावून सांगितले. यावेळी विविध कृषी योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीस कृषी अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### सिद्धेश्वर विद्यालय देवगाव (खुर्द) येथे प्रवेशोत्सव उत्साहात

**परंडा, दि.१६ जून -**
सिद्धेश्वर विद्यालय, देवगाव (खुर्द), ता. परंडा येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात पार पडला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्प, पाठ्यपुस्तके, दप्तर व अन्य शालेय साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले माजी मुख्याध्यापक निर्मलकुमार मच्छिंद्र गांधले तसेच नूतन मुख्याध्यापक धनंजय परशुराम गोरे यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष हिमालय विजयकुमार वाघमारे आणि संस्थेचे सचिव तथा माजी मुख्याध्यापक निर्मलकुमार गांधले यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच शालेय पोषण आहारांतर्गत विद्यार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले.



### वाशी तालुक्यात नवीन शैक्षणिक वर्षाचा उत्साहात शुभारंभ

**वाशी, दि.१६ जून -**
नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जूनपासून होताच वाशी तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. सुट्टीनंतर शाळेत परतलेल्या विद्यार्थ्यांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यातील तेरखेडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा व कन्या शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विविध गावांमध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पवृष्टी व खाऊ वाटप करून स्वागत करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती व अभ्यासाचे महत्त्व पटवून देत नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहता यंदाच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाल्याचे चित्र दिसून आले.



### राजे शिवाजी पब्लिक स्कूल, परांडा येथे प्रवेशोत्सव उत्साहात

**परंडा, दि.१६ जून -**
राजे शिवाजी पब्लिक स्कूल, परांडा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी नर्सरी, एलकेजी, युकेजी व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. रंगीबेरंगी सजावट व स्वागत कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी विद्यार्थ्यांना पेन्सिलचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास पंचायत समिती परांडाचे सभापती अण्णासाहेब जाधव, संस्थेचे अध्यक्ष बिभीषण रोडगे, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. प्रवेशोत्सवामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात झाली.

## उमरगा उपजिल्हा रुग्णालयातील शीतगृह सुविधा दीड वर्षांपासून बंद

### ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनची तातडीच्या कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जून -**
उमरगा उपजिल्हा रुग्णालयातील शवविच्छेदनासाठी आवश्यक असलेली शीतगृह (फ्रीजर) सुविधा गेल्या दीड वर्षांपासून बंद असल्याने मृतांच्या नातेवाईकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करत ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन, उमरगा यांच्या वतीने महाराष्ट्राच्या आरोग्यमंत्र्यांकडे मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उमरगा यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, उमरगा हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेलगतचे महत्त्वाचे शहर असून उमरगा, लोहारा आणि परिसरातील लाखो नागरिकांसाठी येथील उपजिल्हा रुग्णालय हे प्रमुख आरोग्य केंद्र म्हणून कार्यरत आहे. अपघाती, संशयास्पद तसेच विविध कायदेशीर कारणांमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या प्रकरणांमध्ये शवविच्छेदनासाठी या रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत मृतदेह जतन करण्यासाठी आवश्यक असलेली शीतगृह सुविधा दीड वर्षांपासून बंद असणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे फाउंडेशनने नमूद केले आहे. मृत्यू झाल्यानंतर अनेकदा नातेवाईक दूरवरून येत असतात किंवा विविध कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मृतदेह जतन करून ठेवणे आवश्यक असते. मात्र शीतगृह सुविधा उपलब्ध नसल्याने मृतांच्या नातेवाईकांना अमानुष त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे तसेच मृत व्यक्तीच्या सन्मानालाही बाधा पोहोचत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

फाउंडेशनने शासनाकडे शीतगृह सुविधा तात्काळ सुरू करणे, अत्याधुनिक कायमस्वरूपी शीतगृह उभारणे, सदर सुविधा दीड वर्षांपासून बंद राहण्यामागील कारणांची चौकशी करणे, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच उपजिल्हा रुग्णालयातील शवविच्छेदन विभागाचे तांत्रिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची मागणी केली आहे. यावेळी फाउंडेशनच्या वतीने प्रशासनाला इशाराही देण्यात आला आहे. निवेदन प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत समाधानकारक कार्यवाही न झाल्यास उपविभागीय कार्यालय आणि उपजिल्हा रुग्णालयासमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन, निदर्शने तसेच पुढील टप्प्यात तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. उमरगा व परिसरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक हक्कांशी तसेच मृत व्यक्तींच्या सन्मानाशी संबंधित असलेल्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी मागणी ड. शीतल चव्हाण फाउंडेशनने केली आहे.

निवेदनावर ॲड. शीतल चव्हाण, सत्यनारायण जाधव, ॲड. ख्वाजा शेख, व्यंकट भालेराव, करिम शेख, धानय्या स्वामी, किशोर बसगुंडे, कविता साळी, किशोर औरादे, बबीता मदने आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## कर्तव्याच्या पलीकडे जाऊन समाजसेवा

### पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी रात्रीच बुजवले रस्त्यावरील खड्डे



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१६ जून -**
कळंब शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात रस्त्यावर पडलेल्या तीन मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हे खड्डे चुकवताना अपघात होण्याची शक्यताही निर्माण झाली होती.

मात्र नगर परिषदेच्या कारवाईची प्रतीक्षा न करता कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख यांनी पुढाकार घेत समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा दाखवून दिली.

वाहतूक कमी असलेल्या रात्रीच्या वेळेत, सुमारे रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्यांनी खाजगी मिक्सरची व्यवस्था करून रस्त्यावरील तीनही धोकादायक खड्डे बुजवून घेतले. त्यांच्या या तत्परतेमुळे वाहनचालक, नागरिक आणि पादचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे कोणतीही दुर्घटना घडू नये, नागरिकांचा जीव धोक्यात येऊ नये आणि वाहतूक सुरळीत राहावी, या सामाजिक जाणिवेतून पोलीस निरीक्षक शेख यांनी ही पुढाकाराची भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे.

त्यांच्या या कृतीमुळे प्रशासनातील संवेदनशीलता आणि समाजाभिमुख दृष्टिकोनाचे दर्शन घडल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## बालाजी नगर शाळेत विद्यार्थ्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जून -**
जिल्हा परिषद हायस्कूल व प्राथमिक शाळा, बालाजी नगर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी इयत्ता पहिली व पाचवीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. आकर्षक रांगोळी, तोरणे आणि गुलाबपुष्पांच्या वर्षावात विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण करण्यात आले.

उमरग्याचे नगराध्यक्ष किरण गायकवाड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुजाता मोरे, उपनगराध्यक्ष विजय वाघमारे, शिक्षण सभापती शफी चौधरी, नायब तहसीलदार गजानन पारसकर, मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले तसेच चारचाकी वाहनातून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाला पालकांची उपस्थिती होती.

## गुळ पावडर उद्योगाच्या विविध मागण्यांसाठी सहकार मंत्र्यांकडे पाठपुरावा

### उद्योग विकासावर सविस्तर चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जून -**
इनोव्हेटिव्ह जॅगरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, महाराष्ट्र व कर्नाटक (खगच) यांच्या वतीने संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड. व्यंकट गुंड पाटील यांनी महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची लातूर येथे भेट घेऊन गुळ पावडर उद्योगासमोरील विविध समस्या, उद्योगाला भेडसावणाऱ्या अडचणी तसेच उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी ॲड. व्यंकट गुंड पाटील यांनी गुळ पावडर उद्योगाशी संबंधित एफआरपी विषयक मुद्दे, उद्योगाला आवश्यक धोरणात्मक पाठबळ तसेच इथेनॉल निर्मितीसाठी गुळ पावडर कारखान्यांना आवश्यक परवाने देण्याची मागणी सहकार मंत्र्यांकडे आग्रहीपणे मांडली. उद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध मागण्यांचे निवेदनही यावेळी सादर करण्यात आले. या बैठकीस आ. विक्रम काळे, भाजपचे शहाजी पवार, राज्य सहकारी शिखर बँकेचे माजी संचालक अविनाश महागावकर, साहेबराव पाटील, उद्योजक व्ही.पी. पाटील तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

संघटनेने मांडलेल्या मागण्या आणि उद्योगासमोरील अडचणींची सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी गांभीर्याने दखल घेतली. गुळ पावडर उद्योग हा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट निगडित असलेला महत्त्वाचा उद्योग असून, त्याच्या प्रगतीसाठी शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मांडण्यात आलेल्या विविध मुद्द्यांवर संबंधित विभागांशी चर्चा करून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. गुळ पावडर उद्योगाच्या विकासाला चालना देण्यासाठी, उद्योगातील अडथळे दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना अधिक लाभदायी पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी झालेली ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उद्योगाशी संबंधित विविध प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## वृक्षवल्ली मराठा महिला मंडळातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### करिअर निवडीबाबतही मार्गदर्शन...



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ जून -**
नळदुर्ग येथील वृक्षवल्ली मराठा महिला मंडळाच्या वतीने शहरातील विविध शाळांमधील दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना दहावीनंतर शिक्षणाची योग्य दिशा निवडण्याबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

नळदुर्ग येथील आंबाबाई मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शहरातील जि.प. प्रशाला मुलांची शाळा, जि.प. प्रशाला मुलींची शाळा, नॅशनल मराठी शाळा, डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल, अंजनी प्रशाला, धरित्री विद्यालय, हुतात्मा बाबुराव बोरगावकर विद्यालय तसेच साखर कारखाना विद्यालयातील इयत्ता दहावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वृक्षवल्ली मराठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रेखा वऱ्हाडे, उपाध्यक्षा तथा नगरसेविका मिनाक्षी काळे आणि सचिव उमा जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून दमयंती महिला शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुभद्रा मुळे तसेच सरपंच तेजाबाई मिटकर उपस्थित होत्या. कार्यक्रमात अश्विनी झांबरे आणि डॉ. स्वाती पाटील यांनी विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना आणि मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास रेखा पवार, सुप्रिया काळे, सुवर्णा मोटे, सोनाली मोटे, रागिणी वऱ्हाडे, माधुरी जांभळे, सुशिला भुसारे, कांचन सूर्यवंशी, ज्योती बागल, लिलावती जाधव, ललिता जाधव, निता जाधव, सुक्ष्मा माने, छाया माने, बालिका जाधव, शोभा शिंदे, सविता शिंदे, मंदा गरड, कांताबाई जगताप, निर्मला काळे, प्रतिभा गायकवाड आणि पल्लवी गायकवाड यांच्यासह पालक, विद्यार्थी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जून -**
नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी उमरगा येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले.

यानिमित्ताने इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गखोल्या फुले, फुगे आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आल्या होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे होते. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून सुदर्शन माळी व रेखा भाले उपस्थित होते. मुख्याध्यापिका सविता लोहार यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी समाजसुधारक, शास्त्रज्ञ व महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी होत सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समीर देशपांडे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त स्वागतामुळे शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

## महिलांकडून महिलांसाठी मदतीचा हात; ४७५ महिला शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१६ जून -**
अणदूर येथे महिलांनी महिलांसाठी उभा केलेला मदतीचा हात सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला आहे. सामाजिक कार्यकर्त्या बाबई चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नाम फाउंडेशन, पर्याय संस्था कळंब आणि पोर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील २५ ते ३० गावांतील ४७५ एकल, विधवा व परित्यक्ता महिला शेतकऱ्यांना प्रत्येकी ३० किलो मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी हणमंत भिंगारदिवे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र कानडे, माजी सरपंच धनराज मूळे, प्रगतिशील शेतकरी आप्पू धमूरे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी घुगे, कृषी सहायक सरडे, पर्याय संस्थेचे मार्गदर्शक अण्णा तोडकर तसेच संस्थेच्या अध्यक्षा शारदा शिंदे व सचिव बाबई चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी कृषी अधिकारी आबासाहेब देशमुख यांनी महिला शेतकऱ्यांना सोयाबीन पेरणीपूर्वी बियाणे प्रक्रिया, बियाणे चाचणी, पेरणीची योग्य पद्धत, संतुलित खत व्यवस्थापन तसेच पीक संरक्षण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. चांगल्या उत्पादनासाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सरपंच रामचंद्र आलुरे यांनी नाम फाउंडेशन, पर्याय संस्था कळंब आणि पोर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्थेने महिला शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक करून सर्व संस्थांचे आभार मानले.

तसेच पर्याय संस्थेचे मार्गदर्शक अण्णा तोडकर यांनी सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे गरजू महिला शेतकऱ्यांना बळ देण्याची गरज व्यक्त केली. महिला शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास ग्रामीण भागाचा विकास अधिक वेगाने होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या उपक्रमामुळे विधवा, एकल आणि परित्यक्ता महिला शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी मोठा आधार मिळाला असून लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी नाम फाउंडेशन, पर्याय संस्था कळंब आणि पोर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था यांचे हे कार्य प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माजी सैनिक कुटुंबीयांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी १९ जून रोजी बैठक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी मुंबई येथील नौदल अधिकारी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत १९ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीला मुंबईहून येणारे नौदल अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, ते माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या समस्या, तसेच प्रलंबित प्रश्न जाणून घेणार आहेत.

तरी आपल्या अडीअडचणी व समस्या मांडण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व नौदल माजी सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि अवलंबितांनी १९ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### विधान परिषद निवडणुकीनिमित्त लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्यात चार दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे आदेश जारी केले आहेत.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ (सी) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये देण्यात आलेल्या या आदेशानुसार, मंगळवार, १६ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपासून पुढे मद्य विक्री बंद राहील. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे बुधवार, १७ जून २०२६ रोजी संपूर्ण दिवस, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हा आदेश लातूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी होत असलेल्या सर्व संबंधित क्षेत्रांना लागू राहणार आहे. यामध्ये लातूर महानगरपालिका हद्दीसह रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकूर, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, औसा आणि निलंगा या सर्व नगर पंचायत हद्दींचा समावेश आहे. या सर्व नमूद क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व देशी आणि विदेशी मद्याची घाऊक व किरकोळ विक्री, तसेच ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ क्लब अनुज्ञप्ती, सीएल-२, सीएल-३, टिओडी-३, टिडी-१ इत्यादी सर्व प्रकारची दुकाने) या आदेशित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील.

सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### लातूर जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

तभा वृत्तसेवा

लातूर, १६ जून : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्यातील रेणापूर आणि जळकोट तालुक्यांमध्ये प्रत्येकी मुलांचे एक व मुलींचे एक अशी एकूण चार शासकीय वसतिगृहे कार्यरत असून या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवर्गनिहाय अर्ज करावे लागणार आहेत.

या प्रवेश प्रक्रियेत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी ९० टक्के, ऊसतोड कामगारांचे पाल्य असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के, ऊसतोड कामगार असलेल्या विधवा, परित्यक्ता व एकल पालक यांच्या पाल्यांकरिता ३ टक्के, तर ज्यांचे मृत्यू झालेले पालक ऊसतोड कामगार होते अशा अनाथ पाल्यांसाठी २ टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. या वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी ३० जून २०२६ पर्यंत अर्ज करणे आवश्यक असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ७ जुलै २०२६ रोजी अंतिम केली जाईल, तर इयत्ता ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावयाचे असून त्यांची प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२६ रोजी अंतिम करण्यात येणार आहे.

या वसतिगृहांमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत शैक्षणिक साहित्य, स्टेशनरी, एका वेळेचा सकस नाश्ता आणि दोन वेळचे चविष्ट भोजन यासह विविध शैक्षणिक सोयी-सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकाधिक ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांचे गृहपाल तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# नांदेडचे मतदार पर्यटनाला तर लातूरचे मतदार केवळ ' लक्ष्मीदर्शन' वरच खूश ..?

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघासाठी येत्या १८ तारखेला मतदान होणार आहे. या निवडणुकीत नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर, बीड, उस्मानाबाद विधान परिषद मतदार संघात महायुतीच्या उमेदवारांचे पारडे सुरुवातीपासूनच जड आहे. विशेष म्हणजे दोन्ही मतदार संघ भाजपाकडे आहेत. नगर पंचायत - नगर परिषद - महानगरपालिका तसेच पंचायत समिती - जिल्हा परिषदेचे सदस्य या निवडणुकीचे मतदार असून मतदार इकडे तिकडे जाऊ नये म्हणून त्यांना उमेदवारांकडून पर्यटनासह लक्ष्मीदर्शनाचा लाभही दिला जात आहे. शेजारच्या नांदेड मतदार संघातील मतदार लक्ष्मीदर्शनासह गोव्याला पर्यटनाला गेले आहेत. लातूरच्या मतदारांची बोळवण मात्र केवळ ' लक्ष्मीदर्शन'वर केली गेल्याची चर्चा राजकीय वर्तुळात चांगलीच रंगत आहे.

समाजमाध्यमांवर व्हायरल झालेले गोवा टूरचे छायाचित्र...



या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघात भाजप - महायुतीचे निर्विवाद वर्चस्व आहे. भाजपने लातूरमधून पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी राज्यमंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांना तर नांदेडमधून पूर्वाश्रमीचे काँग्रेसचेच माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांना निवडणुकीच्या आखाड्यात उतरवले आहे. राजूरकरांसाठी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी आपली ताकद लावली होती. राजूरकर सुरुवातीपासूनच चव्हाणांचे खंदे समर्थक राहिले आहेत. जिकडे चव्हाण - तिकडे राजूरकर असे म्हटल्यास ते फारसे वावगे ठरणार नाही. मुरुमकरही म रब्बी राजकारणी ते दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे मानसपुत्र म्हणूनही अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहेत.

चाकूरकरांच्याअनेक लोकसभा निवडणुकांमध्ये उमरगा पट्ट्याची कमान मुरुमकरांच्या खांद्यावरचअसायची, हेही सर्वज्ञात आहे. बदलत्या राजकीय समिकरणात मुरुमकरांनी

**तरूण भारत स्पेशल**

**श्रीधर स्वामी**

काँग्रेसचात्याग करून भाजपशी जवळीक साधली. भाजपनेही त्यांच्या ज्येष्ठत्वाचा मान राखत त्यांच्यावर लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आणि विधानपरिषदेची उमेदवारीही बहाल केली आहे. या निवडणुकीसाठी भाजपकडून डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांचेही नाव चर्चेत होते. पण, पक्षाने मुरुमकरांना प्राधान्य दिले.या निवडणुकीत मतदार फुटू नये म्हणून उमेदवारांकडून त्यांची खास बडदास्त ठेवली जाताना दिसत आहे. अन्य मतदारसंघाप्रमाण`या दोन मतदार संघातमहायुतीला फारसे टेन्शन नाही. तरीही शेजारच्या नांदेड मतदार संघातील मतदार उमेदवारांच्या खर्चाने गोवा पर्यटनाला गेले असून तेथील बीचवरील नाचगाण्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर चांगलेच व्हायरल झालेले पाहायला मिळत आहे. आपआपल्या प्रभागातील नागरिकांच्या अडचणी - समस्यांकडे ही नगरसेवक मंडळी मस्त पर्यटनाचा आनंद घेताना दिसत आहेत. त्यामुळे अशी मौजमजा करणाऱ्या नगरसेवकांवर समस्यांनी त्रस्त मतदार खाजगीत भरभरून तोंडसुख घेताना पाहायला मिळत आहेत.

नांदेडच्या मतदारांप्रमाणेपर्यटनाचे हे सुख लातूरच्या मतदारांच्या नशिबी नसल्याचेएकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे. त्यातच लातूर - बीड - उस्मानाबाद मतदार संघातील काँग्रेसच्या उमेदवारांची जबाबदारी काँग्रेसने माजी मंत्री अमित देशमुख यांच्याकडे सोपविली आहे. देशमुखांनीही ही जबाबदारी स्वीकारल्याचे पत्रकार परिषदेत सांगत या मतदार संघात यावेळी चमत्कार होणार असल्याचे सूतोवाच केले होते. परंतु सद्याची धामधूम पाहता ज्या पद्धतीने अमित देशमुख यांची काम करण्याची शैली आहे, त्याची मतदार संघात दृश्य परिणाम दिसून येत नसल्यामुळे महाविकास आघाडीमधील घटक पक्षाचे मतदान काँग्रेसच्या उमेदवाराला पडेल की नाही ? याची साशंकता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शेजारील नांदेड मतदार संघातील मतदारांची गोवा टूर सोशल मिडीयावर पाहणारे लातुरातील महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे मतदार आपली संधी हुकल्याची खंत खाजगीमध्ये व्यक्त करताना दिसत आहेत.

## आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्याचे प्रवेश उत्सव साजरा



तभा वृत्तसेवा

देवणी दि. १६ जून : दि. १५ वार सोमवार रोजी आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देवणी येथे नवीन विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे संस्था अध्यक्ष गोंविदराव भोपणीकर यांच्या हस्ते शाळेच्या प्रवेशद्वारावरील फीत कापून व मुलांना पुष्पगुच्छ, फुले व मिठाई वाटप करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्था सचिव गजानन भोपणीकर , कै . रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे , बोरोळ गावचे सरपंच कृष्णा पाटील, बिरादार शेषराव ,प्रताप कोयले , पवन शिवाजी हुरुषनाळे , सत्यवान बालूरे ,देवणी चे माजी सरपंच देविदास पतंगे ,पालक प्रतिनिधी हनुमंत गवळी ,वेदप्रकाश जानापुरकर , दयानंद दळवी , विजयकुमार भोजने इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

याच कार्यक्रमात डॉ सत्यवान सोनटक्के यांना आबासाहेब इंग्लिश स्कूल देवणीचे प्राचार्य म्हणून संस्था अध्यक्ष व संस्था सचिव व प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत नियुक्ती देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य सत्यवान सोनटक्के यांनी केले .तर प्रमुख पाहुणे देवीदास पतंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ श्रद्धा घोलपे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी पालक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## २४ जून रोजी आझाद मैदानावर भव्य मोर्चा




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : अनुसूचित जातीतील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय मिळावा तसेच सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निकालानुसार अनुसूचित जातीमध्ये उपवर्गीकरण लागू करण्यात यावे आणि सामाजिक न्याय व सलोखा कायम राखावा, या प्रमुख मागण्यांसाठी अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने पुणे ते मुंबई असा लॉन्ग मार्च आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती संघटनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पुणे येथील आद्य क्रांतिगुरू देशपिता लहुजी बाबा साळवे यांच्या समाधीस्थळापासून १७ जून रोजी या लॉन्ग मार्चला प्रारंभ होणार असून २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे भव्य मोर्चा व आंदोलनाने त्याची सांगता होणार आहे.

या आंदोलनाला होल्हार, बुरूड, मेहतर, भंगी, हिंदू खाटीक, कैकाडी, चांभार, ढोर, मोची आदी उपेक्षित जातींसह विविध सामाजिक संघटना व संघटनांचा पाठिंबा मिळत असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या सुनबाई सावित्रीमाई साठे, नातू सचिनभाऊ साठे, गणेशभाऊ भगत, अण्णाभाऊ साठे यांचे नाती व नातजावई, ड. टी. एन. कांबळे आणि राज क्षीरसागर हे करणार आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधून संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देण्यात आली.

## महिला सक्षमीकरणासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनचा पुढाकार प्रभाग क्र. ३ मध्ये मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ३ मधील संत गोरोबा सोसायटी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर येथे महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १५ ची सुरुवात करण्यात आली आहे.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारातून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात येत आहेत. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या प्रयत्नातून शहरी भागातील महिलांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. फाउंडेशन महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे काम करत आहे. या नवीन प्रशिक्षण केंद्रामध्ये एकूण ८३ महिलांनी सहभाग नोंदवला आहे. या प्रशिक्षणात महिलांना शिलाईच्या शिवणकामातील विविध पद्धती शिकवल्या जाणार आहेत.

संस्थेच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे यांच्या शुभहस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी प्रभागचे नगरसेवक विकास कांबळे सोशल मीडिया प्रमुख प्रवीण सूर्यवंशी, ट्रेनर प्रेमा ठाकूर, संस्थेचे समन्वयक गजानन बोयणे सोशल प्लॅनर सोमनाथ कावळे आणि प्रभागातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## भारतीय किसान संघाचा शेतकरी मेळावा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १६ जून : भारतीय किसान संघ यांच्या वतीने २६ ते २९ जून २०२६ या चार दिवसात लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी शेतकरी मेळावा व पद्मश्री सन्मान प्राप्त डॉ. श्रीरंग देवबा लाड यांचा सत्कार असा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून या मेळाव्याला जिल्ह्यातील शेतकर्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले व मंत्री सतीश देशपांडे-तावशीकर यांनी केले आहे.

भारतीय किसान संघाने जिल्ह्यात २६ जून २०२६ रोजी लातूर येथील एमआयटी कॉलेज येथे सकाळी १० वाजता प्रगतशील शेतकरी तुळशीरामअण्णा कराड व काशीरामनाना कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा संपन्न होणार आहे. या मेळाव्यास जिल्हाभरातील शेतकर्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## एसटी महामंडळाच्या लातूर विभागात 'प्रवासी राजा दिन' 'कामगार पालक दिन' उपक्रमाचे वेळापत्रक जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ जून : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या समस्या, तक्रारी आणि सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण व्हावे, या उद्देशाने एसटी महामंडळाने प्रत्येक आगारात 'प्रवासी राजा दिन' आणि 'कामगार पालक दिन' आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, या अनुषंगाने लातूर विभागातील आगारांसाठी या उपक्रमाचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार लातूर विभागातील या उपक्रमाची सुरुवात १७ जून २०२६ रोजी औसा आगारातून होणार असून, त्यानंतर २४ जून रोजी उदगीर, १ जुलै रोजी निलंगा, ८ जुलै रोजी अहमदपूर आणि २२ जुलै २०२६ रोजी लातूर आगार येथे या विशेष मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे.

या जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक संबंधित आगारात एकाच दिवशी दोन सत्रांत हा उपक्रम राबविला जाणार असून, पहिल्या सत्रात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत 'प्रवासी राजा दिन' आयोजित केला जाईल, ज्यामध्ये सर्वसामान्य प्रवासी, विविध प्रवासी संघटना, तसेच शाळा व महाविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी होऊन आपल्या बस सेवेसंबंधीच्या अडीअडचणी, तक्रारी आणि सुधारणांसाठीच्या सूचना लेखी स्वरूपात संबंधित अधिकाऱ्यांसमोर मांडू शकतील.

प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर, त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत 'कामगार पालक दिन' राबविण्यात येणार असून,

यामध्ये एसटी कर्मचारी आणि कामगार संघटनांचे प्रश्न ऐकून घेत कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक प्रश्न, रजा मंजुरी, कर्तव्याचे वेळापत्रक आणि प्रशासकीय कारवाई यांसारख्या तक्रारी व अडीअडचणींचे तात्काळ निराकरण केले जाणार आहे.